
सत्यशोधक
दिशा

अहमदनगर
साहित्य संमेलन
विशेषांक

अभिजन वर्चस्व



वेगळ्या
सौंदर्यशास्त्राची गरज
गिरीश कर्नाड

वारकरी साहित्य
सदानंद मोरे

अखिल भारतीय म... साहित्य ...लन

बहुजन साहित्य चळवळ
बाबुराव बागूल

औरंगजेब
आणि
जोशीच्या
निमित्ताने

ना. सं. इनामदारांचे
इतिहास विषयक आकलन

मूल्य
१५ रु.

साहित्य संमेलनाचे टीकाकार काय म्हणतात?

क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी

आत्मनिर्भर, शोषणमुक्त, समताधिष्ठित आणि बंधुतेवर आधारित समाजनिर्मितीच्या दिशेने जाण्यासाठी वर्गजातिस्त्रीदास्यांतक विचारांचे संवर्धन होणे आवश्यक आहे. शोषणशासनाच्या या तीनही संस्थांचे परस्पर संबंध लक्षात घेऊन त्यावर समग्रपणे वैचारिक हल्ला करणारे व्यासपीठ म्हणून क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी भूमिका बजावीत आहे.

नव्या समतावादी समाज रचनेच्या प्रस्थापने संदर्भात विविध विचारप्रणालींच्या संघर्ष व समन्वयास प्रारंभ झाला आहे. अकादमी या संदर्भात मार्क्सवाद-फुले-आंबेडकर वाद या वर्धिष्णू तत्त्वज्ञानाचा स्वीकार करते. भारतीय समाज, अर्थकारण, धर्म, संस्कृती, राजकारण या क्षेत्रात त्या आधारे वैचारिक फेरमांडणी करू इच्छिते. फॅसिझमला पायाभूत असणाऱ्या व प्रागतिक चळवळींवरही प्रभाव टाकणाऱ्या ब्राह्मण्याचा निरास करणे आणि कनिष्ठ व मध्यम जातींच्या जातिव्यवस्थेविरोधी आत्मभानास विधायक प्रतिसाद देणारे अब्राह्मणी प्रबोधन गतिमान करणे हे अकादमीचे उद्दिष्ट आहे.

महाराष्ट्रातील वारकरी परंपरा, फुलेप्रणीत सत्यशोधक चळवळ, गांधींची जनवादी रणनिती, ब्रिटीश साम्राज्यशाहीच्या विरोधात सशस्त्र उठाव, भांडवलशाही विरोधी डावी चळवळ, दादासाहेब गायकवाडांची दलित-भूमीहीनांसाठी लढणारी आंबेडकरवादी चळवळ असा प्रमुख आंदोलन व प्रवाहांचा अपूर्व संगम ज्यांच्या विचार व्यवहारात झाला होता, त्या क्रांतिसिंहांचे नाव अकादमीस देण्यात आले आहे.

जातीस्त्रीदास्यांताच्या लढ्याची पूर्वशर्त म्हणून क्रांतीकारी प्रबोधनाची वैचारिक साधने विकसित करणे, भारतीय धर्मचिंतनाची साक्षेपी चर्चा करणे, धार्मिक अल्पसंख्यांकातील शोषित जाती-वर्ग-स्त्रियांचा लढा जातवर्गस्त्रीदास्यांतक लढ्याशी जोडणारी विचार जागृती करणे या उद्दिष्टांचा अंगिकार अकादमीने केला आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी अकादमीच्या कार्यास हातभार लावावा ही विनंती

प्रकाशने

१. **समकालीन राजकारण : बहुजन दृष्टिकोन**
- ॲड. प्रकाश आंबेडकर

२. **वारकरी साहित्य: भूमिका व स्वरूप**
- डॉ.सदानंद मोरे

३. **दलित साहित्याची कोंडी**
- दिनकर साळवे

४. **मुस्लिम मराठी साहित्य : एक आकलन**
- महेबूब सय्यद

५. **फुले-आंबेडकरांचे ब्राह्मणीकरण - संघ भाजपचे डावपेच**
- प्रा. रणजित परदेशी

६. **स्त्रीमुक्ती : ब्राह्मणी - अब्राह्मणी**
- सरोज कांबळे

७. **निळया आकाशातील लाल तारा : कॉ.अण्णाभाऊ साठे**
- किशोर जाधव

८. **आंबेडकरवादाचे खरे शत्रू कोण?**
- सिद्धार्थ जगदेव

९. **जातिव्यवस्था, जमातवाद आणि मुस्लिम समाज**
- रणजित परदेशी

१०. **तीन शाहीर : एक तुलना (वामन कर्डक, अण्णाभाऊ साठे, वसंत बापट)**
- दिनकर साळवे

११. **ब्राह्मणवाद विरूद्ध बहुजनवाद**
- किशोर ढमाले

१२. **डॉ. आंबेडकर आणि स्त्रीमुक्ती**
- प्रा. प्रतिमा परदेशी

१३. **डॉ. आंबेडकरांचा आर्थिक विचार आणि भारतीय जातीसमाज**
- प्राचार्य म.ना. कांबळे

१४. **मुक्त अर्थव्यवस्था आणि वर्गीय, जातीय, लैंगिक शोषण**
- डॉ.भारत पाटणकर

१५. **चक्रव्युहात दलित चळवळ**
- दिनकर साळवे

सावित्रीबाई फुले प्रकाशन, ६२, खराडे वाडा, फणी आळी तालमीशेजारी, कसबा पेठ, पुणे ११

क्रांतिसिंह नाना पाटील अकादमीचे अनियतकालिक

सत्यशोधक दिशा

कार्यकारी संपादक -

प्रा.दिलीप चव्हाण, प्रा. महेबुब सय्यद

प्रकाशक
किशोर जाधव
क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी
६२, खराडे वाडा,
कसबा पेठ ,पुणे - ११

स्वागत मूल्य
रु.१५/-
(खाजगी वितरण)

अनुक्रमणिका

अक्षर मांडणी : दिनानाथ मनोहर

संपादकीय

दोन महिन्यापूर्वी मायकेल जॅक्सन भारतात येऊन गेला.मुंबईतील उच्चभ्रू जातवर्गीयांना मनोरंजन उपलब्ध करून देवून 'शिवउद्योगा'ला पैसा उपलब्ध करून देत असल्याचा आभास निर्माण करून बदलत्या भांडवलशाहीतील सर्व अपप्रवृत्तीचे ओंगळ दर्शन युती सरकारने घडवून दिले. ह्या मायकेल जॅक्सनच्या स्वागतासाठी विजयसिंह मोहिते पाटलांनी लेझीम पथक पाठवले होते. एका 'नाच्याच्या' स्वागतासाठी 'वीररसाचे' प्रतिक असलेले लेझीम पथक पाठविण्यास ब्राह्मणी परंपरेनेच प्रवृत्त केले आहे. बहुजनांच्या झपाट्याने होत चाललेल्या भांडवलीकरणाच्या व ब्राह्मणीकरणाच्या प्रक्रियेत स्वत:च्या स्वातंत्र्य अस्मितेचा व संस्कृतीचा त्यांना विसर पडत चालला आहे. या आत्मविस्मृतीचे वास्तव पुन्हा एकदा नगरच्या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने पुढे येत आहे.

कला,साहित्य,संस्कृती क्षेत्रात फॅसिस्ट हस्तक्षेप

युरोपात निर्माण झालेल्या फॅसिस्ट शासन-शोषण पद्धतीला भारतात भौतिक आधार असलेल्या जातिव्यवस्थेतील शोषणाची साथ मिळते म्हणून युरोपीय फॅसिझमपेक्षा ब्राह्मणी फॅसिझम अधिक धोकादायक ठरतो. पु.ल. देशपांड्यांना पुरस्कार देवून नंतर त्यांचा अपमान करून ह्या फॅसिझमचे विदारक सत्य लोकांपुढे आले. पुरस्कार देवून आपल्या उच्चजातवर्गीय हितसंबंध जोपासण्याच्या भूमिकेला पु.ल. सारख्या लोकप्रिय लेखकाची मान्यता मिळवणे हा हेतू निष्फळ झाल्यानंतर पु.ल. मध्यमवर्गीय व उच्चजातीय साहित्यिक असूनदेखील 'झक् मारली आणि पु.ल.ना पुरस्कार दिला' असे अनुचित उद्गार घटनाबाह्य सत्ताकेंद्रे काढतात. मध्यमवर्गीय जाणिवांचे चित्रण आपल्या लेखनात करणाऱ्या एका साहित्यिकाचा अपमान होवून देखील जेवढा निषेध साहित्यिकांकडून नोंदवायला गेला पाहिजे होता, तेवढा नोंदवला गेला नाही. हा साहित्यिकांमधील नेभळटपणा म्हणजे ब्राह्मणी फॅसिझमला मूक मान्यता देणे असा आहे. जातीय व वर्गीय चळवळींतील कलाकारांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य फॅसिस्ट काढून घेतात व मग श्रीराम लागूंच्या तोंडाला काळं फासण्याचं 'सोऽहम्' एकांकिका स्पर्धेतील एकांकिकेतील कलाकारांना ब्राह्मणी शिक्षा देण्याचे व महानगर सारख्या पुरोगामी वृत्तपत्राच्या कार्यलयाची नासधूस करण्याचे भयनाट्य सुरू होते. साहित्यिक पत्रकार व कलावंताच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याला धोका निर्माण होऊनदेखील हे साहित्य संमेलन ठाकरेचा निषेध नोंदवणार आहे की नाही ह्या संदर्भात आम्ही साशंक आहोत. साहित्य हे जीवनाच्या इतर अंगापासून वेगळे करता येत नाही अशी आमची धारणा असल्याने आम्ही मात्र ठाकरेचा तीव्र शब्दात निषेध नोंदवतो.

संधीसाधू बहुजन

फुले,शाहू, आंबेडकराच्या संघर्षानंतर बहुजनांना आधुनिक शिक्षणाची दारे उघडी झाली. पण शिक्षण मिळाल्यानंतर संधीसाधू बहुजनवर्गाने फुले,शाहू, आंबेडकरांच्या विचारांशी फारकत घेतली त्यांचे भांडवलीकरण व ब्राह्मणीकरण झाले. स्वत:चं वर्गांतर करण्यासाठी त्यांनी स्वत:ला प्रतिगाम्यांच्या दावणीला बांधून घेण्यासदेखील कमी केलं नाही. ह्या आशाळभूत बहुजनांच्या मदतीने ही व्यवस्था स्वत:च्या उच्चजातवर्गीय हितसंबंध जोपासते, हे त्यांनी लक्षात घ्यावं.

अ.भा.सा.सं.चा संकुचित साहित्यव्यवहार

अखिल भारतीय साहित्य संमेलन हे कलावादी आहे.ते मराठी साहित्यातील सर्व प्रवाहांना योग्य न्याय देवू शकत नाही हे वारंवार सिद्ध झालेले आहे.जॉर्ज बर्नार्ड शॉ एकदा म्हणाले की, 'माझे सर्व लिखाण हे 'जीवनासाठी कला' ह्या तत्त्वासाठी झाले असून 'कलेसाठी कला'ह्या तत्त्वासाठी मी एकही ओळ लिहिलेली नाही' जॉर्ज बर्नार्ड शॉचा मराठी नाट्यक्षेत्रावर प्रभाव असूनदेखील त्याचा 'जीवनवादाचा' वारसा प्रस्थापित साहित्यिक नाकारतात. आज नववसाहतवाद व नवभांडवलशाहीच्या विळख्यात संपूर्ण जग सापडलेलं आहे.ह्या विळख्यात सापडल्या गेलेल्या आधुनिक माणसाची परात्मता,तिसऱ्या जगात वाढलेली बेकारी, दारिद्र्य ,वाढते कुपोषण, भूकबळी, धर्मांधता, जातीयता व नवभांडवलशाहीतील कामगारवर्गाचे शोषण ह्या समस्यांच्या बदलत्या संदर्भातील वास्तव जिवंत चित्रण संकुचित प्रस्थापित साहित्यिक करू शकले नाहीत. समाजातील गंभीर प्रश्नांचे व वास्तवाचे चित्रण ज्या साहित्यात यथार्थपणे येत नाही ते साहित्य संपूर्ण समाजाचे साहित्य कधीच होऊ शकत नाही. पारंपारिक साहित्य संमेलनाची भूमिका नेहमीच या संकुचित साहित्याला पुरक राहिलेली आहे.

मराठीसाहित्यात आधुनिकतेचा अभाव

भारतीय 'जातीग्रस्त वर्ग' व 'वर्गग्रस्त जाती' समाजातील जीवन हे गुंतागुंतीचे आहे. याचे समग्रपणे चित्रण करण्यास दलित -ग्रामीण साहित्य देखील कमी पडलेले आहे. ग्रामीण साहित्यावर यादवांच्या 'कलावादाचा' प्रभाव असल्याने व दलित साहित्यिक दलित की आंबेडकरी अशा पाट्या बदलवण्यात मग्न असल्याने त्या दोन्ही चळवळी सध्या आवर्तात सापडलेल्या आहेत. स्वत:च्या संकुचित दृष्टीमुळे भटाळलेल्या ब्राह्मणेतरांकडून व प्रस्थापितांकडून व्यापक जीवनानुभवाचे यथार्थ चित्रण अजूनही न झालेले मराठी साहित्य खुजे राहिले व मराठीत शॉ,सार्त्र,ब्रेख्त व गॉर्कीसारखे साहित्यिक निर्माण होऊ शकले नाहीत. भारतीय समाज अजूनही जातीग्रस्त असल्या कारणाने तो पूर्णपणे अधुनिक नाही व साहित्यात केवळ

पान ४८ वर

वेगळ्या सौंदर्यशास्त्राची गरज

गिरीश कर्नाड

भारतात जातीय भाषेत इतिहासाचे पुनर्लेखन आणि कलेची पुनर्व्याख्या हे सुप्रसिद्ध, अतिप्राचीन अशा नृत्यप्रकाराच्या बाबतीतही कशाप्रकारे दिसून येते.हे पाहण्यासाठी 'भरतनाट्यम्' या नृत्यप्रकाराचा विचार केला आहे.

भरतनाट्यम्

कला,संस्कृती आणि सौंदर्यशास्त्र यासारखे विषय हाताळताना अमूर्त कल्पनांच्या विश्वात हरवून जाणे सहजशक्य असते.म्हणूनच सर्व भारतभर आणि परदेशातही भरतनाट्यम् या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मूर्त कलाप्रकाराच्या उदाहरणाने मी सुरूवात करतो.भारतातील प्रायोगिक कलांवर (performing arts) मोठ्या प्रमाणात लेखन केलेल्या एक प्रभावी शिक्षणतज्ञ आणि समीक्षक डॉ. कपिला वात्सायन यांचे विधान इथे देऊ इच्छितो. ''भरतनाट्यम् कदाचित भारतातील समकालीन शास्त्रीय नृत्यांपैकी सर्वात प्राचीन नृत्यप्रकार आहे...या नृत्यांगना मग त्या मंदीरातील देवदासी असोत वा तंजोरच्या मराठा राजाच्या दरबारातील नृत्यांगना असोत -त्यांनी त्यांच्या तंत्रात युगानयुगे वापरल्या गेलेल्या नमुन्यांचा अचूकपणे कित्ता गिरवला''

या पुस्तकात त्या पुढे म्हणतात, 'जेव्हा भरतनाट्यम्, मणिपूरी आणि ओडिसी हे समकालीन नृत्यप्रकार विकसित झाले,त्यातून दोन गोष्टी स्पष्ट होतात: पहिली अशी की ते खूप मोठ्या प्रमाणात नाट्यशास्त्राच्या परंपरा पाळत होते आणि सुरूवातीपासूनच त्याचप्रकारच्या तंत्रांच्या तत्त्वांचाही सराव करीत होते आणि दुसरी अशी की ८ व्या आणि ९ व्या शतकात हालचालींच्या विशिष्ट मांडणीला सुरूवात झाली. काही समकालीन कलाकृती या परंपरेची काही विशिष्ट गुणधर्म इतरांपेक्षा जास्त करून जतन करतात. भरतनाट्यम हा नाट्यप्रकार मूलभूत अर्धमंडीलीचा सर्वात जास्त कसून वापर करतो. '

मागील वर्षी मद्रासचे प्रसिद्ध लेखक अरुद्र यांनी हे नृत्य आणि त्याचे नाव भरतनाट्यम यांचा उगम यासंबंधी श्रुती नावाच्या नियतकालिकातील आपल्या लेखमालिकेत उहापोह केला आहे.अरुद्र यांना भरतनाट्यम् विषयी थोडक्यात हे सांगावयाचे आहे:

बरीच शतके दक्षिण भारतात नृत्य हा देवदासींचा विशेष हक्क मानला गेला आहे. वंशपरंपरेने देवदासी मंदीराशी जोडल्या जातात. मंदीर संस्कृतीचा शेवटचा उज्वल काळ ज्याने पाहिला अशा विजयनगरच्या राज्यात देवदासी प्रथा भरभराटीला आली. दक्षिण भारताच्या तमिळ भाषिक प्रांतामध्ये सुरू झालेल्या भक्ती संस्कृतीने उपनिषदांतील अमूर्त देवतांना हलवून त्यांची जागा मुखवटे, चेहरे, कुटुंब आणि स्थानिक इतिहास असलेल्या मूर्त देवतांना दिली.त्यांनी स्वत:च त्यांच्या दैवतांना राजाच्या कृतीला लागू होतील अशा भाषेत आकार दिला आणि या बदल्यात राजांना या जगातील दैवी इच्छेचे प्रतिनिधी म्हणून गौरवले. मंदीर आणि राजदरबार हे दोन खांब बनले ज्यांच्यामध्ये हिंदुत्वाचा उदयोन्मुख प्रकार भरभराटीस आला.मंदीर केवळ धार्मिक कार्यांची केंद्रे राहिली नाही तर सांस्कृतिक आणि सामाजिक संस्थांची केंद्रबिंदू बनली. या बदलात मंदिराशी निगडीत आणि राजांच्या आश्रित देवदासींचा बऱ्यापैकी वाटा होता.दरबारी सत्ता आणि मंदिराचे वैभव यांचा दाट अन्वय असलेल्या दक्षिण भारतातील सांस्कृतिक व्यवस्थेत देवदासी प्रथा हजारो वर्षांपेक्षा जास्त काळ अखंडपणे झपाट्याने वाढत राहिली.१५६५ मध्ये विजयनगरच्या पतनानंतर ही प्रथा आणखी पुढे दक्षिणेकडे सरकली आणि १७ व्या व १८ व्या शतकात तंजोरच्या राज्याने या व्यवस्थेला विशेष आश्रय दिला. मंदिरातील मुख्य विधींमध्ये सहभागी असलेल्या अशा हजारो देवदासी तंजोरमध्ये होत्या.

१८५३ मध्ये ब्रिटिशांनी तंजोरचे राज्य जोडून घेतले.देवदासी व त्यांच्या कलेला आश्रय देणाऱ्या शेवटच्या दरबारापैकी हे एक होते.मात्र विलीनीकरणानंतर या व्यवस्थेचा मूळ आर्थिक पाठिंबा नाहीसा झाला.'संदिर'(Sadir) 'नाच' (Nautch) किंवा 'दासिअट्टम' (Dasiattam) या नावाने ओळखला जाणारा नृत्यप्रकार हे उदरनिर्वाहाचे मुख्य साधन बनले. शतकाच्या अखेरीपर्यंत हा व्यवसाय वेश्याव्यवसायासारखाच ओळखला जाऊ लागला.

मद्रास संगीत अकादमीची १९२८ मध्ये स्थापना झाली आणि तिचे एक सचिव इ. कृष्णा अय्यर स्वत: नर्तक होते. या नृत्यप्रकाराला देवदासींच्या व्यवसायापासून -खरं म्हणजे मंदिरापासून -तोडून आणि एक सार्वजनिक धर्मनिरपेक्ष व्यासपीठ देवून,त्याला सामाजिक स्वीकृती देऊन वाचवण्याची त्यांचीच कल्पना होती. मद्रास संगीत अकादमीच्या व्यासपीठावर देवदासींना नृत्य कार्यक्रमासाठी निमंत्रित केले गेले आणि या नृत्याचे नाव बदलण्याचा निर्णय हा या नृत्यप्रकाराला सन्मान मिळवण्याच्या प्रयत्नाचा एक भाग बनला. १९३३ मध्ये 'सादिर नाचा' चे नामकरण भरतनाट्यम करण्याचा प्रस्ताव इ. कृष्णा अय्यर यांनी मांडला.भरतनाट्यम हे नाव निवडण्यामागील कारणांचा भरत अथवा नाट्यशास्त्राशी काहीही संबंध नाही. 'सादिर ' सहसा पुरुष शिकवित असत. 'नट्टूख' म्हणजे देवदासी. अशी पार्श्वभूमी असलेला नृत्यशिक्षक तर भरतम् हे नाव आदरयुक्त ब्राहमण नृत्यशिक्षकाचे. सन्मान्य

नाव असलेला हा सन्मान्य नृत्यप्रकार होता. किंबहुना अरुद्रनी सांगितल्याप्रमाणे १८ व्या शतकापर्यंत नृत्य शिकवणे ही केवळ ब्राह्मणांची अथवा 'भरतवा'ची मक्तेदारी होती.

ब्राह्मणीकरणाची प्रक्रिया

मद्रास संगीत अकादमीमध्ये ब्राह्मणांचे वर्चस्व होते आणि मद्रासमध्ये ब्राह्मण हे प्रभावी व प्रबळ होते. अशाप्रकारे नवीन संगीताचा स्पष्टपणे आदरणीय म्हणजेच ब्राह्मणी संबंधाना उदधृत करण्याचाच उद्देश होता. या नवीन संगीतामध्ये सादिरप्रणित गटाची बुद्धिजीवी वर्गाची स्वीकृती आणि पाठिंबा मिळविण्याची गरजं प्रतिबिंबित होते.भरतनाट्यम हे नाव नाट्यशास्त्र परंपरा सुचवीत नाही तर एका विशिष्ट जातीच्या म्हणजेच ब्राह्मणजातीच्या आर्थिक पाठबळाची गरज सूचित करते. इ. कृष्णा अय्यर यांनी देवदासी ज्ञातीतील एक महान नर्तक बालसरस्वती यांना अकादमीत नृत्यअध्यापनासाठी निमंत्रित केले होते.या नृत्याच्या ब्राह्मणीकरणाला खऱ्या अर्थाने श्रीमती रुक्मिणीदेवी अरुंदळे या ब्राह्मण स्त्रीच्या प्रभावामुळे गती आली.

पुढे या नृत्याला त्याच्या देवदासीवरच्या दुर्लौकिक संबंधापासून मुक्त करणे आणि नंतर या संबंधामधून निर्माण होणाऱ्या सर्व प्रकारच्या विविध गोष्टींची झालेली 'भर' यापासून त्यांना 'शुद्ध' करण्याचा प्रयत्न ब्राह्मणी छावणीनेच केला. कलाक्षेत्र नावाची अकादमी सुरू केली. त्यांचे यश अभूतपूर्व होते. किंबहुना त्यांनी भारतात इतर ठिकाणी खूप मोठ्या परिणामकारकरित्या अनुकरण केल्या जाणाऱ्या नृत्यप्रकाराच्या 'शुद्धीकरणा'साठी एक पद्धतशीर शास्त्रच विकसित केले. हावभाव, शरीराची ढब, आणि हालचाली अशा एकूण कलाकृतीला संपूर्णपणे दुरुस्त करण्यासाठी, तकाकी आणण्यासाठी तसेच तिचा विस्तार करण्यासाठी त्यांनी संस्कृत भाषेतील विद्वान,संगीततज्ञ आणि नृत्यतज्ञांचीही मदत घेतली. ही कलाकृती 'सादिर'ची मूलभूत भाषा बनली. रुक्मिणीदेवींच्या ऍंग्लिसाईझ्ड (angicised) ब्राह्मणी, मध्यमवर्गीय जाणीवांना अश्लील आणि आक्षेपार्ह वाटणारे सर्व काही टाकून देण्यात आले. अशाप्रकारे दक्षिण भारतातील देवदासी नृत्याचे रूपांतर अखिल भारतीय 'शास्त्रीय' नृत्यात केले गेले आणि त्याला संस्कृतमध्ये नावही दिले गेले!

छाऊ

आणखी एक उदाहरण पाहू. मागच्या २५ वर्षांमध्येच 'छाऊ' हा नाट्यप्रकार सर्व भारतभर विख्यात झाला आहे. त्याचा उगम स्थानिक आदिवासी नृत्यामध्ये, शिकाऱ्यांच्या विधीनृत्यात आणि १९ व्या शतकात खेळात रुपांतरीत झालेल्या मार्शल आर्टसमध्ये होतो. एका स्थानिक राजकुमाराने त्याला नाट्यात रुपांतरीत करण्याचा निर्णय घेतला. ब्राह्मण गुरूंना बोलावून छाऊला कथानाट्यामध्ये आकार देण्यात आला. हिंदु दन्तकथेतील विषयांसाठी आदिवासी विधींना वगळण्यात आले. आदिवासी विधीनृत्याला हिंदु विधीनाट्यामध्ये रुपांतरीत केले गेले. मला पुन्हा सांगायला हवे की हे सर्व गेल्या केवळ १०० वर्षांत घडले.

भारतात आजही प्रचलित असलेले नृत्यप्रकार मुख्यत्वेकरून छाऊ या मुखवटे धारण करून केलेल्या नाटकाचे तीन वेगवेगळे प्रकार हे सर्व नाट्यप्रकार खूप कसून एखाद्या नाट्यप्रयोगापूर्वी प्राथमिक विधी पाळत असत.

कथा

'कथा' प्रकाराबाबत आपल्याला काय दिसते? प्रा. रामानुजन यांनी कथेचा एकंदर तपशील, आकार कसा बदलतो हे 'घरगुती'(किंवा खाजगी) आणि 'सार्वजनिक' या संकल्पनांच्या आधारे स्पष्ट केले आहे. एखादी कथा एखाद्या संताच्या जीवनातील एक घटना म्हणून अभ्यासली जाणारी कथा यांच्यापेक्षा फारशी वेगळी नसते.म्हणजे लोककथा आणि आजीच्या कथेच्या रचनेपेक्षा ती अजिबात वेगळी नसते. परंतु,जेव्हा ती एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत पुढे जाते तेव्हा तिचे बाह्यरुपविषयीचे वैशिष्ट्य कथेत कोणताही बदल न घडविता होत जाते. आजीबाईच्या कथेला सहसा काही नाव नसते. कथेतील लोकांचे वर्णन'तो मुलगा' 'ती मुलगी' 'तो राजा' 'तो न्हावी' 'ती राणी' वगैरे केले जाते. ही कथा सायंकाळी स्वयंपाकघरात मुलांना भरविताना सांगितली जाते.

जेव्हा ही कथा व्रतकथेचा पाया बनते तेव्हा ती भौगोलिकदृष्ट्या विस्तारते. स्वयंपाकघरातून बाहेर पडून जेथे सर्व शेजारी जमू शकतात तिथंपर्यंत पोहचते, जेव्हा ती कथा गीतात येते तेव्हा ती रस्त्यावर, जत्रेत आणि सार्वजनिक उत्सवांमध्ये पोहचते. जर ती कथा साहित्यिक ग्रंथात मोठ्या कवितांच्या किंवा महाकाव्याचा मूळ बनली तर तिला एखादं तत्त्वज्ञान, धार्मिक बाजूदेखील प्राप्त होते. लोककथा आणि आजीबाईच्या कथा जवळ जवळ कधीच मागील जन्माविषयी बोलत नाहीत.

थोडक्यात एखाद्या कलाप्रकाराचे 'सार्वजनिक रूप' समजून घेण्यासाठी आपल्याला त्याचे 'घरगुती' पाळेमुळे त्या कलाप्रकाराच्या जिवंत सामाजिक संदर्भात घरात, कुटुंबात, जातीत, आणि कलाप्रकाराच्या अर्थशास्त्रात पहावे आणि समजून घ्यावे लागते.

भक्तीचे सौंदर्यशास्त्र

भक्ती चळवळीने आपल्या संदेशाच्या प्रसारासाठी प्रामुख्याने संगीत आणि नृत्याची निवड केली. मात्र नाट्यगृहाचा उपयोग केला, तेव्हा तिचा मूळ उद्देश प्रेमरती निर्माण करण्याचाच होता. तिच्या सुरूवातीच्या काळात जवळजवळ ६ व्या ते १० व्या शतकापर्यंत 'भक्ती' सामाजिक प्रश्नांमध्ये गुंतली होती. निश्चितच तिने स्वतःच्या ज्ञानापलिकडील सामाजिक राजकीय जगाचा विचार केला नाही. भक्ती संप्रदायाने बुद्धिझमच्या विनाशात एक भूमिका पार पाडली आहे. मात्र १३ व्या शतकापर्यंत इस्लामी राज्यक-

त्यांच्या आधिपत्याखाली येणाऱ्या उत्तरेकडील भागात 'भक्ती'जसजशी पसरू लागली तसतशी ती सामाजिक, राजकीय क्षेत्रात आधार घेऊ लागली.भक्तीला जिथे लोक प्रत्यक्षात रहातात आणि नाटक उपभोगतात अशा सामाजिक जीवनाशी कर्तव्य नाही.हे अभिनवगुप्ताच्या 'रस' सिद्धांताचा विस्तारच वाटेल. पण प्रत्यक्षात तसे नाही. अभिनवगुप्ताचे सहृदय हे सरतेशेवटी त्याच्या समाजाकडे वळते. त्याला प्रकर्षाने जाणीव आहे की, नाट्यगृहातील 'रस' ही कायमस्वरूपी अवस्था नाही. त्यामुळे नाटकाचे उद्देश हा अजूनही सहृदयाला त्याच्या 'पुरूषार्थाचा' पाठपुरावा करण्याची शक्ती देणे हाच होय.नंतरच्या भक्ती चळवळीतील 'रस' हे प्रत्यक्षात शृंगार हाच एक रस आहे असे घोषित करणाऱ्या भोज राजाच्या प्रतिकृतीवर आधारित आहे.

अशा प्रकारे असे मत प्रतिपादन करणे शक्य आहे की, भक्ती प्रत्यक्षात नाट्य हे एक सामाजिक,राजकीय जगाशी निश्चितपणे निगडीत असलेली आणि त्यामध्येच घडणारी एक क्रिया असल्याचे नाकारते. सर्व कलाप्रकार जिथून स्फूर्ती घेतात आणि ज्यांने भारतीय कलांचे पुनरूज्जीवन केले ते उगमस्थान म्हणजे भक्ती असे मानणाऱ्या अधिकृत सिद्धांताच्या विरोधात वरील स्पष्टीकरण असल्याची जाणीव मला आहे. भक्तीने तिचा संदेश पसरविण्यासाठी तिला उपलब्ध असलेल्या सर्व माध्यमांचा वापर केला. त्यामुळे वारंवार संगीत, नृत्य, नाटकात तिचे पुनर्जीवन होत राहिले. पण भक्तीचा मुख्य पेच किंवा चिंता म्हणजे सौंदर्यशास्त्र नव्हे, तर गूढ तन्मयता होय. दूरदर्शनवरील 'रामायणाने' सिद्ध केले आहे की,अतिशय निकस प्रयोगही भक्तीरस जागवू शकतो- असे आपण म्हणू शकतो की, भारतीय समाजातील सभ्य विभागांमध्ये व निधर्मी नाट्यप्रकारांकडे तुच्छतेने पाहिले जाते यासाठी भक्ती परंपरा जबाबदार आहे. म्हणूनच नव्या आवाजांना खरा अर्थ प्राप्त करून द्यायचा असेल तर नव्या सौंदर्यशास्त्राची गरज आहे.

९ व्या शतकानंतर जेव्हा प्रादेशिक भाषांमधील साहित्य विकसित होऊ लागले तेव्हा नवीन साहित्यांनी .संस्कृतमधील नाटक सोडून सर्व प्रकारांचे अनुकरण केले. प्रांतीय नाट्यप्रकारांनी नेहमीच त्यांच्या वेगळ्या संकेतांना धरून ठेवले आहे.. मला येथे आवर्जून मांडावयाचा मुद्दा असा आहे की, सौंदर्यशास्त्र हा गुंतागुंतीचा विषय आहे इतिहासाकडे पाहता असे दिसते की, बऱ्याच साहित्य प्रवाहांची निर्मिती ही एका विशिष्ट टप्प्यावर सामाजिक अवस्था म्हणजे जात, कुंटुंब, व्यवसाय आणि राजकारण यांच्यापासून विभक्त करू शकत नाही. माझ्या मते, कोणत्याही कलाप्रकाराची अवस्था सर्वप्रथम त्याच्या निकट भौगोलिक,भाषिक आणि सांस्कृतिक तसेच औद्योगिक कलाशास्त्रीय संदर्भात तपासली पाहिजे. भारतात मनोरंजनाचा प्रकार हा सहसा विधीनिष्ठ कार्य गमावलेला विधीप्रकार आहे.संस्कृती, मनोरंजन, विधी सर्व जिथे बराच काळपर्यंत कलाप्रकार म्हणुन एका स्थितीतून दुसऱ्या स्थितीत बदलत असतात. म्हणुन कुठल्याही कलाप्रकाराचा अभ्यास हा अशा दिशेने व्हायला हवा की, जिथे विधी संकल्पनेची दिशा कुंटुंब, जात, जमात, भाषा आणि भूगोलाच्या अंत;करणाच्या दिशेनं असेल.

भारतीय सिद्धांत

कला, इतिहास यांचा सौंदर्यशास्त्रात दडलेला तसेच लावला गेलेला अन्वयार्थ हा संपूर्णपणे एका विशिष्ट राजकीय हेतूने प्रेरीत असतो. पारंपारिक सौंदर्यशास्त्रीय सिद्धांत ज्या पायावर उभे आहेत, तो पाया स्वातंत्र्यपूर्व काळातील 'भारतीय''भारतीय ओळख' आणि 'भारतीय संस्कृती' यासारख्या शब्दांच्या व्याख्येच्या गरजेतून आणि 'आपली संस्कृती' वसाहतवाद्यांकडून आयात संस्कृतीपेक्षा कुठल्याही प्रकारे कमी दर्जाची नाही हे सिद्ध करण्याच्या गरजेतून उभ्या राहिलेल्या इतिहासावर आधारित सिद्धांतांनी बनलेला आहे. भारत स्वतंत्र झाल्यावरही उपरोक्त 'भारतीय' सिद्धांत त्याच्या काही अपरिहार्य बदलांबरोबर चालूच राहिला. 'अनेकतेमध्ये एकता' हे मूळ ब्रीदवाक्य बनले. या एकतेच्या रडगाण्यामागील कारणे स्पष्ट आहेत. स्वतंत्र भारताच्या जन्माला देशाच्या फाळणीची जोड होती. आणि तेव्हापासून देशाची राजकीय एकता ही नेहमीच अस्थिर आणि भेद्य दिसून येते. विभाजनाची भिती एवढी रोगट बनली आहे की, एखाद्या प्रदेशाच्या अवधानाची मागणी किंवा केंद्रप्रभुत्वाविरोधी सांस्कृतिक ओळख ही 'अलगतावाद' वगैरे घोषणांनी झोडपण्यात येते. केंद्र सरकारची अशा सिद्धांतावर मेहेरनजर असल्याने आपण त्याला 'अधिकृत'सिद्धांत म्हणू. अपरिहार्यपणे हा सिद्धांत भारतातील सर्व कलाप्रकारांच्या एकतेवर भर देतो. 'भारतीय नाट्य', 'भारतीय संगीत' वगैरे. संघर्षविरहीत, एकजिनसी 'भारतीय संस्कृती' अस्तित्वात आहे अशा निश्चित विधानावर उपरोक्त कलाप्रकारांच्या एकतेचा 'भारतीय' सिद्धांत उभा राहतो. जेव्हा हा सिद्धांत Performing Art च्या क्षेत्राला लागू करण्यात येतो तेव्हा त्यांचे विधान असते, 'सर्व पारंपारिक प्रकार हे कलेबाबतच्या एका भूसामाईक, सर्व भारतीयांसाठी एकाच तत्त्वज्ञानाची आणि शतकानुशतके बदलाविरहित राहिलेल्या संस्कृतीची अभिव्यक्ती आहे (यात कुठलाच इतिहास-घटक लक्षात घेण्याची गरज नाही!) हिंदु तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात वेद जी भूमिका वठवतात तीच भूमिका 'नाट्यशास्त्र' या वैचारिक संप्रदायात वठवते.

भारतीय परफॉर्मिंग आर्टस् ने प्रचंड विविधतेला नाकारलेले नाही. भिन्न (संघर्षवादी) तत्त्वज्ञान,ऐतिहासिक घटना व सांस्कृतिक वृत्तींनी या विविध प्रकारांना आकार दिला आहे आणि आजही त्यांना प्रवृत्त करू शकतात हे खूप उघडपणे नाकारले जात आहे. 'विविधता' ही मूलगामी एकता दर्शवते यावरच भर दिला जात आहे. या सिद्धांतवाद्यांपैकी बरेचसे खुद्द ब्राह्मणच आहेत. आणि 'भारतीय' म्हणजे 'हिंदू' आणि 'हिंदू' म्हणजे 'ब्राह्मण' अशा अर्थानेच हे तिन्ही शब्द वापरून ते पुढे जातात. बुद्धिझम्, जैनीझम् आणि इस्लाम यासारख्या धर्मांचा आणि इतर जातींचा वाटा मान्य करूनही खरी ओळख अव्यक्त राहाते.

सौंदर्यशास्त्राला बदलावे लागेल

प्रादेशिक व "जमातींच्या कलाप्रकारांचे सांस्कृतीकरण

पान ४८

ना.सं.इनामदारांचे इतिहासविषयक आकलन

किशोर ढमाले

ना.सं.इनामदार हे ऐतिहासिक कादंबरीकार आहेत.सर्व ऐतिहासिक कादंबरीकार प्रत्यक्ष घडलेल्या घटना आणि त्यांच्या कल्पनाशक्तीने व आकलनाने तयार झालेली कादंबरी ह्यात फरक असल्याचे विनम्रपणे मानतात. ना.सं. इनामदारांबाबत मात्र ही भेदरेषा पुसट असल्याचे निदान 'मंत्रावेगळा' या दुसऱ्या बाजीरावाच्या जीवनावरील कादंबरीच्या प्रस्तावनेवरून दिसते. 'मंत्रावेगळा' या कादंबरीच्या प्रस्तावनेत त्यांनी इतिहासलेखनासंबधी विशेषत: एकोणिसाव्या शतकासंबंधी मांडणी केली आहे.

त्यांनी चर्चेत ज्या महत्त्वाच्या गोष्टींना हात घातला त्यासंबंधी त्यांची मते आपण पाहू.

दुसऱ्या बाजीरावाचा इतिहास एकांगीपणे लिहून इतिहासकारांनी त्याच्यावर अन्याय केल्याचे त्यांचे मत आहे. दुसरा बाजीराव भित्रा आणि स्त्रीलंपट होता हे त्याच्या विरोधकांनी हेतूपुरस्सर पसरविलेले समज आहेत असे त्यांचे मत आहे. दुसऱ्या बाजीरावाच्या भित्रेपणाविषयी त्यांचे मत त्यांच्याच शब्दात- 'अष्टीच्या अत्यंत घनघोर रणसंग्रामानंतरची ही नोंद काही वेगळंच सांगून जाते.- बापूचा निरोप ऐकताच तसेच उठोन स्वारी (बाजीराव) म्यानात प्रथम जाली,त्यांची (इंग्रजांची) निकड बहूत जाली. तेंव्हा श्रीमंत घोड्यावर बसले. खासा स्वारी पुढे, तुरूप (टुप-इंग्रजी फौज) मागे याप्रमाणे दोन तीन कोश दवड झाली. राजश्री आबा पुरंधरे व त्रिबंकजी डेंगले मागे जातीने उलटले. परंतु दहा पाच असामी त्याजपाशी राहिले. श्रीमंतांनी नागवी तलवार हाती अर्धा कोशपावेतो घेतली. मागे उलटावयास दोनवेळा पाहिले. परंतु जमाव अगदी नाही, खाशापाशी पस्तिस असामी राहिले होते. गोखले यास समजले की, राजे व श्रीमंत गेले-.

हाती तलवार घेऊन लढण्यासाठी बाजीराव दोनतीन वेळा पहातो, पण बरोबर फारच थोडी माणसं पाहून तो बेत बदलतो, ही घटना बाजीराव भित्रा होता असं नक्कीच सांगत नाही.''

म्हणजे इंग्रजी सैन्य मागे लागले असताना दोन तीन कोस पाठलाग झाला त्यापैकी निदान अर्धा कोसतरी नागवी तलवार बाजीरावाच्या हातात होती व त्याने दोनतीन वेळा मागे वळून पाहिले ते इंग्रजी सैन्य किती जवळ आले यासाठी नसून त्याच्याशी दोन हात करण्यासाठी! असा अन्वयार्थ बाजीरावप्रेमी इनामदार करतात.

लगेच पुढे माहुली मुक्कामी छत्रपतींना आश्वासन देऊनही जेव्हा प्रत्यक्ष अष्टीच्या गडबडीत सातारकर छत्रपती इंग्रजांच्या हाती लागले आणि 'बाजीरावाकडे जाऊन सांगावे की आम्ही सापडलो.पळू नका.माघारी फिरून आम्हास काढून न्यावे.'असा निरोप त्यांनी पाठवला तेव्हा यापैकी कोणतीही कृती न करता बाजीरावांने फक्त कपाळाला हात लावला. यावर इनामदार म्हणतात, छत्रपतीच्या निरोपाप्रमाणे बाजीराव मागे का फिरला नाही याला इतर राजकीय कारणं आहेत.त्यांचा प्रपंच इथं करत नाही.

त्याची कपाळाला हात लावण्याची कृती मात्र इनामदारांना जास्त महत्त्वाची वाटते. खरे तर हा छत्रपतीचा विश्वासघात करून बाजीरावाने दाखवलेला पळपूटेपणा होता, असे कुणीही म्हणेल.पण तो आततायीपणा ठरेल. इनामदार असा आततायीपणा करणार नाहीत कारण त्यांना बाजीरावाला न्याय द्यायचा आहे! भले तो वास्तवावर अन्याय असो की मराठा छत्रपतीवर! इनामदार इतर राजकीय कारणांमध्ये का शिरले नाहीत? प्रस्तावनेत नाही तर निदान कादंबरीत तरी त्यांनी इतर राजकीय कारणांचा उहापोह करायला पाहिजे होता. कदाचित त्यातूनही बाजीरावाचा भित्रेपणा अधिक उघड होण्याची शक्यता त्यांना वाटली असावी.

बाजीरावाच्या स्त्रीलंपट प्रवृत्तीबद्दल इनामदारांनी आनंदीबाईना उदधृत केले आहे.बाजीराव अर्वाच्य होता तर थोरले माधवरावही वेगळे नव्हते अशी तुलना आनंदीबाई करीत आणि दुर्लौकिक दैवाने होतो असे त्या म्हणत.पुढे माधवरावांच्या अर्वाच्यपणा व्यतिरिक्त 'इतर' गोष्टींवरही त्या बोलतात. 'माधवराव असेच.थोरली बाई फार मारीत. परंतु रूबरू मर्यादा फार होती. बाहेर गेल्यावर मनस्वी करीत. असे होते तरी थोरपणी काय केले?.....नानासाहेबांचे वेळेस चांगली दौलत झाली. पुढे माधवराव छाचोरीपणा करीत असत.

या उद्‌गारावर इनामदाराचे भाष्य असे 'अर्थात वरील उद्गारावरून माधवरावाच्या व्यक्तिमत्त्वावर फारसा प्रकाश पडत नसून पडतो तो आनंदीबाईच्या व्यक्तिमत्त्वावर; बाजीरावाच्या बालपणावर.' म्हणजे माधवराव पेशव्यांचा छाचोरीपणा,अर्वाच्यपणा आजपर्यंत इतिहासकारांनी दडवून ठेवलाच आहे तर या निमित्ताने तुम्हीही त्याकडे लक्ष देवू नका. आनंदीबाईचे दैव लक्षात घ्या. तिचे मातेचे मन आणि त्यामनाने केलेली माधवराव व स्वत;च्या मुलाची तुलना लक्षात घ्या. आणि दोघेही सारखेच असताना केवळ बाजीरावाचा दैवाने केलेला दुर्लौकिक पाहून दोन अश्रू गाळा! कोणत्याही परिस्थितीत त्या अर्वाच्यपणाबद्दल तुमच्या मनात संताप येता कामा नये. इनामदार पुढे लिहितात,'बाजीरावाच्या व्यक्तिमत्त्वावर या दिनचर्येत प्रकाश टाकणाऱ्या आणखी दोन नोंदी पहा. 'बाजीराव यास गरमी झाली आहे.बायको थोर नाही..'

' वगैरे.

या सर्व गोष्टी नाना फडणीसांच्या कारकुनाने कळवल्या म्हणून त्या खोट्या असे इनामदार सुचित करतात.

पेशवेकालीन स्त्री शोषणाची वस्तुस्थिती लपविण्याचा अनेक ब्राह्मणी इतिहासकारांचा प्रयत्न असतो. इनामदारांनीही तसा प्रयत्न केल्याचे 'मंत्रावेगळा' चा 'जरीपटका' वाचून कोणी म्हणेलही. परंतु इनामदारांच्या मते तो तत्कालीन समाजाने मान्य केलेला व्यवहार होता. तुम्ही त्याबद्दल एवढी ओरड का करता? पहा त्यांचा कित्ता.'स्त्रियांबाबत बाजीरावाचं वर्तन आजच्या कसोटीला उतरणार नाही हे उघड आहे. पण त्या काळी ज्या चालीरिती अस्तित्वात होत्या, मान्यता पावल्या होत्या, त्याला धरूनच त्याच वर्तन होतं असं सारं उपलब्ध वाङ्मय वाचून माझं मत झालं आहे. कदाचित त्यात काही अधिकउणेपणा असेल...'

सर्व नैतिक मुल्यांचा ऱ्हास झालेली, कनिष्ठ जातींच्या शोषणाचा परमोच्चबिंदू गाठलेली, स्त्रियांना कोणतीही सुरक्षितता नसलेली, जेवणावळीत मग्न ब्राह्मण पेशव्याची कारकिर्द इंग्रजी आक्रमणाला बळी पडली पण ना.स.इनामदारांच्या मते हा पराभव सामाजिक मागासलेपणा, एकात्मतेचा अभाव असलेल्या, जातीपातींनी शतखंडीत झालेल्या, अंधश्रद्धांनी व स्त्रियांच्या गुलामीने भरलेल्या समाजपरिस्थितीचा ऐतिहासिक परिपाक नव्हता. तर तो दैवाचा भाग होता.

दुसऱ्या बाजीरावाच्या बदनामी संदर्भात इनामदार अचानक लोकहितवादींवर घसरले आहेत. लोकहितवादीबद्दल त्यांचे मत 'ज्या काळी मराठी माणसाच्या पाठीवर ममतेने हात फिरवून, त्याच्या डोळ्यातले अश्रू पुसून त्याला दिलासा देण्याची जरूरी होती,त्याकाळात लोकहितवादीत्वाचा बुरखा घेऊन देशमुखांनी समाजाचा तेजोभंग करण्याचे काम मोठ्या निष्ठेने केले.'

पेशवाई बुडाल्याचे कुणाला वाईट वाटले? कोणाच्या डोळ्यात अश्रू आले? पेशव्यांच्या विरोधात कोरेगावची भीषण लढाई महारांनीच केली, आणि आजही महार समाजाला त्याची खंत नाही. ह्याचे कारण उघड आहे. पेशव्यांनी अस्पृश्यांचा आणि शेतकऱ्यांचा जो अनन्वित छळ आपल्या कारकिर्दीत केला त्यामुळे अस्पृश्य व शेतकरी जातींना पेशवाई बुडाल्याबद्दल वाईट वाटलेच नाही. पेशवाई बुडाल्यावर स्त्रियांनी आनंदोत्सव साजरा केल्याच्या कथाही काही वेगळे सांगत नाहीत. वाईट वाटले ते फक्त ब्राह्मण समाजाला. परंतु ब्राह्मण म्हणजेच सर्व समाज. आणि पेशवाई बुडाल्याची व पारतंत्र्य आल्याची चिकित्सा म्हणजे 'तेजोभंग' अशी इनामदारांची गृहितके आहेत.

समाजाच्या मागासपणामुळे गुलामगिरी येत नाही हे सांगत विधवा विवाह विरोध, बालविवाह आणि इतर रूढीपरंपरांचे समर्थन इनामदार करतात. त्यांच्या शब्दांत 'तीच गोष्ट विधवाविवाह आणि इतर तथाकथित अडाणी चालीरितींबद्दल. यामुळे जर गुलामगिरी आली म्हणावी तर अगदी मराठी राज्य उदयाला येत असतानाही हे सारं याच प्रमाणात चालू होतं,तरीही स्वराज्य निर्माण झालं, वाढलं, आणि टिकलं. आणि कोणत्या समाजात अडाणी चालीरिती नसतात? खुद्द इंग्रजांचा सामाजिक सुधारणांचा इतिहास वरवर चाळला तरी अनेक मूर्खपणाच्या चालीरिती त्यांच्यातही आढळतात. फरक एवढाच की, त्यांचा तेजोभंग करणारा कोणी लोकहितवादी त्यात उत्पन्न झाला नाही.'

तेंव्हा अंधश्रद्धा चालू राहिल्या,जातीय शोषण अबाधित राहिले, शेतकरी व स्त्रिया गुलामीत राहिल्या, तरी फारसे बिघडत नाही. वैज्ञानिक प्रगतीला, नव्या संशोधनाला, राष्ट्राच्या पुनरुत्थानाला कोणताही अडथळा त्यामुळे येत नाही असे इनामदारांचे प्रतिपादन आहे.

इनामदारांना युरोपचा इतिहास ज्ञात आहे का? वरील परिच्छेदावरून तरी तसे दिसत नाही. युरोपमध्ये प्रबोधनाची दीर्घ चळवळ झाली. रेनेसॉ चा हा कालखंड अंधश्रद्धा आणि परंपरांना धक्का देणारा होता. धर्मसत्ता व राज्यसत्ता ह्यांची फारकत या काळात झाली. धर्मसत्तेपेक्षा राज्यसत्ता श्रेष्ठ असल्याचा निर्णय झाला. बुद्धिप्रामाण्यवाद, वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या वाढत्या पुरस्काराने नवे संशोधन विकसित झाले. आणि सरतेशेवटी मध्ययुगीन सरंजामशाहीच्या अंध:कारातून युरोप बाहेर पडला.कॅथॉलिक चर्चच्या विरोधात प्रोटेस्टंट संघटीत झाले. पण इनामदारांना हे माहीत नसावे. भारतात हे सारे झाले नाही. जातिव्यवस्थेने व तिच्या धर्मशास्त्रीय समर्थनाने भारतीय समाज आजही सरंजामशाहीच्या अंध:कारातून बाहेर पडलेला नाही. त्यासाठीच एक नाही तर हजारो लोकहितवादींची गरज आहे. पण एक लोकहितवादी झाला तर त्याचे 'तेजोभंग' करणारा म्हणून वासलात लावली गेली.

लोकहितवादींनी बाजीरावसंबंधी 'भट व भडवे मात्र त्याची स्तुती करीत' असे रास्त विधान केले.खरे तर त्याकडे तटस्थतेने बघण्याचे काम इतिहासकारांनी केले पाहिजे.बाजीरावाच्या बेफास गौरवात मनाने पूर्ण गुंतलेल्या इनामदारांना लोकहितवादींनी आपल्यालाच शिवी हासडली असे वाटले आणि मग ते म्हणतात, 'त्यांना त्यांच्याच शब्दांत उत्तर देणे कठीण नाही. पण तेवढं खाली उतरायची माझी तयारी नाही. लोकहितवादींनी समाजाचा जो पद्धतशीर घात केला, त्यापापाबद्दल मला एवढंच म्हणायचं आहे की, लोकहितवादी झाले नसते तर भारतीय स्वातंत्र्य शंभर वर्षे अगोदर आलं असतं! लोकहितवादींनी खरे तर ब्राह्मणांनी इतिहासात केलेली सर्व पापे धुवून काढण्याचा प्रयत्न केला.पण त्यांनाच 'पापी' ठरविण्याचा इनामदारांचा प्रयत्न आहे.

पुढे लोकहितवादींना 'मराठी भाषेचा पिसाळ' अशी पदवी इनामदारांनी दिली. त्यांच्या मते विष्णुशास्त्री चिपळूणकर हे मराठी भाषेचे शिवाजी, लोकमान्य टिळक म्हणजे अमोल रत्न, न.चि.केळकर महाराष्ट्राच्या पांडित्याचे प्रतीक.जे ब्राह्मण्याचे उघड समर्थक आहेत ते महान आणि जे समाजाच्या प्रगतीसाठी जाती-पाती,रूढी परंपरा यांच्या विरोधी

पान ४८ वर

वारकरी साहित्य हाच मुख्य प्रवाह

सदानंद मोरे

प्रश्न :अहमदनगर येथे होत असलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाबद्दल, त्याच्या उत्सवी स्वरूपाबद्दल आपणाला काय वाटते?

डॉ. सदानंद मोरे :साहित्य संमेलनांना उत्सवी स्वरूप बऱ्याच दिवसांपासून येत आहे. त्यामुळे आता ते थांबवणे शक्य नाही.त्यामध्ये फक्त एक करता येईल, उत्सवाप्रमाणेच त्यात साहित्य व्यवहारही गंभीरपणे आला पाहिजे हे पाहिले पाहिजे. उदा. गणपती उत्सवाबद्दल, पूर्वी त्यात व्याख्याने, संगीत, समाजप्रबोधनपर विचार मांडले जात. आता त्यामध्ये रोषणाई वाढली, झगमगाट आला. परत पहिल्यासारखे स्वरूप देता येणे शक्य नाही. ही लोकांची स्वाभाविक प्रवृत्ती आहे. आता साहित्यचर्चा/व्यवहार, पुस्तक विक्री यासारख्या गंभीर गोष्टी त्याचबरोबर घडायला पाहिजे, याकडे लक्ष द्यावे. त्यात एकाएकी बदल करता येणे शक्य नाही.

प्रश्न : केवळ छोटी संमेलने व्हावीत असे काहींचे मत आहे...

डॉ.मोरे : केवळ छोटी किंवा विभागीय पातळीवरील संमेलनेच नको तर अशी मोठी संमेलनेदेखील झाली पाहिजे. उदा. कार्तिकी /आषाढी वारी पण त्याचबरोबर दर एकादशीला पंढरपूरला येणारे वारकरी देखील दिसतात, तसेच ह्याचे स्वरूप असावे.

प्रश्न : मराठी साहित्याचा मध्यवर्ती प्रवाह कोणता? सध्या जी साहित्य संमेलने होतात, त्यांना मुख्य प्रवाह असे अनेकजण मानतात. आपल्याला काय वाटते?

डॉ.मोरे : मराठी साहित्याचा जो विकास झाला तो वारकरी हा केंद्रबिंदू मानूनच. खांबाभोवती असलेला गोल जीना ही उपमा वापरली तर, वारकरी हा खांब, त्याभोवती गोल गोल फिरणारे साहित्य.हा प्रवाह मध्यंतरी सरस्वतीच्या प्रवाहासारखा लूप्त झाला होता.

प्रश्न : प्रवाह असा लूप्त होऊ शकतो काय?

डॉ.मोरे : हो..म्हणजे आधुनिक कालखंडामध्ये पाश्चात्य साहित्यशास्त्र आणि साहित्यविचार भारतात आले, ते नवीन समीक्षाशास्त्र आल्यानंतर. तशा पद्धतीची मांडणी आपल्या साहित्यशास्त्राद्वारे करता येऊ शकते काय? असे पाहायला हवे होते. पण ह्याचा अर्थ असाही नव्हे की येणारी प्रत्येक नवी मूल्ये ही लावून पाहिलीच पाहिजे. पण या नवीन चौकटीत आपले स्थान काय? हे दाखवण्याची जबाबदारी वारकऱ्यांनी घेतली नाही.त्याचबरोबर आपल्याकडील साहित्यिकांनी पाश्चात्य मॉडेल घेतल्यामुळे त्यांनीही ह्या परंपरेचा विचार केला नाही. पाश्चात्य समीक्षाविचार येण्यापूर्वी आपल्याकडे असे काही होते असे त्यांना वाटले नाही. म्हणजे वारकरी वर्तुळाने त्याच्याकडे दूर्लक्ष केले आणि बाहेरच्या माणसांना हे समजले नाही, अशा अर्थाने हा प्रवाह लूप्त झाला होता असे मी म्हणालो.

प्रश्न :सध्या जो मध्यवर्ती प्रवाह मानला जातो तोच मध्यवर्ती प्रवाह आहे का?

डॉ.मोरे : सध्या एकचएक प्रवाह नाही. काहीवेळेला काही लोकांची चलती असते. एकेकाळी स्वामी गाजली, नंतर पु.लं.चे साहित्य आले. मधल्या काळात विश्वास पाटलांची पानिपत आली. तात्पर्य काय की, त्या त्या काळात विशिष्ट अशा लाटा येत असतात, आणि त्याच मुख्य आहेत असे वाटत असते. साहित्यबाह्य गोष्टीमुळे ती कलाकृती केंद्रस्थानी येत असते. सातत्याने वहाणारा एकच एक असा प्रवाह नाही.

प्रश्न : ह्या तथाकथित मुख्य प्रवाहाला दलित,आदिवासी, ग्रामीण साहित्यिक नकार देतात. त्या नकारामध्ये आणि तुमच्या नकारामध्ये काही फरक आहे का? कोणता?

डॉ. मोरे : या साहित्यिकांनी एकच एक असा मध्यवर्ती साहित्य प्रवाह मानलेला आहे, हेच मुळात चूक आहे. साहित्यक्षेत्रात त्या त्या काळात लाटा येत असतात, तो काही सातत्यपूर्ण मुख्य प्रवाह नसतो. त्यामुळे ह्यांचा नकार अप्रस्तुत ठरतो.म्हणजे साहित्य व्यवहार ज्या लोकांच्या हातात आहे त्यांनी लिहिलेले साहित्य म्हणजे मुख्य साहित्य प्रवाह असे म्हणणे चूक आहे. मध्यवर्ती प्रवाह नाही असे मानल्यानंतर त्याची ओरडही अनावश्यक आहे. नव्हे,त्यांनी तथाकथिक मध्यवर्ती साहित्यप्रवाहाला महत्त्वच देवू नये.

प्रश्न: अभिजातता म्हणजे काय? त्याचे निकष कोणते?

डॉ. मोरे : अभिजातता म्हणजे ज्याला आपण क्लासिकल म्हणतो ते. ते चिरकाल टिकणारे असते. ते केवळ विशिष्ट काळात निर्माण होते आणि विशिष्ट काळाची गरज भागवते असे नव्हे तर ते कालाच्या मर्यादा ओलांडून पुढे जाते, त्याला अभिजात साहित्य म्हटले पाहिजे.

प्रश्न: साहित्य आणि चळवळ यांचा परस्परांशी संबंध काय? आणि चळवळीचे साहित्य म्हणून या साहित्याची हेटाळणी केली जाते,त्याबद्दल आपले मत काय?

डॉ.मोरे : केवळ एखादे साहित्य चळवळीत वापरले जाते, या एकाच कारणामुळे ते श्रेष्ठ किंवा हिणकस

पान २७वर

मराठी साहित्य आणि राजकारण

दिनकर साळवे

'येरांनी सांगावी रेमट कहाणी

चित्त रंजवणी करावया

अनुभवा आले अंगा। तेया जगा देतसे

नव्हती हात तुके बोल। मूळ ओल अंतरीची ॥'

संत तुकाराम

१८८५ पासून पहिल्या ग्रंथकार संमेलनाच्या अधिवेशनाने (पुणे) मराठी साहित्य संमेलनांची मुहुर्तमेढ रोवली. या संमेलनाचे निमंत्रण क्रांतीबा जोतीबा फुल्यांना धाडल्याने त्यांनी ब्राह्मणी वर्चस्व असलेल्या या संमेलनाच्या आयोजकास उत्तर पाठवले.

''ज्या गृहस्थांकडून एकंदर सर्व मनुष्यांच्या मानवी हक्कांविषयी वास्तविक विचार केला जाऊन ज्यांचे त्यास हक्क त्यांच्या खुषीने व उघडपणे देववत नाहीत व चालू वर्तनावरून अनुमान केले असता पुढेही देववणार नाहीत. तसल्या लोकांनी उपस्थित केलेल्या सभांनी व त्यांनी केलेल्या पुस्तकांतील भावार्थाशी आमच्या सभांचा व पुस्तकांचा मेळ मिळत नाही- आता यापुढे आम्ही शूद्र लोक आम्हास फसवून खाणाऱ्या लोकांच्या थापांवर भूलणार नाहीत. सारांश यांच्यात मिसळल्याने आम्हा शूद्रादी अतिशूद्रांचा काही एक फायदा होणे नाही, याबद्दल आम्हीच विचार केला पाहिजे. ''

साहित्य संमेलनावरील ब्राह्मणी वर्चस्व

एकशेअकरा वर्षे दीर्घ परंपरा असलेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांकडे आपण नुसती नजर टाकली तर मराठीच्या सांस्कृतिक क्षेत्रातील 'ब्राह्मणी वर्चस्वाचे 'आपणास दर्शन होईल. या एकशेअकरा वर्षांमध्ये फक्त सत्तर साहित्य संमेलने पार पडली. यांत वि.द.घाटे, शंकर पाटील,शांता शेळके आणि.नारायण सुर्वे या ब्राह्मणेतर जातींतील चौघांचा व शंकरराव खरात या एकमेव दलित लेखकाचा अपवाद वगळता सर्वांचे मिळून असणाऱ्या या सांस्कृतिक उत्सवाचा नेता ब्राह्मण व उच्च जातगटातील राहिला आहे. हा नुसता योगायोग आहे काय?

समाजद्रोही निबंधकार

इंग्रजी हे वाघिणीचे दूध पिऊन समाजसुधारणेचे वारे महाराष्ट्रदेशी वाहू लागल्यावर साहित्याचे तारू तरारू लागले हा इतिहास आहे.१९ व्या शतकाच्या अस्तकालात मराठी मनाचे साहित्य स्पंदन हुंकारू लागल्याच्या वेळी इंग्रजी हे वाघिणीचे दूध प्यालेले निबंधकार विष्णुशास्त्री चिपळुणकर सामाजिक बाबतीत भांग प्यायल्यागत वागले. त्यांच्या समाजद्रोही लेखणीला 'भाषाप्रभू' आणि त्यांना 'मराठीचे शिवाजी' ठरविले गेले तर बहुजनांचे दु:ख रांगड्या भाषेत मांडणाऱ्या जोतिबांना ब्राह्मणद्वेष्टे मानले गेले. चिपळुणकरी संप्रदायांनी त्यांना 'धर्मद्रोही' जाहीर करून त्यांच्या लिखाणाची व कार्याची टर उडवली. ब्राह्मण जातीचा अभिमान, अहंकार इंग्रजी विद्या आणि संस्कृत भाषा यांच्या ब्राह्मो-ऍंग्लो संस्कारात मराठीतील शब्दप्रभूंची पिलावळ घडली गेली. यामुळे मराठीचा भाषाव्यवहार बिघडला,ती अविष्कारशून्य होत गेली व एक प्रकारची अल्पसत्ताक ब्राह्मणी वाङ्मयीन अभिरूची रूढ झाली अशी तक्रार डॉ.भालचंद्र नेमाडे व दिलिप चित्रे या लिटल मॅगेझिन चळवळींतील दिग्गजांनी केली आहे.

साहित्य दिंडी

प्रत्येक साहित्य संमेलनाच्या उदघाटन सोहळ्यापूर्वी 'साहित्य दिंडी' काढण्याचा सोहळा पार पडतो. इतर साहित्यग्रंथ बदलले गेले तरी 'ज्ञानेश्वरी' मात्र अव्याहतपणे या ग्रंथपालखीत विराजमान झालेली असते. प्रत्येक संमेलनात 'माऊली'च्या नावाने गळा काढणाऱ्यांनी 'चक्रधरांना' साहित्यिक व्यासपीठावर न्याय दिलेला नाही. ज्याप्रमाणे किर्तनकार आणि प्रवचनकार ज्ञानदेवकालीन सामाजिक संघर्ष दडवून फक्त त्यांच्या चमत्कारांच्या कथांवर भर देतात तद्वत संयोजक वा हे पालख्या वाहाणारे. यांचे ज्ञानदेवांच्या नावाने गहिवरून येणे कितपत अंत:करणापासून आहे याबद्दल शंका आहे.

संयुक्त महाराष्ट्र:यशवंतराव चव्हाण आणि मराठी साहित्य

भाषावार प्रांतरचनेवर आधारित मराठी भाषिकांचे एक राज्य असले पाहिजे, अशी मागणी घेऊन मराठी राज्याच्या प्रस्थापनेचा ठराव मराठी साहित्य संमेलनाने १९५६ साली केला. संमेलनाध्यक्ष अनंत काणेकर मराठी साहित्यातील जटायू आचार्य अत्रे प्रभृतींनी ह्याचा पाठपुरावा केला. मराठी सारस्वतांनी मराठी भाषेच्या मायेपोटी केलेल्या मागणीला राजकीय धार चढून 'संयुक्त महाराष्ट्र समिती'व पुढे आंदोलन उभे राहिले.मराठी माणसाचे इतिहासाचे वेड औरच आहे. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात यशवंतराव चव्हाण मराठी जनतेचा विश्वासघात करून नेहरूंची बाजू घेतात म्हणून त्यांना आचार्य अत्रेंनी,'सूर्याजी पिसाळ' म्हणून हिणवले. तर पुढे क्रमात जनतेच्या रेट्यामुळे महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर चव्हाणांना प्रतिशिवाजी बनवले गेले. यशवंतराव चव्हाणांच्या मैत्रीपोटी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींनी

पान २८ वर

Scanned with CamScanner

मराठी साहित्य संमेलन आणि ब्राह्मणीकरण

प्रा.रणजित परदेशी

फुलेकालीन वासाहतिक जातीसमाजाचे स्थित्यंतर स्वातंत्र्योत्तर काळात निमभांडवली जातवर्ग समाजात झालेले आहे.बदललेल्या सामाजिक-राजकीय व्यवस्थेबरोबर ब्राह्मणी वर्चस्ववादी विचारप्रणाली (ब्राह्मणवाद)आणि तिच्या विरोधातील ब्राह्मणेतरांनी उभी केलेली ब्राह्मण्यविरोधी विचारप्रणाली या दोन्हीतील फेररचनेची मागणी दोन्ही बाजूंच्या प्रस्थापित वर्गांपुढे आलेली आहे.

एका बाजूला फुले-आंबेडकरांच्या विचारांचे ब्राह्मणीकरण आणि दुसऱ्या बाजूला ब्राह्मणी धर्म, इतिहास, राजकारण ते हेडेगेवार-समरसता इ. चे मिथ्या ब्राह्मणीकरण या दोन्ही प्रक्रियांच्या एकजुटीवर नवा ब्राह्मणवाद उभा करण्यात येत आहे.आपल्या वर्गीय -जातीय हिताखातर उच्च जातीय प्रस्थापित ब्राह्मणवादाच्या संकल्पनेचे अद्ययावतीकरण करत आहेत. विरूद्ध दिशेने अशीच प्रक्रिया दलित-ओबीसीतील प्रस्थापितांनी प्रारंभ केली आहे. विद्रोही अब्राह्मणवादातील 'विद्रोही' अंगाना काट देत, 'अब्राह्मणवादी' म्हणून स्वप्रतिमेची विक्री ब्राह्मणी बाजारपेठ सादर करीत आहेत. नव्या अब्राह्मणवादातून ब्राह्मणी प्रस्थापितांशी होणारया युतीला सैद्धांतिक आधार मिळावेत म्हणून वैचारिक मोडतोड करीत आहेत!

ब्राह्मणी साहित्यसंमेलन आणि ब्राह्मणीकरण

१) ब्राह्मणी साहित्य चळवळीच्या जातीयवर्चस्वाच्या विरोधात दलित साहित्य चळवळीचा उदय झाला. तर ग्रामीण साहित्यिकांनी आपली प्रतिक्रिया फुलेवादाची वैचारिक प्रेरणा स्वीकारून दिली. वर्गजातिस्त्रीदास्यअंताच्या प्रेरणेतून दलित,आदिवासी,ग्रामीण संयुक्त महासभेची स्थापना म्हणूनच महाराष्ट्रात झाली. क्रांतीवीर नागनाथ नायकवाडी यांच्या पुढाकाराने वाळवा (जि.सांगली) येथे तिसरे द.आ.ग्रा.संयुक्त संमेलन दि. २० ते २२ जाने.१९९६ या काळात संपन्न झाले. या संमेलनांतील 'फुले-शाहू-आंबेडकर विचार' या संदर्भातील परिसंवादात हरि नरके यांचे भाषण सत्यशोधक विद्यार्थी संघटनेचे किशोर जाधव, सिद्धार्थ जगदेव आणि राजेंद्र जाधव यांच्या नेतृत्वाखाली 'समरसता मंच मुर्दाबाद' अशा घोषणा देवून बंद पाडले. आळंदीच्या अ.भा.म.साहित्यसंमेलनातील परिसंवादात सहभागी होण्याआधी श्री.उत्तम कांबळे (संपादक, दै.सकाळ, नासिक)यांनी 'सत्यशोधक तमाशा'नावाचा लेख (सकाळ;४-२-९६) लिहून भाषण बंद पाडल्याबद्दल स.वि.संघटनेच्या निषेधाची भूमिका घेतली. आम्ही कोणत्या व्यासपीठावर जातो, हे महत्त्वाचे नाही. कोण कोणत्या भूमिका मांडतो,हे महत्त्वाचे' असा युक्तीवाद करून समरसतागमनाचे मिथ्यासमर्थन केले. या भूमिकेमागे पुढील गृहीते आहेत:- अ) समरसता/ब्राह्मणी संमेलने यांच्या व्यासपीठावर पुरोगामी मुखवटा घेवून जाणाऱ्या बुद्धीजीवींचे हेतूही पुरोगामी प्रबोधनाचेच असतात.त्यात व्यक्तिगत पदोन्नती सारखे हितसंबंध नसतात.ब) अशा ब्राह्मणी व्यासपीठांवरील फुले-आंबेडकर विचारांच्या समर्थनामुळे व्यासपीठ/संमेलन नियंत्रक जातवर्गाचे प्रबोधन होते.क)अब्राह्मणी बुद्धीजीवींना आपल्या व्यासपीठांवर स्थान देण्यात ब्राह्मणी अभिजनांचे हितसंबंध जातीअंतक प्रवाहास बलशाली करण्याचे असतात, आत्मटीकेतून सुधारणा करण्याचेच असतात.त्यात साहित्य-संस्कृती क्षेत्रातील स्ववर्गाचे श्रेष्ठत्व टिकवण्याचा हेतू नसतो. ही तीनही गृहीते तपासली तर काय दिसून येते? अ)वर्चस्वस्थानी असलेली ब्राह्मणी विचारधारा विरूद्ध अब्राह्मणी प्रतिविचारधारा यांच्या संघर्षात अंतिमत: विद्रोही अब्राह्मणवादाचाच विजय होतो, असे गृहित धरणे म्हणजे अध्यात्मवाद होय.कारण या परस्परविरोधी अशा वैचारिक भूमिकांच्यामागे ज्या भौतिक शक्ती उभ्या असतात, त्यांना वगळून जात वा वर्ग यांच्या हितसंबंधात बदल घडवून आणता येतो असे ही भूमिका मानते. श्री.पानतावणे समरसता मंचावर १९८५ पासून जात आहेत. 'संघाने सामाजिक समरसतेसाठी संघर्ष द्यावा' असे आवाहन त्यांनी समरसता यात्रा /मेळावे उद्घाटन प्रसंगी दिले. श्री. नरके १९८९ मध्ये समरसता मंचावर गेले. त्यांच्या या समरसतागमनानंतर संघ परिवारातील कार्यकर्ते - सहानुभूतीदार यांचे मतपरिवर्तन झाले आणि त्यामुळे संघ-भाजपाच्या वर्तुळात विद्रोही वा आत्मटीका करणारा गट उभा राहिला असे दिसून आले नाही. उलट पानतावणे, रामनाथ चव्हाण, टेक्सास, नरके यासारख्यांना आपल्या व्यासपीठावर लोळू-बागडू दिल्यानंतर संघ-भाजपने महाराष्ट्रातून हजारो कारसेवक बाबरी मशीद पाडण्यासाठी अयोध्येत पाठवले. पुरूषसत्ताक रा.स्व. संघाची 'पतिव्रता' म्हणून सेवा करणारी 'राष्ट्रसेविका समिती' ही संघटना आहे. तिने 'प्रात:स्मरणिय महिलायें' ही पुस्तिका प्रकाशित केली (१९९०). त्यात माधवराव पेशव्यांची सती गेलेली पत्नी रमाबाई आहे. रा.स्व. समितीच्या लक्ष्मीबाई केळकर आहेत, परंतु स्त्रियांसाठी शाळा चालविणाऱ्या सावित्रीबाई फुले यांचा निर्देश देखील नाही. अब्राह्मणी बळीराजाच्या विरोधात प्रतिक्रांतीचे नेतृत्व करणाऱ्या वामनाच्या मातेचा अद्वितीय गौरव मात्र आहे. दलित-ओबीसीतील सन्मानकांक्षी बुद्धिजीवींनी संघ व्यासपीठांवर शरणागती पत्करल्यानंतरची ही संघात झालेली 'वैचारिक स्थित्यंतरे' आहेत!

संस्कृती, शिक्षण, साहित्यलेखन, प्रकाशन, वितरण, साहित्यसमिक्षण, पारितोषिक प्रदान, प्रसारमाध्यमांद्वारे सन्मान-

पान २९ वर

आता बहुजन साहित्य चळवळ हवी!
बाबुराव बागूल

मी आणि सुर्वे हे अगदी प्रारंभीच्या काळात एकत्र आलो. आम्ही दोघेही जीवनाचा व समाजाचा वेगळा अनुभव घेऊन आलेलो आहोत. फार प्रचंड प्रमाणात वाचून देखील माझे अनुभव मराठी कथा - कादंबरीत आढळत नसल्याने मी असमाधानी होतो. वर्गसमाज असलेल्या युरोपमध्ये इथल्याप्रमाणेच ईश्वर, आत्मा, नरक, स्वर्ग, पाप, पुण्य, धर्म इत्यादी संकल्पना असतानाही तिथे समाजातील सर्व स्तरांतील पात्रे दिसतात. माझ्या जीवनानुभवाशी सुसंगत पात्रे मला मराठीत दिसली नाही. साहित्यशास्त्र व वाङ्मयीन विचार देखील मला माझ्या अनुभवलेल्या वास्तवाशी विसंगत वाटले. म्हणून मी अधिक विचार करू लागलो. तेव्हा मराठी वाङ्मयात सावरकरांच्या प्रेरणेतून निर्माण झालेल्या हिंदुत्ववादी साहित्यात जेवढी मुस्लिम पात्रे आली ती सर्व खलनायकी स्वरूपात आली असे मला आढळले. म्हणून मी अरबी, तुर्की व मुस्लिम संस्कृतीतील लोककथा वाचल्या. त्या लोककथांतून दयाळू, कनवाळू, प्रेमळ, संकटात हात देणारे नायक मला दिसले. याच ओढीतून उर्दू काव्य वाचायला सुरूवात केली. तर तिथे मेहबूबा ही परमेश्वरासदृश्यच बनलेली आढळली. किंवा परमेश्वराइतकीच पूजनीय आढळली, किंवा निसर्गाइतकीच भव्य उदात्त चित्रित केलेली आढळली. तिथे स्त्री ही केवळ भोगदासी आहे असे चित्र दिसले नाही.

अहमदनगर येथे होणाऱ्या सत्तराव्या अ.भा.म.साहित्य संमेलनाच्या निमित्ताने श्री.बाबुराव बागूल, श्री. मा.रा. लामखडे व प्रा.इंदिरा आठवले ह्यांना त्यांची साहित्य संमेलनाविषयी भूमिका दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, वारकरी साहित्य, ब्राह्मणी फॅसिझम्, समरसता मंच इत्यादीच्या अनुषंगाने प्रश्न विचारले होते.त्यांनी आमच्या प्रतिनिधींशी दीर्घ चर्चा करून आपले विचार स्पष्ट केले. त्या मुलाखतीचा गोषवारा येथे देत आहोत.

-संपादक

जातिव्यवस्था टिकवण्यासाठी स्त्रीचा बळी

जातिसमाजामध्ये स्त्री ही फार महत्त्वाची असते. कारण ती परजातीत गेली म्हणजे प्रेमविवाहाने किंवा इतर मार्गाने, तर जाती तुटतील. स्त्री जातींमध्येच राहावी म्हणून पातिव्रत्याच्या कल्पना, बालविवाह, विविध पुराणकथा (Myths) तयार केल्या गेल्या. जेव्हा एखादी स्त्री परजातीतील पुरुषाशी विवाह करते तेव्हा तीला हिंदूजातिव्यवस्था बहिष्कृत करते. हा फार मोठा सामाजिक अपराध ठरवला जातो. अशी स्त्री एखाद्याने जातीबाहेर नेली तर प्रक्षोभ निर्माण होतो हे सामाजिक वास्तव लक्षात आल्याने एखाद्या खानाकडून हिंदू स्त्रिला पळवणे ह्याचा अर्थ त्या वाचकाचे त्या खानाविरूद्ध व त्याच्या धर्म व संस्कृतीविरूद्ध लोकमत तयार करणे असा होतो. असा प्रयत्न पारंपारिक मराठी साहित्यात सातत्याने झाला. फुले व आंबेडकरांच्या लिखाणातून मला काही वाङ्मयीन सूत्रे मिळाली. कादंबरीची नायिका सीतासावित्रीप्रमाणे पारंपारिक असावी की मॅक्झीम गॉर्कीच्या आई प्रमाणे किंवा डॉल्स हाऊसच्या नोराप्रमाणे असावी हा विचाराचा विषय झाला. हिंदू व्यवस्थेत स्त्री ही चिरडली जाते. हे चिरडलेपण दाखविणे आवश्यक होते. माझ्या 'दसऱ्याचा रेडा' या कथेत हे चिरडलेपण आहे व त्याविरूद्ध उठावही आहे.

कष्टकऱ्यांऐवजी ब्राह्मणी नायक

मराठी वाङ्मयात कष्ट करणारा व राष्ट्रीय संपत्ती निर्माण करणारा हा जो बहुजन वर्ग आहे तो कधी कथानायक झाल्याचे आढळत नाही. अर्वाचीन वाङ्मयात ब्राह्मण व क्षत्रिय हे उच्चजातीयच नायक होते. नायक हा संपत्ती व सौंदर्य निर्माण करणाऱ्या कष्टकरी वर्गातील का नाही ह्याची उत्तरे मला फुले आंबेडकरवादात मिळाली.

हिंदूसमाज हा वर्गसमाज नसल्याने व जातिसमाज असल्याने व मनुस्मृतीने ब्राह्मण- क्षत्रिय वर्चस्वच पुरस्कारिलेले असल्याने समग्र हिंदू वाङ्मयात बृहत्कथासागर,पंचतंत्र व इतरही नाटकं, काव्य आदि वाङ्मयप्रकारात कष्टकरी समाज ज्याला शूद्रातिशूद्र समाज म्हणतात याचे चित्रण आढळत नाही. एकही हिंदू देव किंवा देवावतार हा लोहार, सुतार, शिंपी, महार, मांग ह्या जातीतील आढळलेला नाही.एका बाजूला अशी अन्याय्य स्थिती आणि त्यातच एकही तुर्गेनेव, दस्तोव्हस्की, टॉलस्टॉय माझ्या पाठीशी नाही. अशा बिकट अवस्थेत मी सापडलो होतो. म्हणून मी फुले-आंबेडकर-मार्क्स यांच्या विचाराला अनुसरून लिहिण्याचे ठरवले आणि शोषितांना साहित्याच्या प्रांगणात आणण्याचे प्रयत्न केले.

'विद्रोह' नावाची माझी एक लघुकथा भंगीकाम करणाऱ्या मुलावर आहे. त्यात संडास व मलमूत्र ह्याचे वर्णन

पान २२ वर

महाजत्रा बंद करून छोटी साहित्य संमेलने हवीत

प्रा.मा.रा. लामखडे

प्रश्न :अहमदनगर येथे भरणाऱ्या मराठी साहित्य संमेलनाचा खूप गाजावाजा होतोय. मराठी साहित्य, साहित्यिक आणि साहित्य रसिक यांच्या दृष्टीने हे संमेलन मानबिंदू ठरावे असे म्हटले जाते. त्याबाबत तुम्हाला काय वाटते?

लामखडे : एक गोष्ट खरी आहे की, वर्षभर राबून, कार्यकर्त्यांचा मोठा संच उभा करून, मोठे अर्थबळ खर्च करून होणारा समारंभ हा कौतूकाचा भाग आहे. कार्यकर्त्यांच्या आणि संयोजकांच्या परिश्रमाला दाद दिलीच पाहिजे. पण एवढ्या परिश्रमाची निष्पत्ती काय? असा प्रश्न करणेही आवश्यक वाटते. हा वाङ्मयीन सोहळा यशस्वीपणे पार पडावा, त्याबाबत काही शंका, मतभेद असतील, तर ते दूर ठेवावेत व आपल्या परिने योगदान द्यावे असेच मला वाटते. पण संमेलनानंतर काय असा प्रश्न केला तर.. मला वाटते की, भव्य साहित्य संमेलनामुळे डोळे दिपवून टाकणारा समारंभ होईल, पण त्यातून आपल्या पदरात नेमके काय पडणार आहे? 'विक्रमी संमेलन' अशी नोंद करण्याची अपेक्षा कदाचित पूर्ण होईल, पण ह्या महासंमेलनाचे स्वरूप महाजत्रेचे होते असा आजवरचा अनुभव आहे. साहित्य संमेलने वाङ्मयीन वातावरण निर्माण करण्यासाठी असते. नव्या सर्जनशीलतेला खतपाणी घालण्यासाठी असते, हे मान्य केले तर या महाजत्रेपेक्षा विभागीय पातळीवरील लहान लहान संमेलने अधिक उपयुक्त ठरतात असा अनुभव आहे. त्यातील सर्वांचा सहभाग सर्वानांच - साहित्यिकांना, रसिकांना आणि जनसामान्यांना फलदायी ठरतो. छोटी संमेलने फलश्रूतीच्या दृष्टिने खरोखरच मोठी ठरतात असा अनुभव आहे.ग्रामीण,दलित आणि विभागीय पातळीवरील अशी संमेलने म्हणजे वाङमयीन शिबीरेच असतात. प्रशिक्षण वर्गाचे स्वरूप त्याला येत असते. जे घटक साहित्यविश्वापासून उपेक्षिले गेले आहेत, त्यांना सामावून घेण्याची संधी मिळते. महानगरांमधील वाङ्मयीन वातावरणामुळे अशा संमेलनांची गरज तेथील साहित्य वर्तुळाला वाटत नाही. पण ती अफाट पसरलेल्या खेड्यापाड्यातील मराठी भाषिकांना वाटते. ग्रामीण भागात असे प्रयोग राबवले गेले म्हणून तर नव्याने आलेली लेखक-वाचकांची पिढी आज तयार झालेली आहे. दलित,आदिवासी, ग्रामीण साहित्य संमेलनांनी तिला आत्मभान देण्याचा, वाङ्मयीन जाणिवा जोपासण्याचा प्रयत्न चालवलेला आहे. ह्या पातळीवर खूप उपक्रम राबविता येणे शक्य आहे. समारंभप्रियतेचा ध्यास लागलेल्या साहित्य वर्तुळाला व संबंधितांना इकडे लक्ष द्यायला वेळ कुठे आहे? म्हणून छोटी संमेलने ही आजची साहित्यक्षेत्राची गरज आहे.

प्रश्न : प्रस्थापित मराठी साहित्य आणि तुम्ही म्हणता त्या बहुजनांच्या साहित्यामध्ये असा कोणता फरक आहे की ज्यामुळे आज अखिल भारतीय संमेलनाबाबत तुम्ही काही तक्रार करता?

लामखडे : साहित्याच्या क्षेत्रात आशय महत्त्वाचा की अभिव्यक्ती हा वाद जुना आहे. मराठी साहित्याने वेळोवेळी परिस्थितीनुसार कधी आशयाला तर कधी अभिव्यक्तीला महत्त्व दिले. साधारणत: असे म्हणता येईल की, साहित्यातील बहुजन परंपरेने आशय महत्त्वाचा मानला आहे. तर अभिजन परंपरेने अभिव्यक्तीला प्राधान्य दिले. ज्या काळात ज्या प्रवृत्तीचा प्रभाव राहिला त्या प्रवृत्तीची साहित्यनिर्मिती त्या काळात होत गेली. अगदी अलीकडचे उदाहरण म्हणजे १९६० च्या सुमारास 'आशय' महत्त्वाचा मानणाऱ्या साहित्यप्रवाहांचा बोलबाला विशिष्ट सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व वाङमयीन परिस्थितीमुळे सुरू झाला. दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या साहित्य चळवळी आकार धरू लागल्या. त्या चळवळींची मूळे तत्पुर्वीच्या काळातही असली तरी त्यांना योग्य परिस्थिती या काळातच मिळाली. मराठी साहित्यात आलेल्या साचलेपणाला या जीवनाला सामोरे जाणाऱ्या साहित्यचळवळींनी वाट करून दिली. गेल्या तीस पस्तीस वर्षांमध्ये या साहित्य चळवळींनी व तिच्याशी संबंधित साहित्यिकांनी एक वेगळे वाङ्मयीन वातावरण निर्माण केले. व्यापक समाजजीवनाशी असलेले आपले नाते दृढ करत आपले वेगळेपण ठळक स्वरूपात सिद्ध केले. इतकेच नाहीतर आजपर्यंत विशिष्ट अशा सामाजिक-सांस्कृतिक जे जे मराठी भाषिक समाजघटक दबलेले होते, साहित्याच्या क्षेत्रात मूक होते, त्यांना मूखर बनण्याची, लिहिते करण्याची बरीचशी प्रेरणा या चळवळींनी दिली यात शंकाच नाही. मराठीबाहेर ज्या मराठी साहित्याची व साहित्यकृतीची विशेष दखल घेतली जाते त्यात या साठोत्तरी साहित्यप्रवाहांच्या प्रेरणांशी निगडीत साहित्याचा समावेश असतो. दलित, ग्रामीण, आदिवासी, ख़िस्ती, मुस्लिम, भटके, जन, जनवादी, बहुजन, स्त्रीवादी, कामगार, परिवर्तनवादी, पुरोगामी अशा विविध नावांशी संबंधित साहित्य चळवळी व सामाजिक स्तर यांनी साहित्याच्या क्षेत्रात आपले योगदान द्यायला सुरूवात केल्याने मराठी साहित्य आशयघन व नव्या क्रांतीकारी परिवर्तनवादी जाणिवांनी समृद्ध होत आहे. समाजातील बहुजनांना वाङ्मयीन आत्मभान देण्याचे काम या साहित्य चळवळींनी केले आहे. म्हणून तर जेव्हा कुणी ह्या साहित्यप्रवाहांना मध्यवर्ती साहित्यप्रवाहात सामावून घेण्याची भाषा करतो तेव्हा त्याला

पान २४ वर

स्त्री विरोधी साहित्य संमेलनाला नकार

इंदिरा आठवले

भारतामध्ये जातिव्यवस्था आहे आणि हे जातिवास्तव महत्वपूर्ण आहे. शासन शोषणाचे एक शस्त्र म्हणून साहित्याचा वापर येथील ब्राह्मणी साहित्यिकांनी केल्याचे दिसून येते. ब्राह्मणी साहित्यिकांनी आपल्या साहित्यामधून भरताच्या नाट्यशास्त्राला अनुसरून फक्त ब्राह्मण अथवा क्षत्रीय नायकच उभे केले. दलितांना त्यांनी कधीही नायकत्व दिलेले नाही. आणि अशाच प्रकारचा दृष्टिकोन त्यांनी स्त्रियांप्रती देखील दाखवल्याचे आपणास दिसून येईल.

स्त्रियांविषयी ब्राह्मणी साहित्यिक पारंपारिक दृष्टीनेच लिहिताना दिसतात.भारतीय स्त्रीचे चित्र साहित्याने ती सहनशील आहे, वात्सल्याची मूर्ती आहे, सतशील आहे, ती प्रेमळ आहे, त्यागी आहे अशाच स्वरूपात उभे केल्याचे दिसून येते. आणि आधुनिक मराठी साहित्यसुद्धा त्याला अपवाद नाही.

विभावरी शिरूरकर याला काही प्रमाणात अपवाद आहेत. विभावरींची नायिका फार विद्रोही आहे असे नव्हे. पण ती वास्तव आहे हे मात्र नक्की. वास्तविक त्यांची 'शबरी' ही महानायिका होऊ शकली असती,पण तसे घडताना दिसत नाही. 'अभिराम'साठी शबरी नोकरी सोडते आणि 'चूल आणि मूल' हेच स्त्रीचे कार्यक्षेत्र मानते. त्यामुळे विभावरींचा आवाका मोठा असूनही 'शबरी' महानायिका होऊ शकली नाही. ती 'नोरा' होऊ शकली नाही. त्यांनी सावित्रीबाईचा किंवा रखमाबाईचा (घटस्फोट कायदा रखमाबाईपासून आला) आदर्श ठेवायला पाहिजे होता, किमान पंडिता रमाबाई तरी. पण यापैकी कुणीही त्यांची नायिका होऊ शकल्या नाहीत.

असं म्हणतात की, 'नोरा'ने घराचा दरवाजा बंद केला आणि त्या बंद दरवाजाचा आवाज संपूर्ण युरोपभर घुमला. तोच आवाज रांगणेकर-अत्रेच्या रूपाने मराठी साहित्यात अविष्कृत झाला. परंतु त्यांच्या नायिका घराबाहेर पडतात पण सुरक्षिततेसाठी त्या पुन्हा घरात परतताना दिसतात. घराबाहेर त्या स्वतंत्रपणे पाय रोवून उभ्या राहताना दिसत नाहीत. येथील ब्राह्मणी साहित्यिकांची शीलाची कल्पना फक्त स्त्रीच्या योनीशूचितेशी निगडीत आहे. पुरूषांचा भ्रष्टाचार, त्यांचे नैतिक अध:पतन त्यांच्या शीलाच्या कक्षेत येत नाही. जातिव्यवस्था टिकवण्यासाठी ब्राह्मणी साहित्यिकांनी स्त्रीप्रतिमांचा वापर केल्याचे दिसते.

याला थोडाफार शह देण्याचे काम विभावरी शिरूरकरांच्या 'शबरी'ने किंवा गौरी देशपांडेच्या साहित्याने केलेले दिसते. स्त्रीचे फक्त शारीरिक वर्णन करण्यामध्ये आपल्याकडील कलावंतांची लेखणी झिजते. तिचे चित्रण फक्त सेक्सच्या अंगांनेच होते.फडक्यांच्या नायिका या केवळ आंबटशौकिनांसाठी आहेत. असे म्हणून आपल्याला बाजूला होता येणार नाही. कारण फडके हे काही अपवाद नव्हे. तर सर्वांनीच स्त्रियांचे शारीरिक पातळीवरील वर्णन केलेले आहे.तिच्या मानसिक आंदोलनाचा कुणीही वेध घेतलेला नाही. आणि मानसिक अंगांनी जर शोध घेतला गेला असेल तर तोही सेक्सच्याच अंगाने. किंबहुना सेक्सशिवाय दुसरे काही नाहीच. मराठी साहित्याने स्त्रीचे वैचारिक अस्तित्वच नाकारले आहे.तिची प्रतिमा ही आजच्या स्त्रीची प्रतिमा नाही. ती ब्राह्मणी प्रतिमेला पोषक आहे.उदा. गंगाधर गाडगीळ 'तलावातले चांदणे'सारख्या कथा लिहिताना दिसतात. वेगळ्या मार्गाने शोध घेण्याचा प्रयत्न वरेरकरांनी 'बिजली'च्या रूपाने केला. पण तो स्वप्नमय वाटतो. ते वास्तव नाही हे लगेच लक्षात येते.

मराठीत साहित्याने केवळ आशयातच स्त्रियांना स्थान नाकारले असे नव्हे, तर त्याचबरोबर साहित्यसंस्था/ संमेलनांत रास्त हिस्सा दिला नाही. साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान स्त्रियांनी मोठ्या प्रमाणांवर भुषवल्याचे दिसत नाही. दुर्गा भागवत, शांता शेळके हे अपवाद. पण दुर्गा भागवत तर परंपरानिष्ठच आहेत. हे रिडल्सच्या निमित्ताने प्रकर्षाने समोर आले आणि शांता शेळके ह्या त्यांच्यासारखेच लिहितात. त्या प्रस्थापित चौकट तोडताना दिसत नाहीत. ही चौकट तोडण्याचा थोडाफार प्रयत्न विभावरी शिरूरकरांनी केला होता, पण त्यांना त्यांनी कधी अध्यक्ष होऊ दिले नाही.

हे साहित्य संमेलन ब्राह्मणी आहे.जातीवर्चस्वासाठी धडपडताना दिसते त्याचबरोबर ते स्त्रीविरोधीसुद्धा आहे.

स्त्रीमुक्ती चळवळीने साहित्याला नवी जागृती दिल्याचे दिसत नाही. येथील जातीच्या प्रश्नाला स्त्रीमुक्ती चळवळ भिडताना दिसत नाही. त्यामुळे स्त्रीवादी साहित्य हे येथील जातीयवास्तवाचा शोध घेताना दिसत नाही. दलित नाट्यसंमेलनांमध्येसुद्धा स्त्रियांना दूर ठेवल्याचे दिसते. दलित नाट्य संमेलनाने समरसतावाद्यांऐवजी जर मातंग /चर्मकारांना बरोबर घेतले असते तर अधिक बरोबर झाले असते.

उदारमतवादी ब्राह्मणी साहित्यिकांनी थोडाफार विद्रोह करून घराबाहेर पडणारी स्त्री दाखवली तर दलित साहित्यिकांनी ती घराबाहेर कशी उभी राहू शकते ते दाखवले. तिला स्वयंप्रज्ञ बनवून तिचे स्वतंत्र अस्तित्व मानले. बाबूराव बागूलांची 'जानकी' ही 'नोरा'च्या पुढे जाताना दिसते. बाबूराव बागूल काळाच्या बरोबरीने चालणारी नायिका देतात तर ब्राह्मणी साहित्यिक जातवर्गस्त्रीदास्यसमर्थक वेद-

पान २६ वर

साहित्य संमेलने : पुनर्विचाराची आवश्यकता

रंगनाथ पठारे

सत्तरावे संमेलन अहमदनगरला होत आहे.त्यात माझा सहभाग काय, किती,त्यासंबंधी माझी भूमिका काय तसेच निवडणुका, उमेदवारी, लठ्ठालठ्ठी हा पोरखेळ यासारखी वेगवेगळ्या प्रतिक्रिया ज्याच्यासंबंधी आहेत, त्याबाबत मला काही म्हणायचे आहे काय असे अनेक मित्र खाजगीत विचारत असतात. यासंबंधी परोक्ष-अपरोक्ष काही बोलले जाते,काही अंदाज बांधले जातात.काही भूमका उठतात म्हणून आपले म्हणणे स्पष्ट करावे असे वाटते आहे.(मी जरा महत्त्वाचा माणूस आहे अशी गर्भित धारणा हे मांडताना अनुषंगाने येते, त्याला माझा इलाज नाही.)मला जे म्हणायचे आहे ते इस्लामपूर येथे १५ जानेवारी १९९३ रोजी केलेल्या भाषणात मी म्हणालो आहे. यापेक्षा वेगळे काही मला सांगायचे नाही. अधिक सांगण्याजोगे व थोडे निमित्ताने असे मांडतो.

संमेलनांना माझा विरोध नाही. बारकी बारकी संमलने सतत होतच असतात. त्या त्या भागात ज्या चळवळी चालतात, कुतूहल असते त्याचा परिपाक म्हणून ते होतच असते.त्यातून फार काही साधत नसले तरी एक वातावरण राहते. लोक एकत्र येऊन गोळ्यामेळ्याने काही चर्चा करतात. ते चांगले आहे. मुख्य म्हणजे या बारक्या संमेलनात खर्चही फार होत नाही. पण या मोठ्या तथाकथित अखिल भारतीय संमेलन प्रकरणी होणारा खर्च कोटीच्या घरात चाललेला असताना 'कल्चरल ऑडिट'चा मुद्दा निश्चितच लक्षणीय ठरतो. एखाद्या सांस्कृतिक काभासाठी नित्यनेमाने इतका पैसा घालवायचा तर त्यातून Cultural gain काय होतो, हे तपासले पाहिजे. तशी वेळ आता आलेली आहे असे वाटते. मी चंद्रपूरचे (१९७९)साहित्य संमेलन पाहिले. नंतरच्या एवढ्या वर्षात पुन्हा गेलो नाही. गेलो ते परभणीला १९९५.तिथे नारायण सुर्वे अध्यक्ष होते हा एक भाग, आणि माझे तेथील मित्र कवी इंद्रजित भालेराव यांनी मी नुसते तिथे जावे म्हणून एक स्नेहल खेळी केली हा दुसरा भाग. मी गेलो. पाहिले.तेच सारे.अधिक मोठे, विराट झालेले. सामान्य माणूस मोठ्या श्रद्धेने, कुतूहलाने येत असतो. एकूण सारे भव्य प्रकरण,खूषही होऊन जातो. पण तिथे अर्थपूर्ण असे काय घडते? तेच परिसंवाद,चर्चा, भाषणे, त्यासाठी तेच ते लोक, त्यांच्या मैफली, नव्या कवींची आक्रमकता व त्यांचे हाल. वर्षानुवर्षे चाललेले आहे, अधिक भव्य होत आहे, अधिक पोकळ होत आहे.साहित्यव्यवहारात लेखक,वाचक, प्रकाशक, विक्रेते, वाङ्मयीन नियतकालिकांचे संपादक हे महत्त्वाचे घटक, या घटकांनी एकत्र येऊन काही अर्थपूर्ण विचारविनिमय करावा ही प्राथमिक अपेक्षाही तिथे पूरी होत नाही. अव्वल दर्जाचे लेखक या संमेलनांपासून दूर असतात. बारक्या बारक्या संमेलनांना ते जातात कारण तिथे निवडणुका नसतात आणि साहित्याच्या प्रेमापोटी एकत्र आलेल्या आस्थेवाईक समूहाशी संवाद करणे तिथे थोडेफार शक्य होते. बिनीचे लेखक निवडणुकाच्या साठमारीत सहसा पडत नाहीत.आपण होऊन तर नाहीच नाही. मुळातच या प्रकरणी उत्साही असलेले लोक वेगळे असतात. त्यांना साहित्य संस्थांच्या आधाराने सत्तेचे खेळ करण्यात रस असतो. साहित्यसंस्था महत्त्वाच्या आहेत आणि संस्था म्हटल्या की सारे आलेच पण त्यापासून सामान्यत: फटकून राहण्याचीच मोठ्या लेखकांची वृत्ती असते ही वस्तुस्थिती,असा लेखक यात आलाच तर खेळीतले एक प्यादे म्हणून येतो, उमेदवार वगैरे म्हणून. कोणीतरी त्याला गळ घालते आणि तो होकार देतो, आणि यात हमखास निवडून येतो असेही नाही. वाङ्मयीन कर्तृत्व आणि निवडणुक निकाल यांचा सरळ सरळ संबंध पुष्कळदा येतच नाही. दुय्यम वा तिय्यम श्रेणीचे लोकही रीतसर अध्यक्ष म्हणून निवडून येतात. ती लोकशाहीची रीतसर प्रक्रिया आहे. त्यात हे होते.सध्या जे काही चालले आहे, ते तर जबरदस्तच आहे. लोकशाही आहे,आकांक्षांना पंख फुटणे स्वाभाविक आहे.मनास आले की अर्ज भरला जातो. ते काही कोणाच्या हातात उरलेले नाही. ठीक आहे.यातून आपल्या लोकांना काही जाग येईल अशी अपेक्षा करायची.

संवादच नाही

या संमेलनात वाचकाला काय स्थान आहे? तो येतो, हिंडतो, फिरतो, ऐकतो आणि जातो. त्याला बोलायला कुठे संधी मिळते? सांस्कृतिक/साहित्यिक व्यवहारातलो लेखकाइतकाच महत्त्वाचा घटक आहे. किंबहुना वाचणारे आहेत म्हणूनच लिहिणाऱ्याला किंमत वा त्याची पत्रास.एरवी त्याला विचारतो कोण? लिहिणारे व वाचणारे असा'संवाद' या संमेलनात होत नाही.लिहिणारे लोक येत नाहीत. भाषणे करणारे येतात.वाचणारे येतात, वाचणारे त्यांचे श्रोते होतात. सगळे एकतर्फी. नव्याने लिहू लागणाऱ्यांना इथे स्थान नसते.तो आलाच तर तोही श्रोताच.पुस्तके छापणारे/विकणारे यांच्यासाठी काही तंबू असतात.त्यांनी त्यात आपली दुकाने मांडायची.त्यावरून रूसवे फुगवे, भांडाभांडी हे सारे असतेच. पुस्तकांचा खप,त्यांच्या किंमती, त्याची गणिते हे सगळे प्रकरण काही एका मर्यादेपर्यंत वाचकांना सांगू शकतात. चांगल्या पुस्तकाच्या हजार प्रतींची आवृत्ती संपायला अनेक वर्षे लागतात त्यामुळे काय होते वा करावे लागते हे त्यांनी सांगावे. त्यांना तशी संधी मिळावी,त्यांनी त्यांच्या अपेक्षा, अडचणी मांडाव्या, वाचकांनी त्यांची मते मांडावी, मार्ग सुचवावेत. मुख्य म्हणजे त्यांनी आमनेसामने संवाद करावा.नव्या लेखकाने बोलावे. लेखक वाचकांनी बोलावे, वाङ्मयीन नियतकालिके संपत चालली आहेत. त्यांच्या

पान ३२ वर

मराठी भाषा जगणार की मरणार ?

शरद जोशी

साहित्य समृद्ध करायचं तर काय करायला हवं? तुमच्या संमेलनाच्या अध्यक्षांनी आपल्या भाषणात म्हटलं की,'आजची जी काही शिक्षणपद्धती आहे, त्यातील दोन भाषांचा, तीन भाषांचा 'फार्म्युला', आणि ज्या पद्धतीने भाषा शिकवली जाते हे सर्व पहाता मराठी भाषा लवकर मरेल असं दिसतं.' त्याचं कारण एका वाक्यात सांगायचं झालं तर, गरीब लोकांची भाषा श्रीमंत असू शकत नाही. हा विचार तुम्हा साहित्यिकांना पटणार नाही. तरीही मी सांगतो. आज तुम्ही ज्या काळातल्या साहित्याची वाखाणणी करीत आहात. त्या काळातील मंडळींच्या जीवनाकडे पहा. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वर घ्या. त्यांचा जन्म, मातापित्यांची आत्महत्या,समाजाने घातलेला बहिष्कार या सर्वांमुळे ज्ञानेश्वर सर्व आयुष्य जळत जळत जगले, समाजाने दिलेले सर्व हलाहल त्यांनी पचवले म्हणून त्यांच्या तोंडून अमृतमयी ओवी निघाली.सकाळी कॉलेजमध्ये जाऊन दोनतीन 'लेक्चर'च्या पाट्या टाकून घरी आलेल्या माणसाच्या हातून,बालपणीच्या संस्कारातून लाभलेली जी काही साहित्याची आणि प्रतिभेची शिदोरी असेल ती संपेपर्यंत साहित्यनिर्मिती होईल, पण त्यानंतर पारितोषकाच्या लिखाणापलिकडे काही होणार नाही.

मला संपन्नता म्हणजे काय म्हणायचं आहे ते थोडं स्पष्ट करतो.मला गरिबीचं कौतुक केलेलं आवडत नाही.प्रदेश गरीब असला तरी त्याचं साहित्य मोठं असतं ही गोष्ट खोटी आहे. संख्याशास्त्रीयदृष्ट्या, गरिबीतही एखादा कुणी प्रकांड प्रज्ञेचा मनुष्य निघू शकतो, नाही असं नाही, म्हणजे तो गरिब असूनही (in spite of poverty) तसा असतो. पण संख्येने पाहिले, साहित्याची एकूण निर्मिती पाहिली तर तो अपवाद ठरतो. साहित्य किंवा प्रतिभा कशातून जन्मते? वरून कुठूनतरी एकदम प्रतिभा शिरते, अंगात सरस्वतीचा संचार होतो आणि मग ' जे न देखे रवि, ते देखे कवि' असं म्हणून साहित्य तयार होतं अशी जर कुणाची कल्पना असेल तर मग जन्मांधसुद्धा निसर्गकविता लिहू शकेल! खरं तर तुमच्या शब्दांचा, प्रतिभेचा फुलोरा हा तुमच्या अनुभवाच्या संपन्न भूमीतून वाढत असतो. मग, ज्याच आयुष्य दरिद्री, पैशानं नव्हे,तर अनुभवानं ,ज्याचं आयुष्य अनुभवाच्या विविधतेनं नटलेलं नाही अशा माणसांच साहित्य हे फक्त मुंबईच्या लोकल गाडीतील प्रवासातच वाचायच्या लायकीचं होतं. आणि आज वस्तुस्थिती अशी आहे की, मराठीतील 'मान्यवर' लेखकांचं साहित्य हे लोकल गाडीत जर का खारे दाणे विकत घ्यायला खिशात पैसे नसतील तर शेजाऱ्याकडून घेऊन वाचण्यालायक साहित्य झालं आहे.

माझे एक गुरु डॉ. सुमंत मुरंजन,त्यांनी आतरराष्ट्रीय नाणेव्यवस्थेमध्ये काम केलं आहे.कोरियाचं युद्ध झाल्यानंतर अमेरिकेनं त्यांना 'अमेरिकेतील चलनवाढ कशी थांबवावी' यावर चर्चा करण्यासाठी बोलावलं होतं. अशा या आंतरराष्ट्रीय मान्यतेच्या माणसाने 'आंतरराष्ट्रीय नाणेव्यवस्था' हे पुस्तक मराठीत लिहिलं. लोकांनी त्याच्यावर फार टीका केली, लोकांनी म्हटलं, 'हे पुस्तक इंग्रजीत लिहायला हवं होतं. मराठीत लिहून काय उपयोग?' ही १९५५ ची गोष्ट आहे. टीकाकारांना डॉ. सुमंत मुरंजनांनी उत्तर दिलं,'माझ्या अनुभवांच्या आधारे ज्यांना आंतरराष्ट्रीय नाणेव्यवस्थेचा अभ्यास करायचा असेल त्याने मराठी भाषा शिकावी अशी माझी इच्छा आहे' इतकी हिम्मत दाखविण्यासाठी तुमचा अनुभव समृद्ध आहे का? कॉलेजच्या या मुलीनं कॉलेजच्या त्या मुलाकडं पाहिल्यानंतर त्या दोघांचे डोळे एकमेकांच्यात मिसळल्यानंतर जी काही किलबिल किलबिल होते त्याची काव्यं किती वेळ लिहिणार? या किलबिलीशिवाय तुम्हाला काही वेगळ्या पद्धतीनं लिहायला नको का? का शंभर वर्षांपूर्वी तुमच्या आजीआजोबांच्या मनात ज्या किलबिली होत होत्या त्याच किलबिली अजून चालू आहेत? काही नवीन आणाल तर साहित्य होईल.तीच ती शिळी कढी किती वेळ तुम्ही पुन्हा पुन्हा उकळणार आहात?

सगळ्या देशातली ही गरिबी कच्च्या मालाचं जाणीवपूर्वक शोषण केल्यामुळे तयार झाली आहे हा माझा अनुभवावर आधारित सिद्धांत आहे. आणि तो सत्य आहे यात काही वाद नाही. हा सिद्धांत,त्याचा अभ्यास, त्याची आकडेवारी महाराष्ट्रातल्या शेतकरी आंदोलनाने तयार केली आहे, आणि हे सर्व मी मराठीत लिहून ठेवलं आहे. माझ्याकडे, अगदी हार्वर्डपासून अनेक विद्यापीठातले, शेतकरी संघटनेच्या अर्थशास्त्रावरील पी.एच.डी.चे अनेक प्रबंध आहेत.ते लिहिणाऱ्यातले निम्मे तरी लोक परदेशातील आहेत.ते मला म्हणतात की, 'तुम्ही हे सर्व लिखाण कधीतरी इंग्रजीतून करायला पाहिजे' त्यांना माझंही उत्तर माझ्या गुरुंनी दिलेलचं.'शेती अर्थव्यवस्थेचा अभ्यास ज्याला माझ्या मांडणीच्या अंगाने करायचा आहे त्यांनी मराठी शिकलं पाहिजे'

साहित्यवेलीला लागलेली कीड जर मारायची असेल तर आधी त्या वेलीवर वेगळी वेगळी पानं येतील असं काही तरी करा.त्यासाठी, काही वेगळे अनुभव येतील असं काहीतरी करा.हे काही मी साहित्यिकांवर नुसती टीका करण्यासाठी बोलत नाही. मी ज्या काही दोन गोष्टी मांडतो आहे त्यांचा तुम्ही गंभीरपणे विचार करावा

पान ३७ वर

साहित्यक्षेत्रातील पुरोहितांची मक्तेदारी मोडा

डॉ. बाबा आढाव

बर्ट्रांड रसेल या तत्त्वज्ञाने मानवी संस्कृतीची दोन लोभसवाणी वैशिष्ट्ये सांगितली आहेत.पहिले कलात्मक सर्जनशीलता आणि दुसरे चिंतनशीलता. अशा वैशिष्ट्यांबद्दल फार अभिमानाने बोलता येईल, अशी मराठी भाषेची स्थिती नाही. किंबहुना संस्कृतोद्भव भाषांची परिस्थितीही अशीच आहे. विद्यमान मराठी भाषिक व साहित्यिक याबद्दल मनात खंत बाळगून आहेत.त्यापैकी काही जणांना मराठी भाषेचे वैभव लोप पावत असल्याबद्दल प्रामाणिकपणे दु:ख होतांना दिसते.काही मंडळी साहित्य जगतातील फाटाफूटीबद्दल कपाळाला हात लावून बसतात. गोव्यात राहणाऱ्या मराठी भाषिकांना कोकणी-मराठी वादाने जर्जर केले आहे.तिकडे बडोद्यातील मराठी मंडळी गुर्जर भाषिक राज्यामुळे गत इतिहासातील आठवणी काढून उदासीन बनलेली आहेत. वऱ्हाडी बोलीत नवे साहित्य आकाराला येऊ लागल्याने अनेकांना नवे दुखणे झाल्यासारखे वाटते.''मराठीच्या या पोटभाषा ग्रांथिक स्वरूपाच्या नाहीत'' अशा तऱ्हेचे पालुपद घोकून ही मंडळी वास्तवाला सामोरे जाण्याचे एनकेन प्रकारेण नाकारीत आहेत. ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य याबद्दलही असेच म्हणता येईल. साहित्यातील या प्रक्रिया स्वाभाविक वाटतात.

आशय महत्त्वाचा मानल्यानंतर भाषेचा मुद्दा आपोआपच गौण ठरतो. त्यामुळे भाषेचा उच्चार,शुद्धलेखन इ. मुद्दे तांत्रिक बनतात. आजवर या तंत्राच्या भांडवलावर अनेकांनी पौरोहित्य केलेले आहे. या साहित्यिक पुरोहितांनी तंत्राचा आग्रह धरून मराठी भाषेचे अमाप नुकसान केले आहे.तो त्यांचाही दोष नाही. आपली समाजव्यवस्था त्याला जबाबदार आहे. वर्ग-जाती व्यवस्थेने व कर्मविपाक सिद्धांताने येथल्या जनसामान्यांच्या जीवनातील कलेचे अंकुर व विचारांचे मोड अगदी प्रथमपासूनच चिरडून टाकलेले आहेत.आपल्याजवळ असे काहीतरी आहे याची जरा देखील जाणीव यामुळेच निर्माण होऊ शकलेली नाही. जेथे माणसांच्या जीवनातील अस्सल हुंकार शब्दबद्ध होऊ शकत नाही तेथे जातिवंत साहित्याची निर्मिती कशी होणार? मराठी भाषेचे करंटेपण यात साठवले आहे. साहित्यिक पुरोहितांना मात्र याची खंत कधीच वाटलेली नाही. त्यांना स्वयंतुष्टतेने ग्रासलेले आहे.त्यांची मने जुन्या व्यवस्थेत, जून्या मूल्यात रममाण होतात. पाश्चिमात्य वाङ्मयातून उसन्या बाबी उचलून 'मुखवटे' मात्र 'आधुनिक' ठेवले जातात. अलिकडे ग्रामीण व दलित साहित्याने हे मुखवटे टरकावण्याचा चंग बांधलेला दिसतो. त्यात एक सामाजिक प्रक्रिया स्पष्टपणे जाणवते.

ग्राम्यभाषा म्हणजे शिवीगाळीची भाषा, खेडवळ भाषा म्हणजे अडाणीभाषा, असंस्कृतभाषा अशी समिकरणे एके काळी तयार झाली होती. आता 'ग्रामीण' 'खेडूत' 'दलित' या शब्दामागे सघन आशय निर्माण झालेला आहे.ग्रामीण व दलित साहित्यिकांचे आकलन मोठे आहे कारण त्यांच्या जीवनात हरघडी संघर्ष निर्माण होत आहे आणि या संघर्षातून त्यांच्या साहित्याचे सर्जन होत आहे. परंतु ग्रामीण व दलित साहित्यिकांनी केवळ आक्रोशावर मदार ठेवून भागणार नाही. केवळ 'भावविरेचन' करून काय साध्य होणार? त्यांनी आपल्या साहित्याची समीक्षा केली पाहिजे. त्याची कसोटी आहे, जीवनमूल्यातील परिवर्तन. स्वातंत्र्य, समता व सहजीवन ही आधुनिक मूल्ये आपल्या आक्रोशाच्या गर्भात जाणवतात काय? हजारो वर्षांच्या विषमताधिष्ठीत सांस्कृतिक जीवनाविरूद्ध अंगार पेटतो काय? का या अर्थव्यवस्थेत आपल्याला मान्यता मिळत नाही म्हणून आपले मन कुढत रहाते? याची उत्तरे मनोमन दिली पाहिजेत.

साहित्यिकांना उद्याची स्वप्ने पडतात असे म्हणतात. ग्रामीण व दलित साहित्यात समताधिष्ठीत समाजाची स्वप्ने रंगली पाहिजेत.उत्पादनक्षम समाजात समता म्हणजे विकासाची समान उंची. अशी संधी आमच्या खेडवळ बहिणीला मिळाली तर तिचा हुंकार शब्दबद्ध होऊन मराठी साहित्य अस्सल, अभिजात बनल्याशिवाय राहणार नाही. यासाठीच साहित्यिक पुरोहितांची मक्तेदारी मोडून काढली पाहिजे. भारत हा कृषीप्रधान देश आहे, हे पुन्हा सांगण्याची गरज उरलेली नाही. मग 'कृषीसंस्कृती' हा शब्द प्रचारात आणणाऱ्यांना ग्रामीण साहित्याचे वावडे वाटण्याचे कारण नाही.

❖❖❖❖❖

(पहिले ग्रामीण साहित्य संमेलन, बोटा येथे दि. १७-१८ फेब्रुवारी १९७९ रोजी झाले. त्यामध्ये डॉ. बाबा आढाव यांनी उद्घाटनपर भाषण केले. त्यांनी व्यक्त केलेल्या विचारांची महत्ता आजही कमी झालेली नाही. म्हणून ते भाषण आम्ही येथे छापत आहोत - संपादक)

दलित-आदिवासी-ग्रामीण संयुक्त साहित्य प्रवाह

डॉ.भारत पाटणकर

दलित-आदिवासी-ग्रामीण संयुक्त साहित्य प्रवाहाचा उदय म्हणजे गेल्या दीड हजार वर्षांच्या आर्थीक,सामाजिक,सांस्कृतिक क्षेत्रातील परिवर्तनाच्या प्रक्रियेचा अपरिहार्य परिपाक आहे.त्याच-बरोबर गौतम बुद्धांच्या काळापासून (किंबहुना त्याही आधी-पासून) आजपर्यंत चालत आलेल्या सांस्कृतिक संघर्षाच्या विक-सनशील प्रक्रियेतील तो सुसंगत विकास आहे.मानवमुक्तीच्या साहित्याच्या उगमाकडे जाणाऱ्या पावलांची ती खूण आहे.

इंग्रजांची वासाहतिक सत्ता भारतीय उपखंडात प्रस्थापित होण्याआधी राजेशाही शासनसत्ता आणि मूलत: जातीव्यवस्थाक शोषणावर आधारलेली ब्राह्मणी उत्पादन पद्धती हे इथल्या सामाजिक-आर्थीक व्यवस्थेचे व्यवच्छेदक लक्षण होते.ज्ञान घेणे आणि ज्ञान देणे या दोन्ही अधिकारांपासून शूद्र,अतीशूद्र आणि स्त्रिया यांना वंचित ठेवले गेल्याचा हा काळ होता.ही सामाजिक -आर्थीक व्यवस्था समूळ नष्ट करणारी क्रांतिकारक चळवळ या काळात उभी राहिली नाही तरी तिच्या नियमांना धक्का देणारे विविध क्षेत्रातले संघर्ष महाराष्ट्रात यादव राज्याच्या काळापासून विविध क्षेत्रात उभे राहिलेले दिसतात. साहित्याच्या क्षेत्रात महाराष्ट्रात उभा राहिलेला सर्वात मोठा आणि प्रदीर्घकाळ चाललेला महत्त्वाचा संघर्ष या काळात वारकरी पंथातील संत कवीनी उभा केलेला दिसतो.शूद्र,अतीशूद्र आणि स्त्रिया या तिन्ही शोषित विभागांमधून पुढे आलेल्याया संत कवींनी 'कवित्व' करण्याचा अधिकार प्रस्थापित करून ज्ञान घेणे आणि ज्ञान देणे या क्षेत्रात त्यांच्या अधिकारांवर लादलेल्या बंदीला उधळून लावले. ब्राह्मण जातीत जन्मलेले संतही यामध्ये होते.त्यांना ब्राह्मणी प्रवाहाने वाळीत टाकले होते, त्यांचा छळ केला होता. एवढेच नाही तर या संत कवींनी,पिढ्यानपिढ्या ज्याना ज्ञान घेण्यादेण्याचा खास आणि मक्तेदारी अधिकार होता,त्यांच्या साहित्याला कस्पट ठर-विण्याइतकी सकस साहित्य निर्मिती केली. मानवमुक्तीचे साहित्य निर्माण होण्याच्या प्रक्रियेचा मराठी भाषेत पाया घातला.

इंग्रजी वासाहतिक सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर म.जोतीबा फुले यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या सत्यशोधक प्रवाहाने ब्राह्मणी उत्पादन पद्धतीचा पाया असणाऱ्या जातिव्यवस्थाक शोषणाविरूद्ध आणि पितृसत्ताक पिळवणुकीविरूद्ध संघर्ष उभा केला. मराठी साहित्याच्या क्षेत्रात पुन्हा एकदा,या एकंदर चळ-वळीशी सुसंगत,ब्राह्मणी प्रवाहाला आव्हान देणारे मानवमुक्तीचे साहित्य निर्माण होण्याची प्रक्रिया सुरु झाली.या काळात ब्राह्मणी प्रवाहातून निर्माण होणाऱ्या इंग्रजी आणि संस्कृत भाषेच्या प्रभु-त्वातील साहित्य प्रवाहाशी पूर्ण फारकत घेणारे पाऊल या शूद्रातिशूद्र स्त्री मुक्तीवादी प्रवाहाने उचलले. वारकरी संतक-विंच्या पुढे जाणारे हे पाऊल होते.प्रस्थापित ब्राह्मणी साहित्य प्रवाहाचे त्याच्यात समाविष्ट होण्याचे निमंत्रण नाकारण्याइतके हे पाऊल ठाम होते. म.फुले, लोखंडे,भालेकरांपासून ते मुकुं-दराव पाटील,पंढरीनाथ पाटील,जेधे-जवळकर ते क्रांतीसिंह नाना पाटील आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यापर्यंत चालत आलेल्या या प्रवाहाने मुळातूनच सर्व ब्राह्मणी सामा-जिक सांस्कृतिक परंपरांना नकार दिला.हे सुद्धा वारकरी संत कवींच्या संघर्षाला पुढे नेणारेच पाऊल होते.पण या बरोबरच या प्रवाहाने शूद्र-अतिशूद्र आणि स्त्रिया या विभागांना शिक्ष-णाच्या विस्तारित क्षेत्रात अधिकार गाजविण्याच्या परिस्थितीत आणणारी प्रदीर्घ चळवळ केली.राजर्षी शाहूंसारख्या जाती-व्यवस्था विरोधी महत्त्वाचे पाऊल टाकणाऱ्या समाजपुरुषाची या प्रवाहाला एका कालखंडात महत्त्वाची मदत झाली, आधार मिळाला.शिक्षणाच्या क्षेत्रात झालेल्या क्रांतिकारक प्रक्रियेचे दूरगामी परिणाम भविष्यातील दलित, ग्रामीण, आदि-वासी,स्त्री इत्यादी साहित्य प्रवाहांच्या निर्मिती संबंधात झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेली, ब्राह्मणशाही व भांडवलशाही यांचा संयुक्त अंत करण्याची चळवळ वेगळ्या पद्धतीने मानवमुक्तीच्या साहित्य प्रवा-हाच्या निर्मितीचा पाया घालणारी ठरली. शूद्रातिशूद्र-स्त्रियांच्या शोषणावर पोसलेल्या ब्राह्मणी उत्पादन पद्धतीच्या डोक्यावर बसून तिच्या आवश्यक तेवढ्या विघटनातून विकास पाव-णाऱ्या भांडवली उत्पादन पद्धतीत याच जाती-लिंग विभागां-मधली बहुसंख्य जनता कामगार, शेतमजूर, गरीब-कष्टकरी शेतकरी अशा वर्गसंबंधांतून शोषली जाण्याच्या वास्तवाची नेमकी नोंद डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घेतली.त्या आधा-रावर त्यानी एका नव्या सांस्कृतिक, सामाजीक आणि राज-कीय चळवळीची आणि वर्गीय-जातीय आघाडीची मांडणी त्यांनी केली.यामुळे अधुनिक काळातील मानवमुक्तीच्या साहि-त्याचा आधार जास्त सघन झाला.

स्वांतत्र्योत्तर काळाच्या पहिल्या दशकानंतर या सर्व परंपरांनी सुरू केलेल्या सामाजिक -सांस्कृतिक प्रक्रियांचे परिणाम उत्स्फुर्तपणे वेगेवेगळ्या शोषित समाजविभागांम-धून उभरून यायला सुरूवात झाली. शूद्रातिशूद्र -स्त्रिया या नात्याने आणि त्याचवेळी कामगार, शेतमजूर, गरीब-कष्ट-करी शेतकरी या नात्याने जात-वर्ग आणि स्त्री या स्वरूपात होणाऱ्या शोषणाच्या अंताची एकसंघ चळवळ उभी राहा-ण्याच्या अभावामुळेही साहित्य क्षेत्रात उभरणाऱ्या उर्मी वेग-वेगळ्या स्वरूपात आकार घेत गेल्या.

दलित साहित्य, जनवादी साहित्य, आदिवासी साहित्य,स्त्रीमुक्तीवादी साहित्य,ग्रामीण साहित्य, मुस्लिम साहित्य

पान ३८ वर

विषमताविरोधी व समतावादी साहित्याच्या नामकरणाचा प्रश्न

कॉ.शरद पाटील

वाळव्याला (जि.सांगली) 'तृतीय दलित-आदिवासी-ग्रामीण संयुक्त साहित्य संमेलन' घ्यायच्या प्रयत्नांतून काही मूलभूत प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यांचे निराकरण करण्यासाठी हा लेख.

बहुजन व इतर पर्याय

४-७-९५ ता.च्या 'सकाळ'मधील 'भारतीय समाजक्रांतीवरील इतिहासाचे प्रेतओझे' या लेखात मी 'दलित-आदिवासी-ग्रामीण संयुक्त साहित्य महासभे'च्या ८७ साक्री संमेलनातील स्थापनेपासूनच्या वाटचालीची रूपरेखा मांडली होती. तिसरे संमेलन घेण्यासाठी वाळव्याला १३ ऑगस्टला झालेल्या बैठकीत महासभेचे नामांतर 'बहुजन साहित्य महासभा' असे करायची सूचना बाबूराव बागुल यांनी मांडली.माझी सूचना 'अब्राह्मणी साहित्य महासभा' अशा नामांतराची होती. प्रश्न आहे विषमताविरोधी व समतावादी भारतीय साहित्याच्या नामकरणाचा.

'बहुजन' हा शब्दप्रयोग प्रथम बुद्धाने केला. त्याचा भिक्षु-भिक्षुणींना आदेश होता-' चरथ, भिक्खवे,चारिकं बहुजनहिताय बहुजनसुखाय!' त्याने वर्णान्तक समाजक्रांतीसाठी समर्पित भिक्षु-भिक्षुणींचा संघ उभा केला, आणि संसारात राहून समाजक्रांतीचे पार्टटाईम काम करणाऱ्या उपासक-उपासिकांचे संघटन तयार केले. उरलेली जनता ही बहुजन होती. हे बहुजन भिक्षुभिक्षुणी व उपासकउपासिका यांच्याप्रमाणे समाजक्रांतीचे कर्ते नव्हते,तर विषय होते. बौद्ध परंपरा ही भारतीय इतिहासातील सर्वात जूनी समाजपरिवर्तक परंपरा असली तरी ती बहुजनांना अविद्याग्रस्त, म्हणजे विषमतेचे बळी म्हणते, आणि त्यातून त्यांच्या मुक्तीचा दावा करते. जनता इतिहास घडवते हे मार्क्सवाद्यांचे, कम्युनिस्ट-सोशालिस्टांचे प्रतिपादन रोमन्टिक आहे. ती स्वयमेव इतिहास घडवीत असती तर तिने युरोपात समाजवादाचा निःपात होऊ दिला नसता, किंबहुना तो करण्यात ती सहभागी झाली नसती.

बामसेफने तर बहुजनवाद हे आपले तात्त्विक अधिष्ठान बनवले आहे.बहुजन म्हणजे ब्राह्मण सोडून सर्व भारतीय धर्मांच्या जातीजमाती(ओबीसी, दलित,आदिवासी) या सर्व ब्राह्मणेतर जातीजमातींमध्ये ब्राह्मणी थर तयार झाल्याचे सांगून या नवब्राह्मणी थरांविरूद्धही संघर्ष करायचा तो दावा करतो आणि असा संघर्ष जातीजमाती एकजिनसी मानणारे आंबेडकरवादी करायला तयार नाहीत म्हणून त्यांच्यावर टीका करतो. ही भूमिका पुढारलेली असली, तरी हे नवब्राह्मणी थर भारतीय समाजाच्या भांडवलदारी विकासात तयार झाल्याने ते जातजमात्यंर्गत वर्ग आहेत हे मान्य करायला तो अजून तयार नाही. 'मूलनिवासी'मध्येतो ब्राह्मणांचा समावेश करायला तयार नाही. पण ऐतिहासिक वस्तुस्थिती ही आहे, की वर्णव्यवस्था इराणी भटांनी वा आर्यांनी बाहेरून आणलेली नसून तिचा जन्म भारतातच झालेला आहे. दा.ध. कोसांबींनी प्रथम मांडले की, गोत्रकर्त्या ऋषींमध्ये केवळ विश्वामित्र हा पितृवंशक वा आर्य होता तर वसिष्ठ, मरीचि, अत्रि, अंगिरस, पुलस्त्य, पुलह व ऋतू हे सप्तर्षी मातृवंशक असल्यामुळे सिंधुसंस्कृतीतील होते. पण, त्यांनी वर्णाचा अर्थ इतर इतिहासतज्ज्ञांप्रमाणे रंग हाच घेतल्याने ते या अपूर्व शोधाचा तर्कशुद्ध पाठपुरावा करू शकले नाहीत. ते काम मला करावे लागले. म्हणून ब्राह्मण हे परकीय नसून मूलनिवासीच आहेत. आजच्या ब्राह्मणांमध्ये बहुसंख्य हे दरिद्री असल्यामुळे त्यांना ब्राह्मणी व शत्रुगोटामध्ये ढकलणे जात्यन्तक मुक्तीच्या रणनीतीला सोडून होईल. ब्राह्मण्याचा स्रोत जरी ब्राह्मण वर्णजाती असला तरी ब्राह्मण्य हे सर्व ब्राह्मणेतर जातीजमातींना व्यापून आहे असे स्वतः बामसेफ मान्य करतो. दलित, आदिवासी व ओबीसी कर्मचाऱ्यांनी जात्यंतक मुक्तीपासून अलिप्त न राहाता तीत पुढाकार घेतला पाहिजे हा आंबेडकरांचा संदेश घेऊन बामसेफ स्थापन झाल्याचे त्याच्या फोल्डरमध्ये म्हटले आहे. म्हणजे बामसेफ हा पारंपारिक आंबेडकरवाद्यांशी सहमत नसला, तरी आंबेडकरवादीच आहे.. आंबेडकर हे ब्राहणजातीविरोधी नसून ब्राह्मण्यविरोधी होते हे ब्राह्मण सहकाऱ्यांना वगळायची ब्राह्मणेतर पक्षाच्या पुढाऱ्यांची मागणी आंबेडकरांनी नाकारली यावरून स्पष्ट झालेले आहे.आंबेडकरांची ही भूमिका बामसेफ विसरला, तर त्याची बहुजन आघाडी जात्यन्तक न राहाता जातीयवादी होईल.आंबेडकर श्रद्धाळूपणे न स्वीकारता चिकित्सकपणे स्वीकारला पाहिजे ही बामसेफची भूमिका बरोबर आहे.कालामांना बुद्धाने केलेला जगप्रसिद्ध उपदेश बुद्धिप्रामाण्याचाच होता. पण, ज्या विद्यमान जातवर्गीय समाजव्यवस्थेला मूठमाती द्यायची आहे त्याचे ऐतिहासिक व वर्तमानकालीन भान ठेवून आणि आपल्या डॉग्मॅटिक संकल्पना त्याच्यावर न लादता आंबेडकरवादातील कालबाह्य काय व कालातीत काय हे ठरविले पाहिजे. पारंपारिक आंबेडकरवादी बामसेफला आंबेडकर वादाचा शत्रू ठरवायचा जो प्रयत्न करीत आहेत तो अयोग्य आहे. पारंपारिक आंबेडकरवाद्यांना आंबेडकरवादाचा ब्राह्मणी लोहियावादाशी समन्वय चालतो, मग बामसेफचा आंबडेकरवादी बहुजनवाद का चालू नये? (लोहियावादाला मी ब्राह्मणी बहुजनवाद म्हणतो, की तो जातिविरोधक असला, तरी त्याचा तत्वज्ञानात्मक पाया ब्राह्मणी अध्यात्मवाद आहे आणि त्याचे महत्तम महापुरूष ब्राह्मणी राम किंवा कृष्ण आहेत,अब्राह्मणी बुद्ध नाही.) जात्यन्तक मुक्तीशी बांधिलकी असलेल्या सर्व दलितदलि-

पान ३९ वर

औरंगजेब आणि जोशीच्या निमित्ताने

महेबुब सय्यद

प्रा.जावदे 'पाशा' यांचा औरंगजेब आणि जोशी हा कथा-संग्रह वाचला आणि खुप दिवसात काही चांगले वाचल्याचे समाधान लाभले.जावदे पाशा यांच्या कथा ह्या रूढ,पारंपारिक अशा उच्चजातवर्गीय सदाशिवपेठी साहित्यिकांच्या चौकटीत बसणाऱ्या नाहीत, हे नक्कीच. मराठी भाषिक मुस्लिमांची वेदना, त्यांची व्यथा या कथांमधून जागोजाग प्रकट झाली आहे.मुस्लिम मानसिकतेसह मराठी भाषिक मुस्लिमांची अत्यंत प्रत्ययकारी आणि वास्तवपूर्ण चित्रण लेखकाने केलेले आहे. मुस्लिम समाजाचे भावविश्व, त्यातील ताणतणाव, या सर्वांचे अत्यंत उत्कटतेने आणि सह्रदयतेने जावदे पाशा यांनी चित्रण केले आहे.

मराठी साहित्य विश्वात मुस्लिम समाजाचे पहिल्यांदाच अशा प्रकारचे वास्तववादी चित्रण येताना दिसते. अन्यथा मराठी सारस्वतकारांनी मुस्लिम धर्म,संस्कृती, जीवन, व्यक्ती यांचे मराठी साहित्यात जेवढे विकृत चित्रण केले आहे तेवढे इतरत्र सापडणे कठीण आहे.जर्मन साहित्यात ज्यूंचे विकृत चित्रण करण्यात आले. परंतु अशा विकृत चित्रणाची अखंड परंपरा युरोपच्या वर्गसमाजात निर्माण होऊ शकली नाही.कारण तेथील अभिजनांचा सामाजिक पाया बदलत्या वर्गव्यवस्थेचा होता. या उलट भारतात अभिजनांचा सामाजिक पाया स्थिर जातिव्यवस्थेचा राहिल्याने मुस्लिम विरोधी विकृत चित्रणाला जातीपरंपरेचे सातत्य लाभले.

आपटे, भावे, सावरकर

आधुनिक मराठी भाषेचे जनक किंवा मराठी भाषेचे वॉल्टर स्कॉट म्हणून ओळखले जाणारे ऐतिहासिक कादंबरीकार ह.ना. आपटे आपल्या साहित्यातून मुस्लिमांचे विद्रुपीकरण करतात.त्यांच्या 'वज्राघात' 'गड आला पण...' 'उषःकाल' या सारख्या ऐतिहासिक कादंबऱ्या, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवरील कथा यामधून मुस्लिमांचे विकृत चित्रण साकारतात.

ब्रिटीश वसाहतवादी शासनाच्या वर्चस्वाखाली राजकीयदृष्ट्या दबलेले असल्यामुळे त्यांच्यावरील मध्ययुगीन तुर्क मोगल राजवटींचे समीकरण ते मुस्लिमांच्या राजकीय वर्चस्वाशी करतात आणि न्युनगंडातून मुस्लिम विकृतीकरणास प्रारंभ करतात. ह.ना.आपटे यांचे चित्रण हा अपवाद नव्हता. ह.ना. आपटे एक प्रतिभावान मध्यमवर्गीय साहित्यिक होते. त्यामुळे ब्राह्मणीजातीतील मुस्लिमद्वेषाची परंपरा त्यांच्या साहित्यात अविष्कृत होताना दिसते. तर सावरकर हे आपटेंच्या मर्यादा ओलांडून मुस्लिम द्वेषाचे शिखर गाठतात. कारण सावरकरांच्या काळात ब्राह्मणी हिंदूराष्ट्रवादाला समांतर अशी मुस्लिम उच्च जातीयांची मुस्लिम राष्ट्रवादाची चळवळ उभी राहिली होती. ब्राह्मणी राष्ट्रवादाला तो असह्य धक्का होता. कर्मठ ब्राह्मणी विभागाचे ते प्रतिनिधी होते. परंतु गांधीवादी जनआंदोलनामुळे स्वातंत्र्य आंदोलनातून दूर फेकले गेलेले ते नेते आहेत. आपली भयग्रस्तता,न्यूनगंड यांचा बळी ते मुसलमानांना करतात. ब्रिटिशांच्या प्रत्यक्षातील शक्तीसंपन्न 'खलनायकाविरोधात' लढण्याची राजकीय शक्ती नसल्यामुळे सावरकर मुस्लिमांना शत्रू लेखतात.ब्राह्मणी हिरोची प्रतिमा अधिक तेजस्वी व्हावी म्हणून मुस्लिम प्रतिमा अधिक काळीकुट्ट करतात.त्यांचा हा वारसा पुढे दुसरे ब्राह्मण लेखक भावे आधिक कलात्मकतेने मराठी कथेत आणतात.मराठी साहित्यात मुस्लिम खलनायकाच्या खलत्वाच्या अभिव्यक्तीचे अंतिम टोक गाठतात. याचे कारण जातीय वर्चस्वाच्या, सामाजिक, सांस्कृतिक श्रेष्ठत्वाच्या गंडामुळे ब्राह्मण म्हणून असे साहित्यिक स्वजातीच्या खलत्वाला जाणीवपूर्वक लपवितात. पेशवाईतील शूद्र शेतकऱ्यांवर लादलेली हिंसा वा आधुनिक समाजातील ऐतखाऊ जीवन यांचे खलनायकत्व त्यांच्या स्वतःकेडे असते परंतु ते लपविल्यानंतर त्यांना मुस्लिम खलनायक म्हणून उभा करणे भाग पडते.महाराष्ट्रातील सामाजिक वास्तवाशी जिवंत संपर्क तुटल्यामुळे आणि डोळे साता समुद्रापलिकडच्या ऐदी आणि भोगी जीवनाकडे लागल्यामुळेही ब्राह्मण साहित्यिक भ्रांत रंजनवादाच्या किंवा आक्रमक धर्मांधतेच्या आहारी जाऊन मुस्लिमांचे विकृतीकरण करताना दिसतो.

विकृतीकरणाची गरज का भासते?

मुस्लिमांचे विकृतीकरण केवळ आपटे,सावरकर, भावे, बी.रघूनाथ, पेंडसे आदि साहित्यिकांनीच केले आहे असे नाही तर सेतू माधवराव पगडी, गो.नी.दांडेकर, विद्याधर गोखले इ.लेखकांच्या लिखाणात तसेच स्वतःला पुरोगामी म्हणवणाऱ्या लेखकांच्या लिखाणातसुद्धा मुस्लिम व्यक्ती येतात त्या बहुधा खुनी, बलात्कारी, माथेफिरू,धर्मांध, स्वार्थी आणि गुन्हेगार म्हणूनच. कारण महाराष्ट्राच्या सामंती समाजात देशपांडे, देशमुख, कुलकर्णी म्हणून ब्राह्मणांना जी जातीय आणि राजकीय सत्ता होती, त्यातून समाजाचे खलनायकत्व ब्राह्मण जातीकडे जाते. खून आणि बलात्कार सावकारीतील अत्याचार आणि आर्थिक शोषण याची प्रमुख जबाबदारी ब्राह्मण जातींकडे जाते. म. फुले 'शेतकऱ्याचा आसूड' मधून हेच 'ब्राह्मणी कसब'उघड करतात.' ब्रिटीश राजवटीत सत्ताभ्रष्ट झालेल्या साहित्यिकांची ब्राह्मणी नेणीव हे कटू वास्तव स्वीकारण्यापासून त्यांना परावृत्त करते.आपल्या खलनायकत्वाचा आरोप ते मुसलमानावर लादून साहित्याच्या दरबारात एक भ्रांत समाधान इतिहासातील पराभवावरील सूडभाव व्यक्त करतात.

पान ४५ वर

सौंदर्य आणि स्पर्धा
भांडवलशाहीचा अश्वमेध
महेश गावस्कर

बंगलोरमधील जगतसुंदरी स्पर्धेची पंगत नुकती सुरू झाली तोच डिसेंबरमध्ये होऊ घातलेल्या सुपर मॉडेल स्पर्धेच्या मेजवानीकडे मुंबई आ वासून बसली आहे.पण एका विश्वसुंदरी वा जगतसुंदरी स्पर्धेला 'टार्गेट' करण्यात काय अर्थ आहे? खरं तर दररोज, हरपल तशाच धर्तीच्या कार्यक्रमाची उधळण प्रसारमाध्यमातून होत आहे. धंदेवाईक चित्रपट, जाहिरात व्यवसाय, म्युझिक व्हिडीओ, फॅशन शो आणि या सर्वांना मुखरीत करणारी 'ग्लॉसी मॅगेझीन्स' यांच एक व्यापक जाळं विणलं गेलं आहे. परंतु जगत-विश्वसुंदरी स्पर्धा ते निमित्त पुरवतात ज्यात भांडवली मूल्यव्यवस्थेचा अर्क थोडक्यात परंतु ठळकपणे चिन्हांकित केलेला दिसतो.

त्याचबरोबर अशा प्रतिमांना मिळणारी मान्यता आणि समर्थन डाव्यांच्या सांस्कृतिक राजकारणापुढील पेच अधिक गंभीर करतात. जमातवादाने भारतीय राजकारणात अलीकडे माजवलेल्या अकांडतांडवाच्या तुलनेत भांडवली विचारसरणीचा मुक्त शिरकाव सत्कृतदर्शनी कमी समाजविघातक जाणवतो.खासकरून,जमातवादाने घडवलेल्या प्रतिगामी स्त्री प्रतिमांच्या तुलनेत भांडवली स्त्री प्रतिमा मुक्तीदायी वाटणं स्वाभाविक आहे.

सोव्हिएत युनियन आणि पूर्व युरोपातील कम्युनिस्ट राजवटीच्या पाडावानंतर बाजारपेठीय अर्थकारणाला पर्याय नाही, असं अनेकांना वाटू लागलं. त्यामुळे बाजारपेठीय अर्थकारणाची मुकुटमणी ठरणारी प्रतीकं घाऊक स्वरूपात मायदेशी आणण्यात अभिमान बाळगला जाऊ लागला. एवढंच नव्हे,तर स्त्री प्रश्न आणि जातीचा प्रश्न मार्क्सवादाशी सांगड न घालता मुक्त अर्थव्यवस्थेतूनच सुटतील असं मांडलं जाऊ लागलं. सौंदर्यस्पर्धा हे सुद्धा स्त्रीशक्तीचं प्रदर्शन आहे असं शिकवलं जाऊ लागलं. असंघटित क्षेत्रातील महिलांनी सहकारी पतपेढी काढणं, लोकप्रतिनिधींमध्ये स्त्रियांसाठी ३३ टक्के आरक्षण मिळवणं आणि चित्रविचित्र कपड्यांत 'कॅटवॉक' करणं ही सर्व स्त्री शक्तीची रूपं ठरवून स्त्रियांमधील जात व वर्ग या निकषांवरील दूही बोथट करण्यात येत आहे. एखाद्या निम्न मध्यमवर्गीय किंवा कृष्णवर्णीय किंवा मूक-बधिर मुलींच्या सौंदर्याची जगासमोर दाद देऊन, वांशिक, वर्गीय आणि अपंगत्वाच्या भेदभावास जुमानत नाही,हे प्रतिकात्मकरीत्या भांडवलाला दाखवून देता येतं. सुंदरी जेव्हा वंचितांच्या कल्याणासाठी आणि जगात शांतता आणि सलोखा प्रस्थापित व्हावा अशी भाषा करतात तेव्हा भांडवल त्यांच्या तोंडून बोलत असतं.आजच्या घडीला भांडवलशाही आपला विजयोत्सव साजरा करत आहे. ती अधिक ठाशीवरीत्या घोषित करत आहे की, हे जग आपल्याला आंदण द्या, शासन,समूह, कुटुंब या पर्यायी व्यवस्थांनी भांडवलांचं वर्चस्व स्वीकारावं. सर्व दुनियेची काळजी घेण्यास भांडवल समर्थ आहे. पण खरंच आहे का?

भांडवलशाहीचा उदारमतवाद व्यक्तीचं स्तोम माजवतो, त्याचं चोचले पुरवतो आणि बाजारपेठीय प्रक्रियेच्या बाहेर फेकलेल्यांकडे क्रयशक्ती नसल्याचं कारण सांगून हात झटकतो. उदारमतवाद हा भांडवलशाहीचा राजकीय Dogma आहे. याच उदारमतवादाचे गेली शंभर वर्ष जगभर धिंडवडे काढले गेले असतानासुद्धा आज भांडवलशाहीच्या विजयी क्षणी त्याचं महात्म्य गायिलं जाणं सहाजिकच आहे. परंतु याच उदारमतवादाच्या चौकटीत हे विचारलं जात नाही की अफगाणिस्तानमध्ये स्त्री-स्वातंत्र्याची गळचेपी करणाऱ्या तालिबानचं समर्थन करण्यास उदारमतवादी अमेरिका का पुढे सरसावते? इथे हे सांगणं आवश्यक आहे की कम्युनिस्ट राजवटींचा पाडाव म्हणजे वर्गीय राजकारणाचा अंत नव्हे. कारण वर्गीय राजकारणाचा अन्योन्य संबंध मार्क्सवादाशी नसून भांडवलशाहीशी आहे.भांडवलशाही वर्गीय शोषण नाकारू इच्छिते आणि मार्क्सवाद ही पहिली विचारसरणी ठरली जिने भांडवलशाहीचा वर्गीय पाया दाखवून दिला.त्यामुळे जोपर्यंत भांडवलशाही अस्तित्वात आहे तोपर्यंत वर्गीय राजकारण अस्तित्वात राहील आणि जोपर्यंत वर्गीय राजकारण अस्तित्वात आहे तोपर्यंत मार्क्सवाद राहील. आज असं भासवलं जात आहे की समाजवादासाठी कोणतीही मागणी म्हणजे घडाळ्याचे काटे मागे फिरवणं. समाजवाद्यांना मूलतत्ववाद्यांच्या पंगतीत बसवण्यात आलं आहे. समाजवादाने घडवलेली स्त्रीची पुरोगामी प्रतिमा पुसण्यात येत आहे. सुश्मिता सेन आणि ऐश्वर्या राय यांनी भारताचं नाव जगाच्या नकाशावर नेल यासाठी त्यांच्यावर स्तुतीसुमनं उधळली जात आहेत. परंतु सेन-राय प्रभृतींच्या अगोदर मेधा पाटकरांनी नर्मदा बचाव आंदोलनातर्फे पर्यायी नोबेल पारितोषिक स्वीकारलं तेव्हा त्यांनी भारताचं नाव जगाच्या नकाशावर नेल्याचे ढोल बडवण्यात आले नाहीत. का? कारण सेन-राय मंडळी खुल्या अर्थकारणाच्या गणितात फिट बसतात तर मेधा पाटकर भांडवली शासनप्रणीत विकास प्रक्रियेलाच आव्हान देतात.

आज भांडवलशाहीची भिस्त सांस्कृतिक क्षेत्रातील गुंतवणुकीवर आहे. अजूनही अर्ध्याहून अधिक जग पादाक्रांत करायचं आहे. या अर्ध्याहून अधिक जगात मोठ्या बाजारपेठा आहेत. या जगाची सांस्कृतिक ठेवण वेगळी राहिलेली आहे.ती सांस्कृतिक वैशिष्ट्य जपत परंतु बाजाराच्या आवाक्यात आणत भांडवलशाही आपला अश्वमेधी घोडा रेटू पाहात आहे. सौंदर्य अशा व्यूहरचनेच्या दृष्टीने मोक्याची जागा आहे,जी भांडवलाच्या अंकित झाली तर

मोठ्या जनसमूहाला बाजारपेठेच्या दावणीस बांधता येईल. एके काळी अन्न, वस्त्र, निवारा 'जड' राजकीय अर्थशास्त्रातील विषय समजले जात. परंतु जाहिरात व्यवसायाच्या सौंदर्यीकरणाने अन्न, वस्त्र, निवारा हे साजुकसे, अराजकीय, व्यक्तिगत अभिरूचीस प्राधान्य देणारे विषय बनले.लोकांच्या कामना करमणुकप्रधान कार्यक्रमांतून सुखोपभागाच्या मार्गाने वळवण्यात भांडवली प्रसिद्धीमाध्यमांचा मोठा हातभार आहे.बाजारपेठीय सौंदर्याचं धुरीणत्व प्रस्थापित करण्याचा मनोदय आहे.सौंदर्य स्पर्धांतून सौंदर्याची संकल्पना बदलण्याचे क्रांतीकारक दावे करण्यात येत आहेत(जणू काही अन्य विचारसरणीमध्ये इंद्रीयजन्य सौंदर्याची जाणच नाही.)

सौंदर्यस्पर्धा हा भांडवलशाहीच्या स्वप्नरंजनाचा भाग आहे ही नावालास्पर्धा आहे परंतु त्यात हितसंबंधाच्या संघर्षाचा कुठेही लवलेश नाही.इथे एकदिवसीय क्रिकेट सामन्याची चित्तथरारक लढतही नाही किंवा स्टेफी ग्राफ आणि मोनिका सेलेसच्या झुंजीचं सामर्थ्यही नाही, इथे प्रांताप्रांताच्या वैशिष्ट्यांचा बाजारपेठेमार्फत भांडवलाने नियंत्रित केलेला संगम आहे. इथे 'स्पर्धे'तून बाद झालेले अलगदपणे धुक्यात जातात. त्यांच्या अलविदा मध्य शोक पण नाही. इथे मीडियाच्या जागतिक प्रकाशझोतात प्रतिस्पर्धकांमध्ये अलिंगन आणि चुंबनांचा वर्षाव आहे. सगळं वातावरण कसं कृत्रिमरित्या सारवलेलं.. असा सत्तासंघर्षविरहित जगाचा नमुना भांडवलाने विक्रीस काढला आहे आणि त्याच्या संमोहनाला भलेभले बळी पडत आहेत.

आभार ...

नीलिमा बंडेलू	**सुधीर वाडेकर**
ए.व्ही. शिवरात्री	**प्रसन्ना पाटील**
भास्कर कोल्हे	**रविंद्र घोडराज**
युवराज बावा	**अतिक अहमद**
प्रतिमा परदेशी	**विठ्ठल बुलबुले**

या अंकाच्या निर्मितीप्रक्रियेत वरील मित्रमंडळीनी सक्रीय सहकार्य दिले. त्यांचे आभार मानणे त्यांना आवडणार नाही. पण तरीही ...

आमच्या भावना व्यक्त केल्याशिवाय राहावत नाही म्हणून ...

मन:पूर्वक आभार

संपादक मंडळ

भाषिक संस्कृतीचा आशय आणि रंगनाथ पठारे

प्रा. रंगनाथ पठारे यांनी पुणे म.सा.प.ने भाषिक संस्कृतीच्या बदलत्या भूगोलाची दखल घेतलेली नाही अशी तक्रार को.म.सा.प.चा उल्लेख करून केली आहे. मौज प्रकाशन गृहाच्या बुजूर्ग लेखकांची संमेलन अध्यक्षपदाची हौस भागवण्याचा प्रयत्न को.म.सा.प. च्या आतापर्यंतच्या संमेलनात आलेला दिसतो.हा केवळ दुधाची तहान ताकावर भागविण्याचा प्रश्न नाही. को.म.सा.प.च्या निमित्ताने उरल्या सुरल्या मराठी ब्राह्मण वर्गात सांस्कृतिक सत्तेचा झगडा तीव्र होत आहे. कोकणस्थ ब्राह्मण वर्गाच्या वाढत जाणाऱ्या वर्चस्वाला काटशह देण्यासाठी देशस्थ ब्राह्मणांचे वर्चस्व असलेली पुणे म.सा.प., को.म.सा.प.ला संलग्न संस्था म्हणून मान्यता देत नाही. सत्यकथाकारांचा को.म.सा.प.हा आधुनिक अवतार आहे.कोकणच्या लाल धुरळ्यात को.म.सा.प. च्या संमेलनात कोकणी खोतांचे आणि नारळांच्या बागांचे उदात्तीकरण गडद होत जाणार. भाषिक संस्कृतीच्या बदलत्या भूगोलाचा हा ब्राह्मणी आशय पठारे लक्षात घेत नाहीत. केवळ छोट्या संस्था आणि प्रादेशिक संमेलने यांचा मुद्दा पुरेसा नाही. का? कारण विदर्भ साहित्य संघाची वेगळी संमेलने पूर्वीपासूनच होत आहेत.परंतु, तरीही या.वा.वडस्कर, सुभाष सावरकर, यशवंत मनोहर या वैदर्भीय बहुजन लेखकांना जनसाहित्य, दलित साहित्य चळवळीच्या आणि छोट्या संमलेनाच्या वेगळ्या चुली मांडाव्याच लागल्या. वैदर्भीय ब्राह्मणांनी पुणेरी ब्राह्मणांचाच कित्ता गिरवला आहे. म्हणुनच भाषिक संस्कृतीच्या बदलत्या भूगोलाविषयी पठारे जेव्हा बोलतात आणि त्या आधारे आपल्या संस्थात्मक रचनांमध्ये धुरीणांनी बदल करावा असे आवाहन करतात तेव्हा भाषिक संस्कृतीच्या आशयाचे व वर्चस्ववादी भूमिकांचे प्रश्न अनुत्तरीत राहिल्याचे लक्षात येते.

संस्थात्मक रचना या भूगोलापेक्षाही भाषिक संस्कृतीच्या आशयावर अधिक अवलंबून असतात. प्रचलित मराठी साहित्य महामंडळ, म.सा.प. इत्यादी रचना ब्राह्मणांनी आपल्या सांस्कृतिक वर्चस्ववादी आशयाला धरूनच उभ्या केल्या आहेत. या आशयाहून भिन्न आशय प्रकट करणाऱ्या कोणत्याही प्रवाहांना ते समान वागणूक देत त्यात सहभागी करून घेतील हे शक्य नाही. म्हणूनच अब्राह्मणी सांस्कृतिक प्रवाहांना स्वत:च्या आशयाला अनुरुप संस्थात्मक रचना काबाडकष्ट करूनच उभ्या कराव्या लागणार आहे. नेमक्या अशाच ठिकाणी पठारेंसारखे लेखक कचखाऊ भूमिका घेतात.

के.डी.

पीनं ११ वरून

आहे. त्याशिवाय भंगीपण सिद्धच होत नाही. मी ते वर्णन विचारपूर्वक टाकले. संपादकाने सांगितले, 'हे जे नरकाच्या डब्याचे व मासिकपाळीच्या फडक्याचे वर्णन पार किळसवाणे वाटते ते काढा' मी ते काढण्यास नकार दिला. ती कथा सुप्रसिद्ध चित्रकार दिनानाथ दलाल यांच्या 'दिपावली' मासिकात जशीच्यातशी प्रसिद्ध झाली. ह्या कथेतील ती वर्णने काढून टाकण्याचा सल्ला संपादक का देत होते ह्याचे कारण म्हणजे ते वर्णवर्चस्ववादी ब्राह्मण होते हे आहे. मी ठरवले की, मराठी वाङ्मयाच्या संकेताने लिखाण करायचे नाही तर जागतिक वाङ्मयाच्या संकेतानुसार लिहायचे व त्याप्रमाणे मी लिहायला सुरूवात केली.

लिटल मॅगेझीन चळवळ समग्र क्रांतीची पुरस्कर्ती नव्हती.

लिटल मॅगझीन चळवळ आर्थिक,राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक,वैचारिक क्रांतीचा पुरस्कार करणारी चळवळ नव्हती. सत्यकथा मासिकाविरोधात ही मंडळी होती. सत्यकथेच्या वैचारिक व वाङ्मयीन धोरणाला तिचा विरोध नव्हता. लिटल मॅगझीनमधील वाङ्मय हे फारसं वेगळं वाङ्मय नव्हतं. मराठी वाङ्मयाचे सदाशिव पेठी स्वरूप सोडून काही नव्या प्रवृत्ती म्हणजे रशियामध्ये मॅक्झीम गॉर्कीचा सोशॅलिस्ट रिअलिझम, सार्त्र, कामूचा अस्तित्ववाद, इतर काहींचा अनार्किझम, किंवा महात्मा फुलेंनी सांगितलेला अब्राह्मणीवाद किंवा सत्यशोधक समाजाचा विचार, लिटल मॅगझीनवाले स्वीकारत नव्हते.

'विद्रोह', 'मैदानातील माणसं', 'दसऱ्याचा रेडा' किंवा 'लूटालूट' ह्या कथा व त्याचकाळातील माझ्या कविता ह्या प्रस्थापित साहित्यापेक्षा वेगळ्या होत्या. लिटल मॅगझीनमध्ये येणाऱ्या विचारांपेक्षा वेगळा विचार मी करीत होतो. फुले आंबेडकर व मार्क्सचा विचार वाङ्मयीन पातळीवर आणण्यासाठी मी तळमळत होतो. 'विद्रोह'मधील कथानायकाला त्याच्या जातिव्यवस्थेनं लादलेल्या पारंपारिक धंद्याबद्दल आस्था नाही तर तो त्या धंद्याच्या विरोधात आहे. आर.एस.एस.च्या विचारांप्रमाणे तो आपल्या व्यवसायाशीं तादात्म्य नाही तर तो फुले-आंबेडकरवादी आहे. त्याच्या मनामध्ये जातीधर्माने लादलेल्या व्यवसायाविरोधी विद्रोह आहे. हा विद्रोह कलात्मक पातळीवरील फुले-आंबेडकरवाद आहे.

केशवसूतसुद्धा सदाशिवपेठीच

इतर देशातील साहित्याप्रमाणे भारतीय साहित्यात सर्व स्तरांतील चित्रणे आली नव्हती. मराठी साहित्यातदेखील एकच जात चित्रित केली गेली. ह्याचं अनुकरण खांडेकर, फडके, माडगूळकर, केशवसूत आदिंनी केले. 'मजूरावर उपासमारीची पाळी', 'अंत्यजाच्या मुलाचा प्रश्न' अशा सामाजिक आशयाच्या कविता केशवसूतांच्या असल्या तरीही त्या पुरेशा नाहीत. त्याचवेळी महात्मा फुले आणि ब्राह्मणी लेखक ह्यांच्यात तुलना केली तर महात्मा फुले- शाहूंनतर आलेल्या बहुजन समाजातील लेखकांनी क्रांतिकारी लेखन केलेले आहे. केशवसूत 'अत्यंज'शब्द वापरतात.ऋग्वेदातील पुरुषसूक्तात 'अंत्यज' म्हणजे पायातून जन्मलेला किंवा शेवटी जन्मलेला ही विकृत कल्पना आहे. युरोपातील ~~समाजवादी कवी त्यांच्या साहित्यातील नायकाचे स्थान कष्टकरी~~ वर्गाला देतात पण केशवसूत हे मार्क्सवादी नाहीत, फुलेवादीही नाहीत, त्यामुळे ते 'अंत्यज'शब्द वापरतात. अधिक स्पष्ट बोलायचे झाले तर केशवसूत सुद्धा सदाशिव पेठेपलिकडचे नाहीत.

जातिग्रस्त वर्गव्यवस्था

भारतीय राज्यघटनेमुळे मोठे सामाजिक बदल घडून आले. त्यातून वर्गांतरही झाले. पण स्वातंत्र्यानंतरच्या पन्नास वर्षांमध्ये नवे रक्तसंबंध असलेला मध्यमवर्ग निर्माण झालेला नाही. आर्थिकदृष्ट्या एखादा दलित किंवा आदिवासी मध्यमवर्गीय झाल्याचे दिसते. पण सामाजिकदृष्ट्या मध्यमवर्गीयात सामील झाल्याचे दिसत नाही. हे नवे व्यक्तीचित्रण माझ्या कादंबऱ्यातून मी केलेले आहे. भारतात वर्गसमाज निर्माण झालेला नाही व जातिसमाज गेलेला नाही. परंतु वर्गसमाजाची काही वैशिष्ट्ये आहेत व काही वैशिष्ट्ये जातिसमाजाची आहेत. या बदलत्या जगाचे चित्रण माझ्या नव्या कादंबऱ्यात येईल.

सामाजिकतेचा अभाव व बहुजनांचे ब्राह्मणीकरण

ज्ञानविज्ञान व लोकशाहीमुळे जेवढी सामाजिकता, सांस्कृतिकता व वैचारिकता यायला पाहिजे होती ती येऊ शकली नाही. १८५३ साली ब्रिटीश सरकारने इंग्रजी शिक्षण खुले केले पण ब्राह्मणांनी त्यास विरोध करून केवळ उच्चवर्णियांनाच शिक्षण देण्याचा आग्रह धरला. त्यातून उच्चजातीय मध्यमवर्ग तयार झाला. त्यानंतर फुले-शाहू-आंबेडकर व पंजाबराव देशमुखांमुळे बहुजन समाज सुशिक्षित झाला. ह्या बहुजन समाजाचा आदर्श काय? त्यांना आदर्श नव्हता. फुले-आंबेडकरांना बहुजन समाजाने स्वीकारले नाही.फक्त मनूने नाकारलेले शिक्षण एके काळी ब्रिटिशांमुळे आणि संविधानामुळे मिळते आहे तेव्हा ते घेऊन वर्गांतर करून पांढरपेशे होणे हा त्याचा ध्येयवाद. त्यामुळे पारंपारिक पांढरपेशांचे अनुकरण करणे त्याला प्रिय वाटते.हा बहुजनातला सुशिक्षित फुले-आंबेडकरवादी होणे, समाजवादी होणे, ज्ञानविज्ञानवादी होणे व सामाजिक बांधिलकी मानणारा होणे आवश्यक आहे, तरच फुले, शाहू, आंबेडकरांना अभिप्रेत समाजपरिवर्तन पुढे जाईल.

दलित साहित्याकडून बहुजनवादी साहित्याकडे

भारतात सामाजिक व राजकीय चळवळी होण्याऐवजी केवळ धार्मिक चळवळीच झाल्या. कारण येथील कष्टकरी (शूद्रातिशूद्र) वर्ग हा विविध जातींमध्ये विभागला गेलेला आहे. जत्रेंतील बिऱ्हाडं त्या गावातील जातिनिहाय वस्त्यामध्येच पडत. मनूने विभागलेला कष्टकरी वर्ग विभाजितच रहावा हे येथील राजांचे शासकीय

सूत्र होते. म्हणून परकीय आक्रमकांचे हे राजे गुलाम झाले. परकीय आक्रमकांविरूद्ध आपल्याच जनतेला ते संघटीत करीत नव्हते. जातिव्यवस्थेसंबंधात ही स्थिती कायम राहिली तर भारतिय कामगारवर्ग युरोपियन कामगारांसारखा प्रभावी होणार नाही व प्रगती करणार नाही.

शहरी व ग्रामीण भागातील कष्टकरी वर्ग एकत्र करण्याची जाणिव मला झाली.दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद,उद्घाटक, प्रमुख पाहुणे ही पदे दलितेतरांना मी देत आलेलो आहे. साक्रीच्या संमेलनामध्ये शरद पाटील, आनंद यादव, रावसाहेब कसबे व मी दलित, आदिवासी व ग्रामीण साहित्याच्या कल्पनेचा पुरस्कार केला. दलित,आदिवासी, ग्रामीण संयुक्त साहित्य महासभा स्थापण्यात आली. शरद पाटलांना ह्यामध्ये अग्रगण्य महत्त्व देणे चूक ठरणार नाही. दलित, आदिवासी, ग्रामीण संयुक्त साहित्याचा अव्यक्त विचार साक्रीला साकार झाला. मात्र तो वाढला नाही. माझे याबाबतीतले सूत्र असे आहे की, हिंदूमध्ये ब्राह्मणेतर बहुसंख्य आहेत व ब्राह्मणेतरांत शूद्रातिशूद्र बहुसंख्य आहेत. ह्या बहुजन शूद्रातिशूद्रांनी ठरविले तर मनूने निर्माण केलेले सारे संकेत ते नष्ट करू शकतात. नवी वैचारिकता, सामाजिकता व मानसिकता ते निर्माण करू शकतात आणि ती निर्माण करण्यासाठी दलित, आदिवासी,ग्रामीण साहित्य चळवळ आहे असे मी मानतो.

आदिवासी,भटके, दलित इत्यादी अनेक जातींमध्ये शेकडो नायक येणार आहेत. क्रांतिसिंह नाना पाटील, नागनाथ नायकवडी, पद्मश्री विखेपाटील किंवा बहुजनसमाजातील अनेक लोक औद्योगिक व्यवस्था आणणारे महानायक आहेत. ह्यांच्यावरती महाकादंबरी निर्माण व्हायला हवी. दलित, आदिवासी, ग्रामीण साहित्यिक ह्यांना महानायक म्हणून पुढे आणतील.

मुस्लिम आक्रमणामुळे हिंदू दमनव्यवस्था,समाजव्यवस्था व शासनव्यवस्था मोडकळीस आली आणि त्याच कालखंडामध्ये ज्ञानेश्वर, नामदेव, गोरा कुंभार, नरहरी सोनार, सेनान्हावी, चोखामेळा हे बहुजन समाजातील संत उदयाला आले. मुस्लिम सत्ता निर्माण झाली नसती व पूर्वीचीच हिंदू शासन व्यवस्था असती तर संत व संतसाहित्य उदयाला आले नसते, ही वस्तुस्थिती वारकरी साहित्याने लक्षात घ्यावी आणि द.आ.ग्रा. संयुक्त साहित्य चळवळीच्या महाप्रवाहांत सामील व्हावे. तथाकथित मुख्य प्रवाह आम्ही नाकारलेलाच आहे आता बहुजनांच्या एकजूटीने खरा मुख्य प्रवाह पुढे येतो आहे. मी आजपर्यंत माझ्या सहकाऱ्यांच्या मदतीने ह्यासाठीच प्रयत्न केले आहेत.बहुजनसाहित्यिकांनी आत्मसन्मानाची लढाई तीव्र करावी.

पान १२ वरून

तीव्र आक्षेप घेतला जातो. उच्चभ्रू आणि उच्चवर्णीयांच्या आवर्तात घुटमळणाऱ्या तथाकथित मध्यवर्ती मराठी साहित्याला साडेतीन टक्क्यांचे साहित्य म्हणून उल्लेखणारी आत्मभानाची जाणीव ह्यातूनच येते.

प्रश्न : अभिजातता म्हणजे काय? असं काही असतं का? तुम्ही अभिजात साहित्य पूर्णपणे नाकारणार काय?

लामखडे: अभिजाततेचा संकुचित अर्थ घ्यायचा झाला तर, आजच्या संकुचिततेचा अर्थ घ्यावा काय? संस्कृतची परंपरा हीच अभिजात परंपरा का? लक्ष्मण मानेचं 'उपरा', दया पवाराचं 'बलुतं' अभिजात परंपरेमध्ये येऊ शकते. जे अक्षय साहित्य आहे तेच अभिजात साहित्य असं मी मानतो. श्रेष्ठ अशा प्रकारची साहित्यकृती निर्माण होणे आणि ती काळाच्या कसोटीवर वाङ्मयीन मूल्यांसह उतरली आहे, त्याला मी अभिजात म्हणतो. अभिजात म्हणजे केवळ 'ज्ञानेश्वरी' नव्हे. नव्या प्रकारचे अभिजात साहित्य येत आहे. म्हणजे बहिणाबाईचे साहित्य अभिजात नाही का? पण हे मानत असताना ज्ञानेश्वरीची वाङमयीन मूल्यमहात्मता आम्ही मानणारच.

हे जे साहित्य निर्माण होत आहे, त्याला परंपरा नाही, वातावरण निर्माण करण्याचे कार्य ह्या वाङमयीन चळवळी करीत आहेत. यामध्ये सर्वच चांगले आहे असेही नाही. यामध्ये अभिजात साहित्यकृती निर्माण होण्याच्या शक्यता आहेत. हे वातावरण निर्माण झाल्यामुळेच 'झोंबी' 'गोतावळा' 'उपरा' 'बलुतं' 'धग' 'आठवणींचे पक्षी' इत्यादी साहित्यकृती आल्या. आणि काळाच्या कसोटीवर जे टिकेल तेच अभिजात. संतांच्या काळात अनेकांनी लिहिले पण तुकोबाचे अभंगच टिकले.केशवसूत काळाच्या निकषावर टिकले त्यामुळे ते अभिजात.

अभिजातशी आमचा दावा नाही, किंवा वैरही नाही. फक्त काळाच्या कसोटीवर जे टिकेल ते अभिजात साहित्य, तेच तेवढं चांगलं, आणि पुढच्या काळात चांगलं येणारच नाही असा आमचा दृष्टिकोन नाही.

प्रश्न: तथाकथित मध्यवर्ती प्रवाह आणि त्याच्या निकषांना नकार देणाऱ्या अलीकडच्या चळवळी यांमधून खराखुरा मोठा प्रवाह निर्माण होईल असं तुम्हाला वाटतं का?

लामखडे: होय. निश्चितपणे. उदा. १९६० च्या सुमारास दलित,ग्रामीण, लिटल मॅगझीन इत्यादी चळवळी होत्या. पण लिटल मॅगझीनची तत्कालिकाला नकार देणारी चळवळ होती(सत्यकथा). त्यामुळे ती नामशेष झाल्याचे दिसते. पण जीवनसन्मुख असणारी दलित, ग्रामीण चळवळ मात्र जोर धरताना दिसते. आज आपण उपेक्षित आहोत, आपल्याला शिकण्यासारखी परिस्थिती नव्हती. १९६० च्या काळात सामाजिक, सांस्कृतिक,राजकीय अशा सर्व अंगाने ह्याचा संदर्भ स्वातंत्र्य, शिक्षण, नव्या आकांक्षा, लोकशाहीमुळे बहुजनांच्या हातात सत्ता आली. त्यांना असे वाटू लागले की राजकीय सत्ता आमच्या हातात आली, आता आम्हाला सांस्कृतिक सत्तादेखील हवी. त्यांना सांस्कृतिक सत्तेत सहभाग नव्हता.

गांधीहत्येनंतर ब्राह्मण शहरात आले, कूळकायद्यांमध्ये जमिनी गेल्या, लोकशाहीमुळे राजकीय सत्तेपासून बाजूला फेकल्या गेलेल्या ह्या वर्गाच्या हातात आता फक्त सांस्कृतिक सत्ता शिल्लक होती, व ती तो सोडायला तयार नव्हता. ते सांस्कृतिक क्षेत्रातील वर्चस्व टिकवण्यासाठी त्यांनी वाङमयाला जास्तीतजास्त दुर्बोध बनवण्याचा प्रयत्न केला. म्हणजे एखादा मांत्रिक जसा आपल्या जादूचे मंत्र कुणाला सांगत नाही, किंवा त्याच्या जवळपासही कुणाला फिरकू देत नाही... तुमचं म्हणजे काहीतरीच.. तुम्ही सत्यकथेला काहीतरी पाठवा. उदा. 'पाचोळा' तिनतिनदा लिहायला लावली. ह्याचा अर्थ हाच की,नव्या लेखकाला नाऊमेद करा, त्यांना त्यातले काही कळत नाही, त्याचा परिणाम असा झाला की, आपण असा आकार तयार केला की, जो दुर्बोध असेल, क्लिष्ट असेल, संस्कृतची मराठी आवृत्ती असेल. क्लिष्टता व दुर्बोधतेपासून दलित/ग्रामीण साहित्याने सोडवले. आणि त्याला जीवनाला सामोरे जाणारे बनवले. दलित साहित्याने कवितेचे सारे पारंपारिक निकषच मोडून काढले. जीवनाला सामोरे जाणारे साहित्य निर्माण केले. लीटल मॅगझीनवाले तसे करू शकले नाहीत.हे जग भंकस आहे, त्यामुळे सगळेच भंकस, अशी भूमिका घेतल्यामुळे त्यांचा प्रवास शून्यवादाच्या दिशेने झाला, त्यामुळे ते जीवनाला सामोरे जाऊ शकले नाही. त्यांनी फक्त नकार दिला, तथाकथित कलावाद्यांच्या कचाट्यांतून मराठी साहित्याला दलित, ग्रामीण साहित्याने सोडवले. लिटल मॅगझीनवाले काही थोडेफार कार्यकर्ते लेखक होते, कार्यकर्ता आणि प्रतिभावंत हा एकत्रित येऊन त्यामधून कृतीशील नवनिर्मिती झाली. उदा. उपरा, बलुतं इत्यादी. आंबेडकरवादाची बैठक दलित साहित्यिकांना मिळाली. राजकीय सत्तेबाबत मध्यम जातींची भावना जितकी तीव्र होती, तितकी साहित्याच्या संदर्भात नव्हती. आंबेडकरवादाचे अधिष्ठान दलित साहित्य चळवळीने घेतले, महात्मा फुलेंचं अधिष्ठान घेतलं असं म्हणता येईल, ते घेऊन जर त्यांनी लेखन केलं असतं तर दलित व ग्रामीण हा प्रवाह पुढे एकत्र आला असता पण दुर्दैव असं की, फुल्यांना ओळखायला आम्हाला शंभर वर्षे लागली. त्याचं वाङमयीन महत्त्व तर आम्हाला परवा समजलं. 'शेतकऱ्याचा आसूड'मध्ये आलेलं ग्रामीण जीवनाचं चित्रण हे आजपर्यंतच्या कोणत्याही ग्रामीण साहित्यामध्ये आलेलं दिसत नाही. ह्याचं कारण पिंडप्रकृतीचा हा भाग आहे, फुल्यांचा पिंड हा प्रतिभावंताचा आहे. गांधीजींची खेड्याकडे चला ही हाक साहित्यिकांनी ऐकली, उदा. रविकिरण मंडळाची जानपद गीते. सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीचे लिखाण पुढे चालवले गेले नाही. ब्राह्मणेतर परंपरा उपेक्षित राहिली. म्हणजे ठोकळ, र.वा. दिघे, माडगूळकर, इत्यादी आले पण ते चळवळीचं अंग म्हणून आलेले दिसत नाही. पण १९६० नंतर ग्रामीण साहित्याचं नवं

व्यासपीठ उभं करावं असा प्रश्न आला तेव्हा आमच्या डोळ्यासमोर महात्मा फुले यांनी ग्रंथकार सभेला लिहिलेलं पत्र उभं राहिलं. त्याचं जे पत्र आहे, तो ग्रामीण साहित्य चळवळीचा जाहीरनामा आहे. त्यामध्ये तथाकथित मध्यवर्ती प्रवाहाला दिलेला नकार महत्त्वाचा आहे. लहान मुलाला गोळ्या चॉकलेट देण्यासारखं ह्या साहित्य संमेलनात दलित,आदिवासी, ग्रामीण इत्यादि साहित्य प्रवाहांना एकदोन परिसंवाद/वक्ते देणं आहे. १९७९च्या दरम्यान ग्रामीण साहित्याने चळवळीचे स्वरूप धारण केलं. पण दलित साहित्य चळवळीसारखा बंडाचा झेंडा ग्रामीण साहित्य चळवळीने उभारला नाही. हा आक्षेप दलित आणि ग्रामीण ह्यांच्यात तेढ लावण्याचं काम उच्चभ्रू करत होते. दया पवार, बाबूराव बागूल, रावसाहेब कसबे, यांचेशी १९७५ च्या सुमारास चर्चा केली त्यात दलित आणि ग्रामीण चळवळीतील कार्यकर्त्यांना एकत्र आणू ही भूमिका होती.(थोडा काळ जाऊद्या, आपण एकत्र येऊ, कारण आपली दु:खे सारखी आहेत). पहिले संमेलन जे बोट्याला झाले,त्यात आम्ही जाणिवपूर्वक निरनिराळ्या समाजघटकांना सामावण्याचा प्रयत्न केला होता. उदा. अध्यक्ष ह.की. तोडमल(धनगर), बाबा आढाव हे उदघाटक, ना.धो. महानोर, यादव हे प्रमुख पाहुणे. अनिल अवचट हेही होते. बागूल, दया पवार, कसबे ही त्याकाळातील दलित साहित्यातील आघाडीची नावे होती.

आमचा प्रयत्न असा होता की, ग्रामीण साहित्य संमेलन हे ग्रामीण पद्धतीने झाले पाहिजे. त्याचे उत्सवी स्वरूप होऊ नये. त्या संमेलनाचा संपूर्ण खर्च एक गृहस्थ करायला तयार होता. पण आम्ही त्याला नकार दिला. आम्ही घरोघरी धान्यासाठी फिरलो. ठाकराकडून आठवाभर, निठवाभर धान्य गोळा केलं, पंधरा दिवस ते गाव साहित्य संमेलनमय होऊन गेले होते. अशी संमेलने पुढे बोटा, जुन्नर, प्रवरानगर, नेवासा, अशोकनगर, चांदवड इत्यादी ठिकाणी झाली. महात्मा फुल्यांची ही आमची भूमिका होती. पण आमच्या मध्ये अशी मंडळी आली होती, की ज्यांचा वाङ्मयीन पिंड आधीच तयार झालेला होता. त्यामुळे ती मंडळी व्यासपीठापर्यंत आली, पण बाकीचा त्यांचा अविष्कार हा रूढ पद्धतीचा राहिला. त्यातील काहीजण तर म्हणतात की, ग्रामीण साहित्याचं महत्त्व संपले.

प्रश्न : मग तुम्ही वैचारिकदृष्ट्या कुणाला स्वीकारले ?

लामखडे :महात्मा फुल्यांना वैचारिकदृष्ट्या स्वीकारले, पण त्यांची भूमिका पूर्वीच ठरली होती. मधल्या जातींचे नेहमीच असे असते की त्यांची नजर वर आणि ते खाली असतात. खालच्यांच्या बरोबर रहाणे मनाने ते स्वीकारत नाहीत. ते इकडचे ना तिकडचे असे असते. म्हणजे सामाजिक जीवनातील कलावादी आणि जीवनसन्मुख साहित्य हे जे द्वंद्व आहे, त्याचे बीज सुरूवातीच्या काळातच पेरले गेले होते. अनुभवाचा कलाकृतीत अविष्कार करणारे जे कलावंत आहेत ते फारसे समजून घेण्याच्या भानगडीत पडत नाहीत.त्यांचे आकलन हे प्रस्थापितांच्या पठडीतलेच होते. त्यामुळे त्यांच्यात आणि तुमच्यात फारसा फरक पडत नाही. उदा. शिवाजी महाराजांबद्दल महात्मा फुल्यांचे स्वतंत्र आकलन आहे, पण तसे ग्रामीण साहित्यिक मांडत नाहीत, ते सर्वमान्य असा ब्राह्मणी शिवाजी मांडतात.

❖❖❖❖❖

आई

आईच्या आईने
माझ्या आईच्या हाती
पाटीपेन्सील ऐवजी
विडयाची पाने आणि कात्री दिली
अ,ब,क शिकवण्या ऐवजी
पानं कापायला शिकविले
मित्रांनो ..
तेव्हापासून माझी आई
पानं कापता कापता
स्वत:ची स्वप्न कापायला शिकली
अन् कित्येक इच्छा आकांक्षा
छाटायला शिकली
अशी ती जगत आली
अशी ती झिजत आली
आता मात्र वेगळं आहे
तिने माझ्या हाती
पाटी पेन्सील दिली आहे
आणि मी ...
अक्षरं गिरवू लागलो
अ,आ,ई..
नकळणाऱ्या अक्षरांकडे पहात
माझी आई पुन्हा स्वप्नं सजवू लागली
पुन्हा स्वप्ने पाहू लागली

विठ्ठल बुलबुले- येवला

पान १३ वरून

कालीन नायिका देतात. 'धग' लिहिणारे उद्धव शेळके 'कौतिक' रूपाने मजूर स्त्री साहित्यात चित्रित करतात, पण तिला स्वप्न देत नाहीत. तिचं कुटुंबान्तर्गत अस्तित्व दर्शवून संघर्ष चित्रित करतात. पण बागूलांनी 'जानकी' जशी आहे तशी चित्रित केलेली आहे. हिंदी चित्रपटातील पोषाख बदलणारी नायिका आणि 'सूड'ची नायिका ह्यात मूलभूत फरक आहे. बागूलांच्या काळातील स्त्री फक्त जत्रेतच बाहेर पडू शकत होती. त्यामुळे त्र्यंबकेश्वरचे वर्णन येते पण तिचा आत्मशोध मात्र अध्यात्मिक पातळीवर जात नाही. ती स्वत:च्या स्त्रीत्वाचा शोध घेते, म्हणून 'जानकी' ही महानायिका आहे.

महात्मा फुले यांनी ग्रंथकार सभेला लिहिलेल्या पत्रात असे म्हटले होते की, 'या देशात एक लोकांची परंपरा आणि दुसरी अभिजनांची परंपरा, अशा दोन परंपरा आहेत.' अभिजनांची परंपरा ही आपली परंपरा होऊ शकत नाही, म्हणून लोकांनी अभिजनांची परंपरा असलेल्या ब्राह्मणी साहित्य संमेलनाला जाऊ नये. मी एम.ए.ला असताना गो.नी दांडेकरांच्या अध्यक्षतेखाली अकोला येथे झालेल्या साहित्य संमेलनाला गेले होते. तेथे जेवणावळीचा पेशवाई थाट पाहिला, प्रतिष्ठितांच्या जेवणाच्या पंगतीवरून आम्हा सर्व मुलींना उठवले, तेव्हा लक्षात आले की केवळ जेवणाच्या पंगतीवरूनच नाही, सांस्कृतिक पंगतीवरूनही आपल्याला उठवले आहे.

दलित, आदिवासी, ग्रामीण, ख्रिस्ती, मुस्लिम, जनवादी इत्यादि सर्व साहित्य प्रवाहांना कवेत घेऊन दलित,आदिवासी, ग्रामीण संयुक्त साहित्य महासभेच्या माध्यमातून बहुजन समाजाच्या लोकांची परंपरा असणारा पर्याय आम्ही उभा करीत आहोत. दलित,आदिवासी, ग्रामीण साहित्य प्रवाह हा राजकीय स्टंट नाही, ही जनतेची चळवळ आहे, हा सांस्कृतिक संघर्ष आहे.ही सुरूवात महत्त्वपूर्ण आहे आणि हा प्रवाह हाच खरा मध्यवर्ती प्रवाह आहे.

आशयाच्या बाबतीतसुद्धा आपले दडपण प्रस्थापितांवर आलेले आहे. साहित्याच्या प्रांगणात मैलाचा दगड ठरणारी प्रत्येक महत्त्वपूर्ण कलाकृती ही आपलीच आहे. ती सामाजिक बांधिलकी मानणारी कलाकृती आहे. उत्तरोत्तर हाच साहित्यप्रवाह अधिक जोमदार बनत जाईल. तरी यासाठी आपण जागृत झाले पाहिजे. आपल्याला नव्याने संघर्ष करायला पाहिजे आणि आगामी पिढ्या हा संघर्ष अधिक टोकदारपणे पुढे चालवतील असा मला विश्वास आहे.

एकूणच पारंपारिक मराठी साहित्य ज्याला ब्राह्मण्यवादी 'मुख्य प्रवाह' संबोधतात तो समस्त स्त्रियांच्या विरोधी आहे. पुरुषवर्चस्व व जातिव्यवस्था यांचा समर्थक आहे. अशा साहित्यावर व त्यांच्या मेळे/संमेलनांवर समस्त स्त्रियांनी बहिष्कारच टाकायला पाहिजे.

पान ८ वरून

ठरत नाही.चळवळीची म्हणून काही गरज असते, ती गरज भागविण्यासाठी साहित्यिक काही लिहित असतात,उदा. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या प्रचारासाठी शाहीर अमरशेख, कॉ.अण्णाभाऊ साठे यांनी साहित्य निर्मिती केली म्हणून त्यामध्ये साहित्यमुल्ये नाही असे नाही. त्यांनी त्या काळाची गरज भागवली.

प्रश्न : मराठी साहित्यात वारकऱ्यांचे चित्रण किती प्रमाणात येते?

डॉ.मोरे: वारकऱ्यांचा प्रभाव स्पष्टपणे कोणीच नाकारत नाही. पण र.वा.दिघे ह्यांनी जसे खोलवर जाऊन वारकऱ्याचे चित्रण केले तसे इतरांनी केल्याचे दिसत नाही. केवळ वारीला जाणाऱ्या वारकऱ्याचे चित्र रेखाटणे म्हणजे वारकऱ्यांचे चित्रण करणे नव्हे, वारकरी जी जीवनमूल्ये मानतात, त्यांची नैतिकता,त्याचे जीवनचित्रण, त्याला रोजचे जीवन जगताना जो संघर्ष करावा लागतो, तो वारकरी भूमिकेतून समजावून घेऊन त्याचे चित्रण साहित्यात यायला हवे होते. पण दिघे ह्यांचा अपवाद वगळता तसे येत नाही. बाबू बिरादारची 'कावड' या कादंबरीत धुंडामहाराजांची किर्तने म्हणजे वारकरी असे आहेत पण वास्तवात तसे नाहीत. पुंडलीकांनीही खोलवर जाऊन विवेचन केल्याचे दिसते. सध्याच्या काळातील अण्णा हजारे, हा वारकरी मनुष्य, त्याची जडणघडण ज्या मूशीतून झाली त्याचा खोलवर जाऊन वेध घेण्याचे काम एखाद्या साहित्यिकाने स्वीकारावे, पण असे कोणी करणार नाही.

प्रश्न : मराठी सारस्वतकारांनी येथील मुस्लिमांची, दलितांची, ग्रामिणांची, वारकऱ्यांची, एकूण काय की जे जे दडपलेले घटक होते,त्यांची त्यानी दखल घेतली नाही, ह्याचे कारण काय असावे?

डॉ. मोरे: एकदा तुम्ही वारकऱ्यांची दखल घेतली की त्यामध्ये या सर्व दडपलेल्या घटकांचा समावेश होतो, त्यामध्ये यांचा अंतर्भाव होतो. आदिवासींवर, दलितांवर, मुस्लिमांवर, सर्व प्रथम लिहिणारे र.वा. दिघेच. जर तो खरा वारकरी असेल तर केवळ वारीला जाणारा वारकरी नव्हे. दिघ्यांची बैठकच पक्की होती. त्यांच्या 'कार्तिकी' कादंबरीमध्ये एकाच वेळी मुस्लिमांचा आणि दलितांचा प्रश्न आलेला दिसतो. दिघ्यांना ग्रामीण साहित्यिकांनी आपले मानले नाही तर तथाकथित मुख्य प्रवाहाने कादंबरीकार म्हणून दिघ्यांची वासलात लावली. मी तर असे म्हणेन, र.वा.दिघे यांना त्यांच्या वारकरी नायकाला समजावून घेण्याची पात्रताच येथील तथाकथित मुख्य प्रवाहातील समिक्षकांमध्ये नाही. किंबहुना दिघ्यांना काय म्हणायचे होते हेच त्यांना समजले नाही. ते समजून घेण्याची त्यांची लायकीच नव्हती.

प्रश्न: वारकरी प्रवाह उत्तरोत्तर सबल व सशक्त बनत जाईल का? तशी काही चिन्हं दिसतात का?

डॉ.मोरे: तशी चिन्हे दिसत नाहीत. पण हा प्रवाह मात्र उत्तरोत्तर सशक्त बनत जाईल. आताच्या वारकऱ्यांचे नव्हे तर संतांना अभिप्रेत असलेल्या वारकऱ्यांचे चित्रण साहित्यात यायला हवे. वारकरी मूल्यव्यवस्था साहित्यात अविष्कृत झाली तर ती वारकरी परंपरा, केवळ वारकऱ्यांचं चित्रण म्हणजे वारकरी परंपरा नव्हे.

प्रश्न : वारकरी हा ऐहिक जीवनापेक्षा परलौकिक जीवनाचा वेध घेताना दिसतो.

डॉ.मोरे : हा वारकऱ्यांबद्दलचा फार मोठा गैरसमज आहे.ऐहिक आणि परलौकिक अशा प्रकारची विभागणी ही पाश्चात्यांची विभागणी आहे.आपल्याकडे ऐहिक आणि पारलौकिक हे एकसंघ जीवन आहे. आपला कामधंदा करत असताना नामस्मरण करायचे 'कांदा, मूळा,भाजी -अवघी विठाई माझी.'असे सावता माळी म्हणतो. किंवा 'थडी ऐहिक्य परत्र। तूका म्हणे समतीर।।' म्हणजे एकाच मनुष्यजीवनप्रवाहाचे ऐहिक आणि पारलौकिक असे दोन काठ आहेत.आणि ते सारखे आहेत. देव नाकारला म्हणजे ऐहिक असे मानले जाते. पण असे नसते. ऐहिक आणि पारलौकिक या मानवी जीवनाकडे समग्रपणे बघतात.

१

इसवीसनाच्या पहाटे

एकाने प्रस्थापितांविरूद्ध बंड उभारले

तुम्ही त्याला छळून मारलं

पण त्याचं रक्त वाया गेलं नाही

त्याच्याच रक्ताची निशाणं आता उठतील

तोच रंग घेऊन

तुमच्या दारूगोळ्यांना आव्हान देत

मग

तुमचा इतिहासही तुम्हाला वाचवू शकणार नाही

२

एका पुतळ्याला डोळ्यांवर

पट्टी बांधून

तराजू तोलताना पाहिलं

एका पारड्यात

असंख्य मानवाचं रक्त होतं

अन् दुसऱ्यात

मूठभरांचे मधुचंद्र

प्रा. प्रियदर्शन बंडेलू

पान ९ वरून

संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाला विरोध केला. म्हणून अनंत काणेकर व आचार्य अत्रे यांच्या घणाघाती टीकेचे भक्ष्य शास्त्रीबुवाना बनावे लागले. प्रत्यक्ष महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर यशवंतरावजीचा ' प्रतिशिवाजी' असा गौरव होत असताना त्यांचे रामदास कोण? असा प्रश्न पुढे आला आणि तो मान शास्त्रीबुवांना दिला गेला. मराठी विश्वकोश व साहित्य संस्कृती मंडळ यांची अध्यक्षपदे शास्त्रीजींना देवून यशवंतरावजींनी आपल्या सत्तेचे सांस्कृतिक पौरोहित्य त्यांच्याकडे सोपवले. पेशवेकाळापासून संस्कृतची पेठ असलेली वाई आधुनिक महाराष्ट्रातही यशवंतरावजींच्या मराठा सत्तेची व पुढे कॉग्रेसी सत्तेच्या संस्कृतीसंवर्धनाची अंगाई गाणारी दाई बनली.

कृषी औद्योगिक क्रांती आणि बेरजेचे राजकारण

१९६० सालानंतर कृषी औद्योगिक क्रांतीची घोषणा करून यशवतंरावजींनी बेरजेच्या राजकारणाला सुरूवात केली. सत्ता, संपत्ती, साधने वाटपात फक्त विरोधी पक्षातील दिग्गजांनाच सामावून न घेता आपल्या सत्तेला सांस्कृतिक आधार देण्यासाठी साहित्य संस्था व संमेलने ह्यावरील ब्राह्मणी प्रभुत्वाला यशवंतरावांनी हात लावला नाही. राजकीय बाबतीत उदारमतवादाची वस्त्रे फेकून प्रसंगी कठोर होणारे यशवंतराव साहित्यिक व सांस्कृतिक बाबतीत मवाळ व उदार राहिले. ना.धो.महानोर, ग.दि. माडगूळकर सारख्या कवी प्रतिभावंतांना त्यांनी पाठीवर थाप मारून, त्यांना आमदारकी बहाल करून त्यांचे राजकियीकरण केले. परंतु त्यांच्या साहित्याच्या बाबतीत त्यांनी फक्त रसिकाचीच भूमिका अदा केली. पुढे दलित साहित्याच्या उदयानंतर व त्याची चळवळ बनल्यानंतर त्याच्या पुरस्कर्त्यांपैकी ते एक होते. लक्ष्मण मानेच्या 'बंद दरवाजा' या पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी केलेल्या भाषणात त्यांनी "अकरा वर्षे महाराष्ट्राचा मुख्यमंत्री बंजारा भटक्या समाजातील केला परंतु आज समजतयं की तो तुमचा नव्हता तर तुमच्यातील मालदार वर्गाचा होता " अशी स्पष्ट कबूली दिली.

राज्याच्या विकासासाठी यशवंतराव चव्हाणांचा जो भांडवली दृष्टिकोन होता त्यामुळे त्यांच्यातील प्रभुत्वशाली शेतकरी जातीतील राजकारणी पारंपारिक ब्राह्मणी मराठी साहित्य व जातिव्यवस्था विरोधी विद्रोही दलित साहित्य यांच्या दोघांच्याही हातात हात घालून वाटचाल करू शकला.

शेतकरी जातींची साहित्यविषयक भूमिका

स्वातंत्र्यपूर्वकालीन दिघे,माडगुळकर, माटे इत्यादींचे ग्रामीण साहित्य पारंपारिक ब्राह्मणी साहित्याचे उपांग होते.१९४५ साली जे नवकथेचे युग अवतरले, या युगाने मार्क्सवादी अण्णाभाऊ साठे या मातंग जमातीतील लेखकाला आपल्या पोटात घेण्याचे नाकारले. कुसूमावती देशपांडे यांनी जो मराठी कादंबरीचा इतिहास लिहिला त्यात अण्णाभाऊंना अनुल्लेखाने मारले. आणि हे घडले अण्णाभाऊ जिवंत असताना. जिथे बाबासाहेबांवर गाणे लिहिले म्हणून अण्णाभाऊंची कम्युनिस्ट पार्टी त्यांना जाब विचारत होती, तिथे ह्या पारंपारिक ब्राह्मणी साहित्यिकांच्या वर्तुळात ते नगण्य ठरवावेत यात वैषम्य ते काय?

शेतकरी जातीमधून कवी अथवा साहित्यिक निर्माण होणार नाही तर बालकवींची निसर्गकविता शेतकरी पुढे ट्रॅक्टरवर बसून गाईल अशी कल्पना मराठी साहित्यिक करीत होते. पुढे महानोर प्रभृती शेतकरी कवी पुढे आल्याने व ग्रामीण साहित्याची चळवळ बनल्याने शेतकरी स्वत: साहित्यिक बनून जीवनानुभव मांडू लागला. या प्रवाहालाही दलित साहित्याच्या संदर्भात तोलून मराठी साहित्यात वेगळी चूल मांडली म्हणून त्यांचा 'घरभेदे' असा उपहास केला गेला.

यादवांची गद्दारी

साहित्यिक कोणत्याही चळवळीशी व इझम् शी बांधला गेला तर त्याचे साहित्य हे प्रचारकी ठरते असा ब्राह्मणी साहित्य परंपरेने पसरवलेला समज पुढे ग्रामीण साहित्यिकांच्याही बोडक्यावर बसून ग्रामीण साहित्य चळवळ स्वत:च्या हाताने विझवली. मान्यतेचे मापदंड व प्रस्थापित साहित्य संस्थांकडून मिळालेले पुरस्कार यांमुळे या चळवळीचे नेते डॉ.आनंद यादव " ग्रामीण साहित्य चळवळीचे अवतारकार्य संपले" अशा वल्गना करू लागले. सुरूवातीला सोबतकार ग.वा.बेहरे आणि नंतर स्वामीकार रणजीत देसाई यांच्याशी आघाडी करून यादवांनी, "ब्राह्मणांच्या क्वालिटी आपण स्वीकारल्या पाहिजेत" असा डोस नवोदित ग्रामीण साहित्यिकांना पाजायला सुरूवात केली होती. ही आघाडी त्यांना साहित्य अकादमी पुरस्कारांपर्यंत मदत करती झाल्यानंतर त्यांना ग्रामीण साहित्याचे ऐतिहासिक कार्यच नाकारायची घूमजाववादी भूमिका घेतली. या चळवळीचे दुसरे आघाडीचे लेखक प्राचार्य रा.रं बोराडे यांना ठाण्याला वसंत कानेटकरांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या साहित्य संमेलनास येण्यासाठी फक्त पन्नास रूपये प्रवासखर्च संयोजकांनी पाठवला व शंकर पाटील आणि द.मा. मिरासदार यांना मात्र पुणे ते ठाणे टॅक्सी भाडे दिले."ग्रामीण भागातल्या सहकारी संस्थांनी, त्यांच्या साखर कारखान्यांचा केर जरी आम्हाला दिला तरी आमची ग्रामीण साहित्य संमेलने पार पडतील" असा टाहो फोडणारे बोराडे नवोदित लेखकांच्या वर्कशॉपच्या पुढे ग्रामीण साहित्य चळवळ पुढे रेटू शकले नाहीत. पुढे पुढे तर ह्या चळवळींशी ज्यांचा सूतराम संबंध नाही अशी मंडळी ग्रामीण साहित्याच्या व्यासपीठावर वावरू लागली. सुप्रसिद्ध समिक्षीका व कवीयत्री सुहासिनीबाई इरलेकर ज्या खाजगीत ग्रामीण साहित्याच्या बद्दल अभिरूची सोडून बोलतात त्यांनाही हे व्यासपीठ उपलब्ध करून दिले गेले!

साहित्य मंडळावरील उच्चजातवर्गीय वर्चस्व

ग्रामीण साहित्याचे आघाडीचे समीक्षक, कथाकार डॉ.नागनाथ कोतापल्ले यांनी मराठी साहित्यसंस्थांच्या कारभारी मंडळींवर एक प्रकाशझोत त्यांच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आणि सांस्कृतिक संघर्ष (पुणे ते प्रवरानगर) या पुस्तिकेमध्ये टाकला आहे,

पान ३१ वर

पान १० वरून

प्रदर्शन या संदर्भातील बौद्धिक उत्पादन साधनांवर ब्राह्मण जातवर्गाचे वर्चस्व परंपरेने राहिलेले आहे. त्या तुलनेत अब्राह्मणी शक्तींनीं या सर्व क्षेत्रांत पिछाडीला राहावे अशी परिस्थिती जातिपरंपरेने निर्माण केलेली आहे. हे वास्तव लक्षात घेऊनच महात्मा फुले यांनी मराठी ग्रंथकार सभेच्या संमेलनात सहभागी होण्यास नकार दिला. न्या. रानडे यांनी १३ मे १८८५ रोजी ज्योतीराव फुल्यांना सहभागासाठी पत्र पाठवून विनंती केली होती. त्यास फुल्यांनी पाठवलेले उत्तर 'ज्ञानोदय' ने ११ जून १८८५ च्या अंकात छापले आहे. महात्मा फुले त्यात म्हणतात, '... परंतु माझ्या घालमोड्या दादा, ज्या गृहस्थांकडून एकंदर सर्व मनुष्यांच्या मानवी हक्कांविषयी वास्तविक विचार केला जाऊन ज्यांचे त्यास हक्क,त्यांच्या खुषीने व उघडपणे देववत नाहीत व चालू वर्तनावरून अनुमान केले असता पुढेही देववणार नाही. तसल्या लोकांनी उपस्थित केलेल्या सभांनी व त्यांनी केलेल्या पुस्तकातील भावार्थाशी आमच्या सभांचा व पुस्तकांचा मेळ मिळत नाही-आता ह्यापुढे आम्ही शूद्र लोक आम्हास फसवून खाणाऱ्या लोकांच्या थापांवर भूलणार नाहीत. सारांश, यांच्यात मिसळल्याने आम्ही शूद्रादी अतिशूद्रांचा काहीएक फायदा होणे नाही, याबद्दल आमचा आम्हीच विचार केला पाहिजे.'(कीर -मालशे /३२३)

म. फुलेंनी दिलेला इशारा कालबाह्य झालेला आहे काय? आज साहित्य संस्कृतीच्या क्षेत्रातील सत्तासमतोल अब्राह्मणी शक्तींच्या बाजूने निर्णायकपणे झुकला आहे काय? आळंदीच्या अ.भा.म.साहित्य संमेलनातील (१९९६) घडामोडीतून असा निष्कर्ष काढता येत नाही. त्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१) मराठी साहित्याचा वाचकवर्ग, साहित्यप्रेमी, समिक्षा-लेखक, साहित्यिक वर्ग, साहित्यिकांची 'थोरवी' ठरवणारी साहित्यमंडळे, साहित्यकृतींना पारितोषिके प्रदान करणाऱ्या विविध साहित्य संस्था वा महाराष्ट्र फॉऊंडेशन (अमेरिका), दामाणी फॉऊंडेशन (नगर) यासारख्या 'दानशूर' संस्था, विद्यापीठ - पाठ्यपुस्तक निवड मंडळे यापासून तर केंद्रिय स्तरावरील साहित्य अकादमी वा ज्ञानपीठ पुरस्कारातील विविध संस्था यावर उच्च जातवर्गातून आलेल्यांचे वर्चस्व आहे. अ.भा. मराठी साहित्य महामंडळाच्या सत्तेचा आधारही उच्च जातवर्गीय आहेत.२) दुसऱ्या बाजूला इं.कॉ. चे साखरसम्राट वा शिक्षण सम्राट आपल्या निधीसंकलनाच्या ताकदीने स्वागत समितीचे सर्वेसर्वा म्हणून साहित्य संमेलनाच्या राजकारणात उतरतात. प्रभुत्वशाली मराठा अथवा शेतकरी जातीतील शास्ता वर्ग आपल्या राजकीय व आर्थिक सत्तेचा वापर साहित्य संमेलनाच्या क्षेत्रात प्रसिद्धी आणि प्रतिष्ठा विकत घेण्यासाठी करीत असतो. (सांमती समाजात 'आश्रयदाता' आणि 'आश्रीत' संबंधांचे निर्धारण जातीआधारांनी होईल. पेशवाईत लक्षावधीची नाणी वगराळ्यांनी ब्राह्मण आश्रीतांना देण्यासाठी 'रमणा' साजरा होत असे. जातवर्गसमाजात प्रभुत्वशाली मराठा जातीतून आलेल्या शरद पवार यांच्या मंत्रीमंडळाने साहित्यिकांना साडेतीन कोटी रूपयांची बक्षिसे वाटून असाच 'रमणा' साजरा केला.यावेळी आश्रितांच्या रांगेत ब्राह्मण, ओबीसी आणि दलित जातींतून वर्गोन्नीती झालेल्या बुद्धिजीवींचा भरणा होता.)

स्वागतसमितीतील शेतकरी जातीतून आलेले राजकारणी उच्चभ्रू आणि साहित्य महासभेचे साहित्यिक शास्ते यांच्या तडजोडीच्या सौद्यातून आळंदी साहित्य संमेलनाचा चार दिवसांचा 'राज्यकारभार' सुरू होता. त्यातून सत्तासंबंधाची कोणती वस्तुस्थिती पुढे आली?

१) स्वागत समितीतील राजकारणी उच्चभ्रूंनी संमेलनाचे व्यासपीठ सतत आपल्या प्रभावकक्षेत ठेवले. स्वागताध्यक्ष वि.दा. कराड यांनी संमेलनाचे पूर्वाध्यक्ष नारायण सुर्वे यांना आपले भाषण पाच मिनिटात आटोपते घेण्याची आदेशवजा सूचना दिली आणि 'संत तुकारामानंतरचा सर्वश्रेष्ठ मराठी कवी ' म्हणून ज्यांचा गौरव होतो, त्या सुर्वेनी आपले भाषण पाच मिनिटांच्या आत संपवून आदेशाचे निमूटपणे पालन केले. सुर्व्यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या ग्रंथपालखीसाठी १० साहित्यिकही उपस्थित नव्हते, हा अपमान गिळून हा कविवर्य ४ दिवस या 'ब्राह्मणी' साहित्य संमेलनाच्या दरबारात हिंडत होता.मराठी साहित्याच्या कोंडीस जबाबदार असलेल्या सामाजिक, सांस्कृतीक आणि साहित्यिक प्रवृत्तींचा निर्देश न करता मराठी साहित्यावरील अध्यक्षीय भाषण रंगवल्याबद्दल शांता शेळके यांना जाब विचारण्याऐवजी प्रसिद्धी माध्यमांनी त्यांना अमाप प्रसिद्धी दिली. दलित साहित्यावरील परिसंवादात दलित साहित्यिकांचा भरणा करून त्यांना अभिव्यक्तीची संधी देण्यात आली, परंतु प्रसिद्धीचा झोत त्यांच्यावर फारसा येणार नाही या पद्धतीने प्रसिद्धी माध्यमांनी धोरण ठेवले. (वाळव्याच्या ३ ऱ्या द.आ.ग्रा.संयुक्त संमेलनाचे तर दूरदर्शनने प्रारंभीवृत्तही दिले नाही!)

आळंदीच्या साहित्य संमेलनात ब्राह्मणी वर्चस्व असल्याने आणि दया पवार ते रा.रं.बोराडे असे अब्राह्मणी साहित्याचे पुरस्कर्ते म्हणून ज्यांची प्रतिमा आहे, त्यांनी दुसऱ्या, तिसऱ्या स्तरांवरील भागीदार म्हणून स्थान पत्करल्यामुळे मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या पुढे उभे असलेल्या कोणत्या प्रश्नांच्या सोडवणूकीपासून त्यांनी पलायन पत्करले? :- १) सेना-भाजपच्या युतीच्या सरकारने सत्तेवर आल्यावर डॉ. य.दी.फडके यांच्या नेतृत्वाखालील प्रागतिक विचारांच्या साहित्य संस्कृती मंडळास राजीनामा देण्यास भाग पाडले. अर्वाचिन महाराष्ट्रातील राजकारण व समाजकारण या क्षेत्रात प्रागतिक भूमिकेतून संशोधन करणाऱ्या य.दि. फडक्यांच्या जागी हिंदुत्ववादी विद्याधर गोखले यांची नियुक्ती युतीच्या सरकारने या मंडळावर केली. महाराष्ट्र शासनाने स्वांतत्र्योत्तर कालखंडात स्वीकारलेल्या साहित्य संस्कृती मंडळासंदर्भातील धर्मनिरपेक्षतावादी धोरणांना प्रथमच सोडचिठ्ठी देण्यात आली. प्रतिगामी दिशेने झालेला हा गुणात्मक बदल असूनही त्या विरोधात आळंदी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून निषेध नोंदवण्याचे धाडस दया पवार, प्रज्ञा लोखंडे, रामनाथ चव्हाण, हरी नरके, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, प्रा.

रा.रं.बोराडे वा उत्तम कांबळे ह्यापैकी कुणीही दाखवले नाही. महाराष्ट्रात प्रथमच हिंदुत्ववादी भूमिकेचे उघड समर्थन करणारे साहित्य संस्कृती मंडळ सत्तेवर येणे ही घटना या विद्रोही बुद्धिजीवींना दुर्लक्षणिय वाटली. वाळव्याच्या द.आ.ग्रा.सं.सा. संमेलनाने मात्र या प्रतिगामी धोरणाचा तीव्र निषेध केला. ब्राह्मणी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर या बुद्धीजिवींची पदोन्नतीच यासाठी होत असते की, त्यांनी साहित्य संस्कृतीच्या क्षेत्रातील ब्राह्मणी वर्चस्वाला,अशा धोरणांना मूक संमती द्यावी!

२) सेना-भाजपच्या शासनाने औरंगाबादचे संभाजीनगर नामांतर केले.अहमदनगरचे 'अंबिकानगर' नामकरण करण्याची घोषणा केली आहे. मराठी भाषा आणि संस्कृतीच्या विकासातील 'मुस्लीम' राजवटीचे प्रागतिक योगदान नाकारणे, आणि मुस्लिम विरोधातून ब्राह्मणी संस्कृतीचे वर्चस्व बहुजनसमाजावर लादणे हा ह्यामागील डाव आहे, तो उधळून लावण्यासाठी वैचारिक संघर्षाची लढाई छेडणे आवश्यक असूनही 'फुले-आंबेडकरवादी' बुद्धिजीवी समरसतावादी साहित्य संमेलनांची चैन उपभोगण्यात धन्यता मानत आहेत!

३) सेना-भाजपच्या वाढत्या राजकीय शक्तींबरोबर धर्मनिरपेक्षतावादी पत्रकारांवर हल्ले वाढत आहेत.'या पूढील प्रत्येक धार्मिक दंगल देशाला प्रगतीपथावर नेणारी असेल ' असे बाबरी मशीदभंजनानंतरच्या हिंसक दंगलीनंतर गिरीलाल जैन यांनी प्रतिक्रिया दिली होती. तर 'कारसेवकांच्या असीम त्यागामुळे शरयू लाल झाली' म्हणून हिंदुत्ववाद्यांच्या गौरवीकरणाची भूमिका माधव गडकऱ्यांनी घेतली होती.मुंबईच्या पत्रकारांवरील हिंदुत्ववादी हल्ल्यांचा निषेध करण्यास मुंबई मराठी पत्रकार संघाला टाळाटाळ करावी लागते. बुद्धिजीवी वर्गाच्या हिंसासमर्थक हिंदुत्ववादी आक्रमणाबद्दल चिंता आळंदीत एकाही तथाकथित पुरोगामी विचारवंताने वाहिली नाही!

अ) इं.कॉं. च्या प्रभुत्वशाली मराठा शास्त्यांच्या नेतृत्वाखालील बहुस्तरसत्ताक जातीय लोकशाहीतही साहित्य-संस्कृती मंडळ, मराठी विकास संस्था, ग्रंथ परिक्षण समिती, राज्य नाट्य स्पर्धा, राज्य कामगार साहित्य संमेलन इत्यादींचे स्वरूप ठरवण्यात ब्राह्मणी साहित्य संस्था आणि प्रभावक्षेत्रे यांचाही प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग असे. लक्ष्मण माने, लक्ष्मण गायकवाड यासारख्या भटक्या जातींतून पुढे आलेल्या लेखकांना सन्मानपदे देण्याचे धोरण शरद पवार शासनात होते. परंतु युतीच्या शासनात ब्राह्मण्यवादी प्रभाव हा प्रत्यक्ष स्वरूपात वाढलेला आहे. ग्रंथ परिक्षण समितीवर त्या क्षेत्राशी संबधित नसलेल्या आणि अपरिचित व्यक्तींची भरती झाली आहे, अशी टीका मराठवाडा साहित्य परिषदेच्या एका सदस्याने केली आहे. या संदर्भात आळंदी साहित्य संमेलनाने मात्र मूक संमती देऊन उच्चजातियवादाशी हातमिळवणी केली आहे!

ब) ब्राह्मणी साहित्य संमेलन ज्यास 'मुख्य प्रवाही' साहित्य संमेलन म्हणले जाते, दलित-ओबीसीं बुद्धिजीवींना कोणती पारितोषिके / लाभ देते ? आतापर्यंतचा ह्या संदर्भातील इतिहास काय सांगतो?

गंगाधर पानतावणे समरसता मंचावर गेले, आणि त्यानंतरच साहित्य संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदासाठीचे नामवंत 'पदाकांक्षी' म्हणून नावाची चर्चा सुरू होऊ शकली. (महाराष्ट्र टाईम्सने तर त्यांचा सा.सं. मं. चे अध्यक्ष म्हणून त्यांचा फोटोही एकदा छापून टाकला!)

या अर्धशतकातील सर्वश्रेष्ठ ग्रामीण साहित्यिक म्हणून स्थान असलेल्या आनंद यादवांनी तळजाईच्या रा.स्व.संघ शिबीरात हजेरी लावली आणि त्यानंतर समरसता मंचवर देवरसासमोर शरणागती पत्करली. तेव्हाच त्यांना अ.भा.मराठी साहित्य संमेलनासाठी उमेदवारी घोषित करण्याइतका आत्मविश्वास प्राप्त झाला. परंतु वसंत कानेटकरांची ब्राह्मणी पुण्याई अधिक मोलाची वाटल्यामुळे कवी कुसुमाग्रजांनीही कानेटकरांना पाठिंबा देवून यादवांच्या पराभवास हातभार लावला. 'ब्राह्मणी विरूद्ध अब्राह्मणी साहित्य अशी साहित्याची वर्गवारी जातीयवादी आहे ' अशी जाहीर टीकेची भूमिका कवि सुर्व्यांनी घेतली. प्रस्थापित साहित्यिकांच्या विरोधातील जनवादी साहित्याच्या मठातील सर्वश्रेष्ट कवीनेच असा 'कबूलीजवाब'दिल्यामुळे 'हिंदुत्ववादी' 'सोबत'कार श्री. बेहरे यांनी कवी सुर्वे आणि हीच भूमिका घेणाऱ्या प्रा. रावसाहेब कसबे यांच्या वक्तव्यांना प्रसिद्धी दिली. या शरणागतीचा प्रत्यक्ष परिणाम म्हणजे अ.भा.मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या दिशेने सुर्व्यांच्या प्रवासाला हिरवा कंदील भगव्या लॉबीतून मिळाला. समरसता मंचाच्या व्यासपीठावर गेल्यानंतरच हरी नरकेचा मराठी साहित्य परिषदेवर निवडून जाण्याचा मार्ग सूकर झाला. परंतु 'विद्रोही फुलेवादी' लेखक म्हणून आपली प्रतिमा टिकण्याची किंमत त्यांना मोजावी लागली. श्री प्रभुणे संपादित' समरसतादर्शन' या संघाच्या प्रचार पुस्तिकेत श्री. नरकेंच्या सहभागाचा फोटो मंचवाल्यांनी छापला. (आवृत्ती १९९२) रामनाथ चव्हाण यांनी 'समरसता'वर हजेरी लावली तेव्हांच त्यांच्यासाठी संघाच्या 'तरूण भारत', 'विवेक' या प्रसारमाध्यमांतून जागा देण्याच्या धोरणातील सातत्य राखले गेले. 'हेडगेवार ते आंबेडकर विचारयात्रे'त बाबासाहेबांच्या तोडीचे हेडगेवार राष्ट्रनेते होते अशा सूचना देणारे लेखन दिल्यानंतरच आळंदीतील परिसंवादातील सहभागाचा त्यांचा सौदा पक्का झाला! साहित्य, संस्कृती, शिक्षण, पत्रकारिता या बौद्धिक उत्पादनाशी संबंधित क्षेत्रांतील बहुजनातील बुद्धिजीवी वर्गाचे ब्राह्मणीकरण करण्याच्या प्रश्न रा.स्व.संघाने आपल्या कार्यक्रम पत्रिकेवर अग्रक्रम का दिला आहे? फुले-आंबेडकरांचे जातिअंतक लोकशाही -क्रांतीचे तत्त्वज्ञान हे क्रांतीकारी नाही तर जातवर्गसमन्वयाचे तत्त्वज्ञान आहे,असा प्रचार करणारा,फुले-आंबेडकरांचे 'ब्राह्मणीकरण' करणारा 'एजंट'वर्ग संघ-भाजपला का हवा आहे?

१) कोणताही शोषित समूह केवळ शोषणविरोधी जाणिवेतून आपोआप क्रांतीकारी समूह बनत नाही. अशा प्रत्येक वर्गासाठी त्याचा स्वत:चा क्रांतीकारी बुद्धिजीवी वर्ग असणे आवश्यक असते. दलित व ओबीसीमधील जातिविरोधी जाणीवांचे उर्ध्वगमन क्रांतीकारी जाणीवांच्या स्तरापर्यंत कर-

ण्यासाठी या जातींतून आलेला बुद्धिजीवी वर्ग ऐतिहासिक भूमिका पार पाडू शकतो, ही भूमिका त्याने पार पाडू नये म्हणून ब्राह्मणी शास्तावर्ग त्यास पारितोषिके प्रदान करून, प्रसंगी दंडात्मक उपाययोजना करून नियंत्रित करीत असतो. समरसतागमन घटना यातूनच उदभवली आहे.

२) जातिसमाजातील बुद्धिजीवी वर्ग आणि युरोपीय वर्गसमाजातील बुद्धिजीवी वर्ग ह्यांच्या उदयविकासाच्या प्रक्रियेमध्ये गुणात्मक अंतर आहे. युरोपीय वर्गसमाजात बौद्धिक उत्पादन साधनांवर जातिबद्धतेवर आधारित मालकी नसल्यामुळे शोषितवर्गातूनही विद्रोही बुद्धिजीवी वर्ग निर्माण होण्याची प्रक्रिया गतीमान राहिली. जातिसमाजाचे वैशिष्टय हे की तो बौद्धिक उत्पादनसाधनांवर जातीबद्ध मालकीच्या आधारे ब्राह्मण जातीची अल्पजनसत्ताक एकाधिकारशाही निर्माण करतो. जातीत वर्गाचा उदय होण्याच्या प्रक्रियेबरोबर ब्राह्मणी बौद्धिक उत्पादनावरील उच्चजातियांची नियंत्रणकक्षा सैल होण्यास प्रारंभ झाला आहे. अशावेळी बहुजन बुद्धिजीवी वर्गाने आपल्या विस्थापित जातवर्गबांधवांसाठी क्रांतीकारी बुद्धिजीवी वर्ग बनू नये म्हणून ब्राह्मणी शक्ती पारितोषिके, सत्ता यांचा प्रतिकार उभा करीत आहे. 'समरसतागमन' प्रक्रिया यातून उदभवली आहे. दलित-ओबीसी जातवर्गाची क्रांतीकारी चळवळच प्रस्थापित झालेल्या या बुद्धिजीवी वर्गाला आपल्या नैतिक-राजकीय प्रभावक्षेत्राद्वारे शोषित जनसमूहाशी जोडू शकेल आणि क्रांतीकारी बुद्धिजीवींच्या प्रस्थापितीकरणाचे ब्राह्मणी षड्यंत्र उधळून लावू शकेल!

❖❖❖❖❖

पान २८ वरून

''महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे ह्यांच्या मतदार यादींत केवळ सहा सदस्य पुनर्जीवनवादी नाहीत. बाकी २९ सदस्य नागरी मध्यमवर्गीय आणि पांढरपेशी वर्णश्रेष्ठी आहेत. विदर्भ साहित्य संघाच्या मतदार यादीत ही संख्या फारच घटली आहे. पांढरपेशा मध्यमवर्गीयांपैकी नसलेले केवळ ५ मतदार त्या यादीत आहेत.

मुंबई मराठी साहित्य संघाच्या यादीत केवळ एक व्यक्ती, प्रस्थापित समाजव्यवस्थेतील नाही, बाकी सगळे म्हणजे ३४ मध्यमवर्गीय वर्णश्रेष्ठी, पांढरपेशा वर्गातील. फक्त मराठवाडा साहित्य परिषद याला अपवाद आहे. ३५ पैकी १२ मतदार हे विविध समाजस्तरांतून आलेले आहेत. या झाल्या प्रमुख घटक संस्था. आता संलग्न संस्थांची अवस्था तर यापेक्षाही वाईट आहे. आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश आणि गोमांतक या तीन ठिकाणच्या संस्थांमधील मतदार याद्यांमधून केवळ ५ मतदार हे विविध समाजस्तरातील आहेत.

वर जे आकडे दिले त्याची बेरीज केली तर काय दिसते ? तर विविध साहित्य परिषदांच्या एकूण २०० मतदारांपैकी केवळ २९ मतदार हे समाजाच्या विविध स्तरांतले आहेत. बाकी १६९ हे नागरी पुनर्जीवनवादी, पांढरपेशे, मध्यमवर्गीय, वर्णश्रेष्ठी अशा समाजघटकांतील आहेत.''

कोत्तापल्लेनीं तपशिलासह अशी मांडणी करूनही यावर्षीच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निवडणुकीसाठी त्यांनी अर्ज भरला होता. त्यांचा दारूण पराभव झाला असता तर त्यात आश्चर्य वाटायला नको.

प्रागतिक अध्यक्ष निवडीचे कुटील डावपेच

ब्राह्मणी साहित्य संस्था व त्यांचे भटाळलेले अनुयायी यांनी एक सतत खेळी प्रत्येक साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय निवडणुकीच्या वेळी खेळलेली आहे. मराठवाडा विद्यापीठ नामांतरांच्या प्रश्नाचा दबाव संमेलनावर होता व त्यासाठी संमेलने उधळली जात म्हणून दलित व प्रागतिक चळवळीचे विचारवंत गं.बा.सरदार यांना बार्शीला झालेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले. गं.बा. चा नामांतराला जाहीर पाठिंबा असल्याने हे संमेलन मोर्चा येऊनही उधळले गेले नाही. जळगावला कविवर्य बा.भ. बोरकर विरूद्ध शंकरराव खरात अशी लढत झाली. तेव्हा बोरकर समाजवादी असल्याने हिंदुत्ववादी ग.वा.बेहऱ्यांनी खरातांची बाजू घेतली आणि आपले दलितप्रेम पुतणामावशीचे नाही हे दाखवण्याचा प्रयत्न केला. संमेलनाचा एखादा अध्यक्ष दलित वा प्रागतिक विचारांचा करावयाचा आणि पुढील दहा वर्षे ब्राह्मणी पुनर्जीवनवादी विचारवंताच्या हातीं संमेलनाची सुत्रे ठेवावयाची असा कुटील डाव मराठी साहित्य संमेलनाचे कारभारी मंडळी खेळत आली आहेत.

अलिकडे काही वर्षांत भरत असलेल्या साहित्य संमेलनावर दृष्टीक्षेप टाकला तर एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते. संमेलनाचे यजमान मध्यमजातीय ते उच्चजातीय श्रेष्ठी असतात व त्यांचाच संमेलनावर रिमोट कंट्रोल राहतो. ब्राह्मणी वर्चस्ववादी कार्यक्रमाची रेलचेल, प्रबोधनाऐवजी मनोरंजनावर भर व तोंडी लावण्यापुरता दलित साहित्यावर एखाद दुसरा परिसंवाद असा 'गोपाळकाला' मराठी साहित्य संमेलनात पाहावयास मिळतो. यांत ब्राह्मण साहित्यश्रेष्ठांच्या कर्तृत्वाने दिपलेले ब्राह्मणेतर व साहित्यक्षेत्रातील त्यांचे भक्तगण आदराने या संमेलनांना गर्दी करतात. खरे तर कलावंतिणीच्या जातीसमाजातील मेळ्याप्रमाणेही ब्राह्मण ब्राह्मणेतर कलावंत एकजूट असते. शास्त्या वर्गाला ज्याप्रमाणे अनेक जातीगटातील प्रस्थापित सत्तासंतुलनासाठी हवे असतात तसे साहित्य महामंडळावरील ब्राह्मणी वर्चस्व मान्य करणाऱ्या हरि नरकेसारख्या विचारवंताचा कोटा ठरलेला असतो. दया पवारांसारख्या दलितांच्या प्रतिभावंताला संमेलन सोहळ्यातही तिष्ठत उभे राहावे लागते. रामनाथ वाघांना निमंत्रितांच्या खुर्चीवर बसलेला असताना उठवले जाते. हा सारा अपमान हे आमचे चळवळे वीर ब्राह्मणभक्तीपायी सहन करतात. पूर्व संमेलनाध्यक्ष नारायण सुर्व्यांचा मानपान राखला गेला नाही म्हणून ते वृत्तपत्राकडे तक्रार करतात व मराठी साहित्य संमेलनाला 'ब्राह्मणी'म्हणणाऱ्या सत्यशोधकांना 'उथळ क्रांतिकारी' म्हणून त्यांची संभावना करतात.

पान ४७ वर

पान १४ वरून

संपादकांना वाचकांशी, नव्या लेखकांशी संवाद करता यावा एकूण संस्कृतीच्या संदर्भात अर्थपूर्ण काही घडायचे असेल तर संवाद व्हायला हवा.संमेलनात संवाद होत नाही.एकतर्फी भाषणे होतात.वाङ्मयीन व्यवहारातला वाचकहा मोठा घटक,महत्त्वाचा घटक. तो इथे मुका असतो.काय होणार? काय साधणार?

बंगालमध्ये दुर्गापूजेच्या उत्सवाच्या निमित्ताने ग्रंथजत्रा भरते. ग्रंथखरेदी/विक्रीचे मोठाले व्यवहार होतात. बंगालमध्ये होते ते महाराष्ट्रात का होत नाही? ज्या संमेलनाला एक कोटी रुपये खर्च येतो, किमान एक कोटीचा ग्रंथव्यवहार होणे ही काही मोठी अपेक्षा नाही. तेही होत नाही. केरळात लेखकांच्या सहकारी संस्था आहेत व त्या यशस्वीपणे चाललेल्या आहेत.महाराष्ट्रात हे का होत नाही? पश्चिम महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सहकारी कारखानदारी उभी केली आहे-किती मोठी ताकद उभी केली आहे. तिला आशिया खंडात तोड नाही असे जाणकार सांगतात. महाराष्ट्रातला शेतकरी जे करू शकतो ते लेखकाला का जमत नाही? काय अडचणी आहेत?

संमेलनात खर्च येतो, तो कशासाठी? सहभागी वक्ते,सभास्थान, सजावटी,निवास, भोजन, डामडौल इत्यादी गोष्टींसाठीच जर तो होत असेल तर त्यावर कात्री लावणे शक्य आहे.आळंदी, पंढरपूरला भाविक जातात तर स्वत:ची भाजी भाकरी वा डाळआटा घेऊन जातात.ते दिंड्यांनी जातात तेव्हा गावोगांवी त्यांच्यासाठी भंडारे घातले जातात. त्यामानाने संमेलनात असे किती लोक सहभागी होतात? त्यातल्या किती लोकांवर हा खर्च होत असतो? वर्षानुवर्षे सारा महाराष्ट्र आळंदी,पंढरपूरला जातो.श्रद्धेने,ओढीने जातो.या भाविकांना कोण टीएडीए वा मानधन देतो? तशी अपेक्षा कोणीही ठेवत नाही. मग संमेलनास येणाऱ्या लोकांनी तर ती का ठेवावी? या लोकांची साहित्य/संस्कृतीसंबंधीची आस्था खरी असेल तर त्यांनी स्वत:च्या खर्चाने यावे, दिंड्या काढून पायी येण्याची परंपरा विकसित करावी. मुळात परंपरा आहेच, तिचा अंगीकार करावा.प्रगल्भ शेतकरी/कष्टकरी संस्कृतीचे हे आदर्श आपण का स्वीकारत नाही? आणि संमेलनात सहभागी होणारा मुख्य घटक म्हणजे वाचक,तो असाच येत असतो. तर मग इतरांनी तसे का करू नये? या साहित्याच्या जत्रेत सर्वांनी उत्साहाने यावे, प्रेमाने यावे. कसलीही अपेक्षा न करता यावे. ते होत नाही.कोणी कसे यावे, कुठे राहावे, काय खावे-प्यावे याचे दंडक आहेत, संकेत आहेत. वाचकांशी संवाद करणे ही लेखकांचीही गरज आहे, भाषणे करणाऱ्यांचीही आहे, हे त्यांनी लक्षात घेतले पाहिजे.

सांस्कृतिक अप्रगल्भता

राजकारणी लोकांनी साहित्यसंमेलनात येऊ नये,यायचेच तर राजकारणाचे जोडे बाहेर ठेवून यावेत, सामान्य वाचकांसारखे बसावे वगैरे बोलले जाते. घ्या! म्हणजे पैसा उभा करायला राजकारणी पाहिजेत. गेल्या काही वर्षातले सगळे संयोजक/स्वागताध्यक्ष राजकारणीच आहेत. त्यांनी मोठ्या ताकदीने या संमेलनांचे खर्च पेलले आहेत. सारी व्यवस्था उभी केली आहे. (मागच्या एका संमेलनात जमाखर्चाची तोंडमिळवणी होईना म्हणून संयोजकांना शरद पवारांना विनंती करावी लागली होती व त्यांनीही व्यक्तिगत प्रतिष्ठा वापरून सारे जमवून दिले होते,असे मी ऐकले आहे.)आणि संमेलनात त्यांनी जोडे काढून यावे वा राजकारणाची वस्त्रे उतरवून यावे हे काय आहे? जो तुम्हाला पैसा उभा करून देतो, ज्याच्या ताकदीशिवाय तुम्ही हे काहीही करू शकत नाही, त्याला या प्रकारची अडवणूक कशासाठी? त्याने ती का सहन करावी? मागे प्रवरानगर येथे होणाऱ्या संमेलन प्रसंगी निवडणुकीत लेखक उमेदवारांची मजल स्वागताध्यक्ष बाळासाहेब विखे-पाटील यांना जातीयवादी ठरवण्यापर्यंत गेली. वैतागून त्यांनी ते रद्दच करून टाकले, हा ताजा इतिहास आहे.

आपले राजकारणी लोक त्यामानाने पुष्कळच समंजस आणि प्रगल्भ म्हटले पाहिजेत.मुळातच आपण राजकीयदृष्ट्या अधिक प्रगल्भ आहोत व सांस्कृतिक आस्थेच्या अंगाने अप्रगल्भ आणि या ताणातूनचहे प्रश्न निर्माण होतात अशी माझी धारणा आहे. गेल्या काही वर्षात आपल्या मराठी भाषिक लोकांत राजकीयदृष्ट्या जी प्रगल्भता आली, प्रौढता आली ती सांस्कृतिक अंगाने आलेली नाही हे कोणालाही जाणवेल. राजकीय नेते मुळातच ताकदवान असतात. खूप मोठ्या समूहाला आपल्या हाकेसरशी हलवण्याची क्षमता त्यांच्यात असते.साहित्याच्या एका बारक्या जगातले आणखी बारके राजकारण करणाऱ्या मंडळींत हे समुहाचे नेते आले की या बारक्या राजकारण्यांना विचारतो कोण? साहित्यातल्या राजकारणी मंडळींचीही भीती मुळात या प्रकारची आहे.अव्वल दर्जाच्या लेखकाला ही भीती वाटण्याचे कारण नाही,पण तो या संमेलनांत फारसा येतच नाही, त्यामुळे तो प्रश्नच उद्भवत नाही.राजकीय नेते संमेलने घेऊन स्वत:चा राजकीय स्वार्थ साधत असतात अशी एक हाकाटी काहीजण पिटत असतात. तीही तितकी खरी नाही. या कामासाठी जो ताप ते सहन करतात त्यामानाने यातून त्यांना काहीच मिळत नाही. इतकेच काम आपल्या मतदारसंघात करून त्यांना आणखी पुष्कळ काही साधता येऊ शकते.तरीही ते जे करतात आणि पुन्हा आपल्या कार्यकर्त्यांना घेऊन करतात त्यापाठी त्यांच्या ठायी असलेली साहित्य /संस्कृतीसंबंधीची आस्था हीच अधिक मोठी असे म्हटले पाहिजे. स्वत:चा उदोउदो करून घ्यायला त्यांना बाकी पुष्कळ संधी असतात व त्यांत इतका तापही नसतो. त्यामुळे या हाकाटीला फारसा अर्थ नाही.

आता साहित्यमहामंडळ,घटकसंस्था,मतदारसंघ इत्यादी प्रकरणी श्री.पु.भागवत,ना.धो.महानोर यांच्यासारख्या माणसांनी साहित्य महामंडळाचे अध्यक्षपद भूषवलेले आहे. त्यांनी पुष्कळ विचार केलेला असणार, बऱ्याच उलटसुलट बाजू लक्षात घेतल्या असणार,तरीही यासंबंधाने काही

नव्या गोष्टी लक्षात घेण्याची गरज आहे.पुणे, मुंबई, नागपूर,औरंगाबाद येथील घटकसंस्थांना प्रत्येकी ३४ मते, स्वागतसमिती ३५ मते, संलग्नसंस्थांची मते,पूर्वाध्यक्षांची मते असा एकूण सुमारे पावणेतीनशे लोकांचा मतदारसंघ,त्यातली निवडणूक.त्यात पुन्हा उमेदवारांची यादी जाहीर झाल्यावर मतदारांची यादी तयार होते ते का? आणि मुळात आता या संस्थात्मक चौकटीचाच नीट विचार केला पाहिजे. त्यांच्या घटना व सद्यस्थिती यातील तीव्र विसंगती लक्षात घेतल्या गेल्या पाहिजेत.

काळाबरोबर बदलावे

पुण्याच्या म.सा.प. ला केंद्र धरून मांडतो. ते बव्हंशी बाकी सगळ्या म्हणजे औरंगाबाद, नागपूर,मुंबई येथील संस्थांनाही कमी अधिक फरकाने लागू होईल.म.सा.प.ची घटना जुळी.ती एकूण साहित्याविषयीची आस्था पुण्या-मुंबईत एकवटलेली होती. अशा काळातली.साहजिकच या घटनेत पुण्याला, तिथल्या मंडळींना महत्त्व होते व एकूण व्यवहारात निर्णयाच्या जागी त्यांचे असणे योग्यही होते. गेल्या काही वर्षांत साहित्यासंबंधीचे चित्र बदलले आहे,खूपच बदलले आहे, गंभीर प्रकारची साहित्यनिर्मिती करणारी माणसे पुण्याबाहेर जास्ती आहेत. वाचन, चर्चा व एकूण साहित्यासंबंधीची आस्था प्रकट करणारी सशक्त व्यासपीठे नगर,नाशिक,सांगली, सातारा,सोलापूर, कोल्हापूर, जळगाव, धुळे अशा जिल्ह्यांच्या ठिकाणीच नव्हे तर अनेक तालुक्यांच्या गावीही विकसित झालेली आहेत. काही ठिकाणची कामे अनेक दृष्टींनी पुण्यातल्या कामाच्या तोडीची आहेत. साहित्यविषयक आस्थेचा एकूण भूगोल बदलला आहे.या स्थितीत म्हणजे एकूण पृथगात्मता प्रकट करीत असण्याच्या स्थितीत त्यांनी संस्थात्मकदृष्ट्या दुय्यम स्थानी किती काळ राहावे?या संदर्भात मधू मंगेश कर्णिक प्रभृतींनी कोकणात ‘कोकण मराठी साहित्य परिषद’ स्थापन करून एक चळवळ उभी केली आहे, ती लक्षणीय ठरते.त्यांना स्वतंत्र घटक संस्था म्हणून महामंडळाने अद्यापही मान्यता दिलेली नाही. ‘पुण्याच्या म.सा.प.कडे जा’ म्हणतात.पुण्यातली मंडळी दाद देत नाहीत. हे काय आहे? केवळ कोकणच नाही तर नगर,नाशिक, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जळगाव, धुळे अशा जिल्हावार साहित्य परिषदा स्थापन झाल्या पाहिजेत.त्यासाठी म.सा.प. ने अधिक खुले व स्वागतशील होणे गरजेचे आहे. तसे होण्यात त्यांचेही हित आहे.ती मंडळी अधिक अनुभवी आहेत.त्यांनी वारे कसे वाहात आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे.अन्यथा या उत्साही लोकांनी आपापल्या गावी कामे करायची आणि पुण्याला बिनबोभाट पैसे द्यायचे, तसेच सभासंमेलनांत त्यांना बोलावून त्यांची बडदास्त ठेवायची हे कुठवर चालणार आहे?इतर ठिकाणची साहित्यप्रेमी, संस्था चालविणारी वा उभारण्याची क्षमता असलेली माणसे आक्रमक होण्याआधी या समजदार आणि ज्ञानी पुणेकर संस्थाधूरीणांनी स्वत: होऊन या पुनर्विचाराचा प्रस्ताव दिला पाहिजे व उपक्रमशीलतेचे श्रेय घेतले पाहिजे. काळाबरोबर बदलण्यात समझदारी आहे आणि आब राखणेही हे त्यांनी लक्षात घेतले पाहिजे.

साहित्य महामंडळ ही जी Apex Body आहे, तिनेही आपली जबाबदारी झटकू नये.वास्तवाचे डोळस भान ठेवून घटनांमध्ये बदल करावेत. पुनर्मांडणी करावी. महामंडळ अधिक समावेशक, प्रभावशाली व साऱ्या महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व अर्थपूर्णतेने करणारे व्हावे व त्यातच आपल्या सांस्कृतिक व्यवस्थेचे, संस्थात्मक जीवनाचे हित आहे, याचा विचार झाला पाहिजे. मी आधी म्हणालो तसे हे औरंगाबाद, नागपूर, मुंबई यांनाही लागू आहे.जाणत्या मंडळींना हे नक्कीच पटेल व त्यांनी याचा पुरस्कार केला पाहिजे. आपल्या भाषिक संस्कृतीतच हे होत आहे असे नाही तर आज एकूण जगभरातच साहित्यनिर्मिती व साहित्याची आस्था यांची केंद्रे बदलत आहेत.अमेरिकेपेक्षा लॅटिन अमेरिकेत अधिक चांगले साहित्य जास्ती निर्माण होत आहे.युरोपातही पश्चिमेपेक्षा पुर्वेत आणि या सगळ्यांमध्ये एकूणात आज तिसऱ्या जगातून साहित्यात नवे काही जोराने येत आहे वा येऊ घातले आहे, असे एकूण चित्र दिसते.

डोळस व्हावे

भौतिक प्रगती आणि सांस्कृतिक आस्था यांच्यात सरळ व विरोधी असे ढोबळ नाते नसले तरी भांडवली खुली अर्थव्यवस्था,जगण्यातला वाढता वेग, माणसांचे नात्यांतून विभक्त होणे, संज्ञापन व्यवहारातील प्रचंड बदल यांच्या कमीजास्त दाबाने मानवी व्यवस्थांचे अग्रक्रम बदलत आहेत असे नक्की म्हणता येईल.पुढारलेल्या देशातील मानवी समुहात एकूणातल्या जीवनविषयक आस्थांमध्ये साहित्य / संस्कृती यांची क्रमवारी घसरत आहे व तिथे साहित्यासंबंधी जे काही चालले आहे ते विद्यापीठात वा संशोधन संस्थात सैद्धांतिक स्वरूपाचे काम आहे त्याला आशय पुरवणारे साहित्य मात्र अविकसित देशात अधिक उभारीने येऊ घातले आहे. एकूणात हा Global Phenomenon आहे. आपल्या भाषिक संस्कृतीतही पुण्या-मुंबईत एकूण अग्रक्रमात साहित्य/संस्कृती खालच्या क्रमांकावर घसरत असताना उर्वरित महाराष्ट्रातती वर येत आहे.अशावेळी संस्थात्मक कामाचा दीर्घ अनुभव असलेल्या व साहित्याविषयी प्रगाढ आस्था असलेल्या पुण्यामुंबईतील धुरीणांनी आपली प्रगल्भता आणि समजदारी प्रकट करून उदारपणे नव्या बदलांशी जुळवून घ्यावे. त्यातून त्यांची साहित्य/संस्कृती यांच्याविषयीची आस्थाच सिद्ध होणार आहे. त्यात कोणाही व्यक्तीपेक्षा आपल्या सांस्कृतिक व्यवस्थेचेच भले आहे.आज बाहेर अधिक धडाडीने कामे चाललेली असताना पुण्या-मुंबईची संस्थात्मक मक्तेदारी त्या क्षेत्रातील इतर ठिकाणचे लोक फार काळ सहन करणार नाहीत हे लक्षात घेतले पाहिजे. क्रीडाक्षेत्रामध्ये बऱ्याच खेळात पुण्याची या प्रकारची मक्तेदारी क्रिकेट वगैरे खेळ वगळता मोडीत निघाली आहे. सांस्कृतिक संस्थात्मक व्यवस्थेत अशा प्रकारे मोडीत निघण्याची वाट न बघण्यात समझदारी आहे. यात पुण्यातल्या धुरीणांविषयी आकसाचा प्रश्न नाही. व्यक्तिश: तर नाहीच नाही. या मंडळींनी माझ्या लेखनाला अनेकदा

सन्मानित केलेले आहे. त्यामुळे तो प्रश्नच येत नाही. एकूण बदलत्या वर्तमानाच्या संदर्भातल्या बदलत्या व्यवस्थेसंबंधी माझ्या काही कल्पना, अपेक्षा आहेत व त्या दृष्टीने मी हे मांडत आहे. या मंडळींनी त्यांचे काम निष्ठेने व दीर्घकाळ केलेले आहे. नव्या बदलांसंबंधी डोळस भान प्रकट करून त्यांनी वास्तववादी भूमिका घ्यावी एवढेच मला म्हणायचे आहे.

आता पुन्हा व्यक्तिश: माझ्या संमेलनातील सहभागासंबंधी. संमेलनाच्या आयोजकांत वा एकूण राजकारणात पुष्कळ भली माणसे असतात.(ती माझ्यासारख्याला तिथे निमंत्रित करतात, त्यामुळे त्यांना भलेच म्हटले पाहिजे!) अनेकदा निमंत्रणे घेऊनही मी या संमेलनात सहभागी झालेलो नाही. त्यामुळे या भल्या माणसांची नाराजीही मला सहन करावी लागलेली आहे.तिथे विशेष मला काही मिळत नाही हे तर आहेच, पण एकूण जे काही चालते ते त्याविषयी असमाधान असताना जाण्यात मतलब काय ही माझी धारणा. साहजिकच निवडणुकीच्या साठमारीत मला अजिबातही रस नाही. पण एरव्ही एक उत्सव वा एक जत्रा म्हणून संमेलन बघायला जाण्याला माझी 'ना' नाही. नगरच्या संमेलनाचे स्वागताध्यक्ष यशवंतराव गडाख हे राजकारणीच आहेत. त्याचबरोबर ते एक मृदु, सौजन्यशील व साहित्य/संस्कृतीसंबंधी जाणती आस्था असलेले गृहस्थ आहेत. त्यांची ही आस्था आजची नाही. गेल्या अनेक वर्षांपासून मी हे पाहिलेले आहे.त्यामुळे तसेच काही स्नेह्यांच्या भिडेखातर मी या मंडळींच्या बैठकांना हजर राहिलो आहे. हजार रुपये द्यायला सांगितले, दिले आहेत. स्वागत समितीचा सदस्य/मतदार केले तर झालो आहे.पण म्हणून मी माझी भूमिका बदलली आहे असे मात्र नाही.माझे प्रश्न कायम आहेत.असमाधान आहे ते आहेच. काही महिन्यांआधी लेखक-मित्रांच्या बैठकीत गप्पा चाललेल्या असताना, 'आपली लेखक-मंडळी या संमेलनात निमंत्रण मिळवण्यासाठी इतका आटापिटा का करतात, त्याचा उपयोग काय हे मला कळत नाही आणि या सगळ्याचे महत्त्व निष्कारण वाढायला आपल्यापैकी स्वत:ला प्रागतिक लेखक म्हणवणारेही पुष्कळ जबाबदार आहेत, त्याचा विचार केला पाहिजे..' यासारखे मी बडबडत होतो, तेव्हा दया पवार उसळून म्हणाले,'रंगनाथ,या प्रकारे तुच्छतेने बोलणे ठीक नाही. तू लोकांचा लेखक आहेस. तू लोकांत गेले पाहिजे'वडी-लकीच्या नात्याने काही सांगण्याचा त्यांचा अधिकार होताच. मीही त्यांना माझी बाजू पटवून देण्याचा प्रयत्न केला. मी तुच्छ-तेने बोलत नव्हतो. माणसांविषयीची आस्था ही कोणत्याही लिहिणाऱ्या माणसांप्रमाणे माझ्या जगण्याच्या केंद्रस्थानी आहे. मी लोकांमध्ये का जाणार नाही?माझा प्रश्न एकच आहे की मी कोणत्या लोकांत जायचं? कोणत्या अटींवर जायचं? कोणाचं प्यादं होऊन जायचं की निव्वळ प्रेमापोटी जायचं? कशासाठी जायचं हे समजून-उमजून जायचं की गर्दी दिसते, म्हणून संधी साधायची? मी लोकांचा लेखक आहे,जरुर आहे.पण तेवढेच नाही. मी माझ्या लोकांचा लेखक आहे. मी माझ्या लोकांत अवश्य जाईन. मी माझ्या विचारांचं बल वाढवीन. माझ्या लोकांची, माझ्या विचा-रांच्या लोकांची संख्या वाढवीन. मग मला त्यांच्यात फरक वाटणार नाही. मी अवश्य त्यांच्यात जाईन.

मी आंधळेपणाने कुठंही घुसणार नाही. संवादाची शक्यता नसणाऱ्या समुहात उभा राहून मी कोणाला काय देणार आणि काय मिळवणार?मी लोकांत जाईन. अर्थपूर्ण संवाद करण्यासाठी अवश्य जाईन.

साऱ्या व्यवस्थेचाच पुनर्विचार

आपल्या भाषिक संस्कृतीतील बदलत्या भूगोलाचे भान आपल्या संस्थात्मक व्यवस्थेला यावे अशी माझी नम्र भावना आहे.ती आजच्या काळाची गरज आहे.ती जाणत्या मंडळींनी ओळखली पाहिजे.व्यापक, समावेशक,अर्थपूर्ण काही घडवणारे आणि काळाशी संबद्ध, लवचिक असे आपण काही उभारले पाहिजे.आपल्या सांस्कृतिक व्यूहाच्या बदलत्या वास्तवाचा स्वीकार केला पाहिजे. त्यासाठी एक जबाबदार घटक म्हणून मी प्रयत्न करीत राहीन. कृती करण्यासाठी स्थल-काल-स्थिती पक्व झाली आहे असे वाटले तर तेही करीन.माझ्या प्रकारची धारणा असलेले अनेक लोक आहेत, हे मला माहीत आहे.

साहित्य संमेलन झाले. कार्यक्रम, भाषणे, जेवणे-खावणे उत्तम झाली.सगळी व्यवस्था उत्तम. उत्तम म्हणजे सारे झाले आणि संपले असे होता कामा नये. इतका पैसा खर्च झाल्यावर तिथे ठोस काही उभे राहिले पाहिजे.एशि-याड वा ऑलिंपिक झाल्यावर त्या जागी कायमस्वरूपी सुसज्ज क्रीडानगरी उभी राहते. (त्याचा नंतर पुन्हा वापर किती व कसा होतो हे प्रश्न आहेतच) साहित्य संमेलन झाल्यावर तिथे काय उरते? काय उभे राहते? याचा विचार केला पाहिजे.साहित्य संमेलनाचा ठोस संस्कार झाला पाहिजे व त्यातून कायमस्वरूपी काही उभे राहिले पाहिजे.अन्यथा, 'वा, वा! छान, छान!' अशा प्रतिक्रिया/आठवणी काही दिवस तेवढ्या उरतात आणि पुन्हा पहिले पाढे पंचावन्न.

मुख्य म्हणजे इतका पैसा उभा राहतो, इतके वेगवे-गळ्या थरातले लोक पैसे देतात,तो नीट वापरणे ही सांस्कृतिक आस्था असणाऱ्या लोकांची जबाबदारी आहे,कोतवाल संघटना, हमाल संघटना अशा कष्टकरी लोकांनी पैसे द्यायचे आणि लेखकांनी त्यावर मजा मारायची,रोषणाई करून फटाके वाजवायचे हे ठीक नाही. सामान्य माणसाच्या श्रमातून येणाऱ्या पैशाचा यथायोग्य आदर केला गेला पाहिजे. अगदी सरळसरळ कदाचित नाही तरीही दुरान्वयाने व अंतत: त्याला उपयोगी होईल, त्याच्याच आस्थेला ताकद मिळेल असे काही संस्थात्मक उभे राहणे गरजेचे आहे. ते काय व कसे असावे याविषयी तपशिलाने विचार करावा लागेल. एकूणात साऱ्या व्यवस्थेचा पुनर्विचार करणे आव-श्यक आहे व ते तातडीने करणे आवश्यक आहे.

⌘⌘⌘⌘⌘

पुलं अवमान : एक चिकित्सा

सत्यशोधक

मुंबईच्या 'महानगर' आणि 'आज दिनांक' वर शिवसेनेचे हल्ले गेल्या तीन चार वर्षांपासून सतत होत आहेत. 'महानगर'च्या श्री. निखिल वागळेंवर सेनेच्या महिला कार्यकर्त्यांनी झुंडीने हल्ला केला. महिला समिक्षक पुष्पा भावे ह्यांच्या सभेवरही सेना महिला आघाडीच्या महिला सोडण्यात आल्या होत्या.औरंगाबादच्या लोकमत कार्यालयावर आणि संपादक राजेंद्र दर्डा ह्यांच्यावर सैनिकांनी हल्ला केला होता.परंतु ह्या घटनांचा निषेध करण्याऐवजी मुंबई मराठी पत्रकार संघाने बाळ ठाकरे ह्यांना आदर्श पत्रकारासाठी असलेला महाराष्ट्र स्तरावरील पुरस्कार अर्पण केला!या पुरस्कार समारंभाचा निषेध करण्यासाठी केवळ पन्नासच साहित्यिक-पत्रकार निदर्शक जमू शकले. 'हा कसला पत्रकार, हा तर अस्सल गुन्हेगार','पत्रकारसंघाने केले काय,हुकूमशहापुढे टेकले पाय' अशा घोषणा पत्रकारांनीच दिल्या.प्रश्न असा आहे की, पत्रकारांवर होणाऱ्या शारीरिक हल्ल्यांचा निषेध करण्याऐवजी पत्रकारसंघ ठाकरेंचा सत्कार करतो. आणि निषेधाच्या निदर्शनात महाराष्ट्रातील साहित्यिक, बुद्धिजीवी पत्रकार ह्यांची संख्या नगण्य का असते?

पु.लंचा अवमान हा कुणा एका व्यक्तीचा अवमान नाही, तो मराठी साहित्यिक जगाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या एक श्रेष्ठ कलावंताचा अवमान आहे. त्याच्या विरोधात मराठी साहित्य परिषद, पुणे, मराठवाडा साहित्य परिषद, विदर्भ साहित्य परिषद ह्यांनी निषेध नोंदवायला हवा. केवळ निषेधच नाही तर निदर्शनांच्याद्वारे संताप व्यक्त करायला हवा.परंतु असा निषेध व्यक्त करण्याची त्यांची हिंमत होत नाही. कोकण मराठी साहित्य संमेलन (डिसेंबर १९९६) नुकतेच पार पडले.त्यात पु.ल.-ठाकरे वादाचा उल्लेखही करण्याचे टाळण्यात आले. ठाकरे निषेध तर दूरच राहिला.

पु.ल.-ठाकरे वादात साहित्य संस्थांनी सक्रिय निषेधाची भूमिका न घेण्यामागे साहित्य संस्थांमधील पुनरूज्जीवनवादी प्रवृत्ती आहे. डॉ.कोतापल्ले त्यांच्या 'प्रवरानगर ते पुणे' या पुस्तकात या पुनरूज्जीवनवादी प्रवृत्तींना 'ब्राह्मणी' म्हणून नोंदवायचे टाळतात, परंतु या प्रवृत्तीमागील सामाजिक आधार जातिस्त्रीदास्य समर्थक असल्यामुळे त्यांना 'ब्राह्मणी' म्हणून संबोधणेच योग्य आहे. ब्राह्मणी प्रवृत्ती या नेहमीच जातीसमर्थक आणि स्त्रीदास्यसमर्थक राहिलेल्या आहेत. वर्णजातीसमाजात त्यांच्या राजकीय, सांस्कृतिक आणि धार्मिक सत्तेचा आधार जातींवर आधारित अल्पजनसत्ता हाच होता. राजकीय सत्तेपासून शूद्रातिशूद्र जातींना वंचित ठेवणे, सांस्कृतिक क्षेत्रात ज्ञानबंदी करणे व सामाजिक क्षेत्रात जातीबद्धतेचे कडेकोट नियंत्रण ठेवणे ह्यात त्यांचे हितसंबंध होते.त्यासाठी जातींवर आधारलेल्या हुकूमशाही परंपरेच्या समर्थक होत्या. जातीसमाजात ब्राह्मणी वर्चस्व जातीबद्ध असल्यामुळे बौद्धिक उत्पादनसाधनांवरील त्यांचे वर्चस्व एकाधिकारशाहीच्या स्वरूपात होते. साहित्यिक, बौद्धिक उत्पादनावर अशी आत्यंतिक मक्तेदारीची सत्ता केवळ जातीसमाजच देवू शकतो. ब्रिटीश वासाहातिक काळापासून वर्गसंस्थेचे रोपण जातीसमाजावर झाले आहे.परंतु शूद्रातिशूद्र जातींना बौद्धिक उत्पादनसाधनांवरील मालकी व वापराबाबत जातीबद्धतेचे दंडक हजारो वर्षे राहिल्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळातही साहित्य संस्कृतीच्या अभिजानांच्या राखीव क्षेत्रात ब्राह्मणेतरांचा प्रवेश अत्यल्प संख्येनेच आहे. परिणामी साहित्य संस्थांचे सामाजिक स्वरूप ब्राह्मणी जातीय आणि पुनरूज्जीवनवादी राहाते. या संस्थांचे हे स्वरूपच साहित्य संस्कृतीच्या क्षेत्रात बहुजनांच्या प्रवेशाला आणि सहभागाला नकार देते. परिणामी हे क्षेत्र मूठभर उच्चभ्रू उच्चजातीयांच्या पदोन्नतीची क्षेत्रे बनतात.

बाळासाहेब ठाकरे किंवा कोणत्याही लोकशाहीविरोधी राजकीय श्रेष्ठींना साहित्यिक संस्था आणि साहित्यिक चळवळी ह्यांचे असे जनताविन्मुख आणि जनाधारहीन स्वरूपच हवे असते. कारण अशा त्यांच्या स्वरूपामुळे त्यांची राजकीय सत्ता सांस्कृतिक सत्तेपेक्षा वरचढ ठरते. पु.लं.च्यामागे कोणती साहित्यिक सत्ता,कोणता सांस्कृतिक वर्ग आहे हे जोखूनच बाळासाहेबांनी आपले मनोगत कुणाचीही भीडभाड न ठेवता व्यक्त केले. त्यामागे राजकीय आणि साहित्यिक सत्तांतील हे विषम समतोलाचे गणित आहे.

साहित्यश्रेष्ठींविरूद्ध बहुजन

साहित्य आणि संस्कृतीच्या क्षेत्रात एका जातीची अल्पजनसत्ता निर्माण झाल्यामुळे साहित्यिक साहित्यसंस्था आणि साहित्य चळवळी जनताभिमुख राहिल्या नाहीत. त्यांच्यामागे व्यापक जनाधार न राहिल्यामुळे नव्या भांडवली समाजात साहित्यिकांकडे सत्ताधारी तुच्छतेने पाहू शकतात. साहित्यिकांची अल्पजनसत्ता कशी आहे ?

'साहित्याच्या प्रांतात आज काही मराठी नावे झळकतात, पण ही मंडळी अजून अल्पसंख्यांक आहेत.१८०० ते १९३४ या कालखंडात मराठी साहित्यात अधिकाधिक साहित्य कोणत्या लेखकांनी प्रसिद्ध केले ह्याची नोंद दात्यांच्या ग्रंथसूचीत आहे. त्यातील नोंदीवरून असे दिसते की या प्रांतात ब्राह्मणवर्ग आघाडीवर आहे. या काळात जोशी आडनावांचे २१० लेखक आढळतात. त्यानंतर कुलकर्णी (८५), देशपांडे(७१),गोखले(५६), पटवर्धन (५३), केळकर (५०), लेले (४४) आणि गोडबोले(३३) ही यादी वाढविता येईल.' या शब्दात बाळ सामंत ब्राह्मणांच्या साहित्यातील वर्चस्वाचा अभिमान व्यक्त करतात. (महाराष्ट्र सांस्कृतिक क्षेत्रात इतका दरिद्री का?, महाराष्ट्र टाईम्स, ७ डिसेंबर ९६)

थोडक्यांत मराठी साहित्याच्या क्षेत्रात लेखण्या गाजविणाऱ्या साहित्यिकांत ब्राह्मणी साहित्यिकांचे परंपरेने वर्चस्व राहिले आहे. ही वर्चस्वाची वस्तुस्थिती ही बाळ ठाकरेसारख्या ब्राह्मणी फॅसिस्टांचे शक्तीस्थान आहे.' पु.लं.ना दिलेल्या सन्मानाचे आपण मालक-दाते आहोत ' असा उद्दाम संताप साहित्यिक वर्ग मुकाट्याने सहन करेलच, असा हिटलरी आत्मविश्वास ठाकरेंच्या कृतीमागे आहे.

पुलंच्या साहित्यातील ब्राह्मण्य!

मराठी साहित्यात 'ब्राह्मणांचे कपट' उघड करण्याचे

ऐतिहासिक कार्य महात्मा फुल्यांनी केले. सावकारी, ब्रिटीश शासनातील प्रशासकीय सत्ता आणि जातीय श्रेष्ठत्व याआधारे भटजींनी शोषण कसे केले हे दर्शविणाऱ्या महात्मा फुल्यांचा नामनिर्देश तत्कालीन साहित्यिकांच्या सूचीत न करण्याचे न्यायमूर्ती रानडेंनी दुष्कृत्य केले होते. समाजसुधारक आगरकरांनीही या ब्राह्मणी शोषक अंगावर हल्ला करण्याऐवजी म. फुल्यांना 'रँगलर फुले' म्हणून हटकले. दुसऱ्या बाजूला हिंदुत्वाच्या उदात्तीकरणाची लेखनपरंपरा मराठीत रूढ करण्यात आली.गदिमाचे 'गीतरामायण' वा बाबासाहेब पुरंदरे कृत शिवाजीवरील व्याख्याने यातून चिकित्सक इतिहासदर्शन टाळण्यात आले.ब्राह्मणी इतिहास उदात्तीकरणाचा हा प्रवाह थोर साहित्यिक पुलंपर्यंत येतो. आणि त्यांनाही सावरकरी भाषेत लिहायला भाग पाडतो.

काश्मिरमधल्या शंकराचार्यांचं मंदिर पहाताना पुलंच्या मनात विचार आले, '...हा आठ वर्षात चतुर्वेदी झालेला आईबापावेगळा नंबुद्री ब्राह्मणाचा पोर मरत्या हिंदुधर्माला संजीवनी देण्यासाठी हजारो मैलांची वाट तुडवित, अरण्य ओलांडीत कैलासराण्याच्या दर्शनासाठी केरळातून काश्मिरपर्यंत आला होता. काश्मिरात मला सर्वात जर काही सुंदर वाटले असेलल तर ते डोंगरमाथ्यावरचे श्री आद्य शंकराचार्यांचे मंदिर!गौरी शंकराहूनही जर उंच काही असेल तर ती त्या नबुंद्री ब्राह्मणाची विजिगीषा! अद्वैताची ध्वजा घेऊन हा प्रखर बुद्धिमत्तेचा ब्राह्मण पेरियार नदीचे पवित्र तीर सोडून जो निघाला तो पाखंड्यांना चेपीत चेपीत थेट काश्मिरपर्यंत आला. (अमृतसिद्धी/खंड १/ ३५६)

पुलंना सामंतीदासप्रथेच्या विरोधात अविरत भारत भ्रमण करण्याची प्रेरणा देणारा गौतमबुद्ध आपल्या भारतीय अस्मितेचे प्रतिक वाटत नाही. तर समतावादी क्रांती तोडण्यासाठी ब्राह्मणवादाचे पुनरुज्जीवन करणारा शंकराचार्य राष्ट्रीय प्रतीक वाटतो.आणिबाणीच्या विरोधातील लोकशाही संघर्षात उतरणारे, बाबा आमटेच्या आनंदवनाशी गेली तीस वर्षे संपर्क ठेवणारे पुलं 'हिंदुराष्ट्रवादी ' विचारांनी भारले जातात. उच्चजातीय मध्यमवर्गीयांत ब्राह्मणी राष्ट्रवादाची जी वैचारिक पकड आहे त्याचा वापर करून सेना महाराष्ट्रात उभी राहिली. आज ती साहित्यिक श्रेष्ठींना बिहार-युपीमध्ये चालते व्हा म्हणून धमकावणी देत आहे.

मराठी माणसाच्या दुखऱ्या अस्मितेला फुंकर घालून शिवसेना मुंबईत उभी राहिली. जातीयस्थानाला, राजकीय वर्चस्वाला आणि प्रशासनातील सुरक्षेला नव्या काळाने धक्के दिल्यामुळे महाराष्ट्रातील शहरी मध्यमवर्गात असुरक्षाभाव, प्रचलित राजकीय व्यवस्थेत स्वत्व गमावल्याचा भाव मूळ धरून होता.'मुंबई मराठी माणसांची' ही घोषणा देवून ठाकरेंनी मराठी माणसाला आपल्या कळपात आणले. पुलंच्या साहित्याने या संदर्भात कोणती भूमिका बजावलेली आहे? पुलंना मध्यमवर्गाचे भाष्यकार, उद्गाते म्हटले जाते. पुलंच्या साहित्यात मध्यमवर्गीय मनोवृत्तीचे मूल्यविवेकाचे दर्शन आहे.पुलं मध्यमवर्गीयांसंदर्भात काय म्हणतात?

'कुणीही उठावे आपल्या ढुंगणावर लाथा माराव्यात अशा मध्यमवर्गातील आपण माणसं....मृदंगासारखे दोन्ही दिशांना थपडा खात असताना थपडा देणाऱ्यांच्या जीवनातला आपला ताल आणि तोल संभाळायची जबाबदारी घेऊन जन्माला आलोय अशा भ्रमातले आपले वावरणे, करुणही आणि कॉमीकही...'(अमृतसिद्धी खंड १/३३७)

मुद्दा हा की पुलं आणि त्यांच्या भूमिकेचे समर्थन करणाऱ्या साहित्यिकांच्या भूमिकेत आंतर्विरोध आहे. हा आंतर्विरोध जूनी ब्राह्मणश्रेष्ठत्वाचे समर्थन करणारी जातिव्यवस्था आणि तिच्यावर रोपीत झालेली व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी वर्गव्यवस्था यातील आंतर्विरोधामुळे उद्भवला आहे. इतिहास आणि साहित्य लेखनाची उच्चजातीय परंपरा साहित्यिकांच्या स्वत:च्या जातिय जीवनानुभवाचा संस्कार घेऊन उभी राहाते. साहित्यिकाचे भावविश्व,साहित्यिक संस्थांचे आयोजन-संचालन आणि साहित्यातून प्रक्षेपित करायची विचारप्रणाली यावर ब्राह्मणी हितसंबंध नियंत्रण ठेवते.परिणामी ती नव्या वर्गसमाजाच्या विकासपर्वातही ब्राह्मणी राष्ट्रावाद, हिंदुत्वगौरववाद, धर्मनिरपेक्षताविरोधी धार्मिक दुराभिमान,बहुजन आणि स्त्रिया ह्यांच्या सामाजिक हक्काविषयी तुच्छतावाद पोसते. रा.स्व.संघ आणि हिंदूहृदयसम्राट ठाकरेंना फोफावण्यासाठी दलदलीची भूमी ही ब्राह्मणी वृत्ती उपलब्ध करून देते. परिणामी हे उदारमतवादी, व्यक्तिस्वातंत्र्यवादी साहित्यिक ठाकरेप्रेरित पत्रकारांवरील हल्ले, औरंगाबादचे संभाजीनगर नामांतर, य.दि.फडक्यांच्या पुरोगामी नेतृत्वाखालील साहित्य, संस्कृती मंडळावर अप्रत्यक्षपणे लादलेली बरखास्ती, वर्णव्यवस्थासमर्थक अरविंदांच्या साहित्याच्या प्रकाशनास मंजूरी आणि साहित्य संस्कृती मंडळात हिंदुत्ववाद्यांची भरती या विरोधात संघटीत वा व्यक्तिगत प्रतिकार उभा करत नाहीत.

दुसऱ्या बाजूला या साहित्यिकांमध्ये नव्या लोकशाही राजकारणाने बुद्धिप्रामाण्यवाद, समतावाद, व्यक्तिस्वातंत्र्यवाद ह्यांच्या कमीअधिक प्रेरणा उभ्या केल्या आहेत. पेशवाईच्या जातिव्यवस्थाक समाजात साहित्यिक कलावंत यांचा दर्जा 'आश्रितांचा' आणि भाटांचा म्हणून मर्यादित ठेवण्यात आला होता. उच्चजातीय वा तूर्कमोगलादी शासकांच्या स्तूतीपाठकांची ही भूमिका कलाकारांवर लादण्यात येत असे. नव्या भांडवली व्यवस्थेने साहित्यिकांच्या साहित्यविश्वाला नवा मान आणि स्वायत्तता प्राप्त झाली आहे, त्यामुळे शास्त्या वर्गजातींच्या लोकशाहीमध्ये त्याचे कलाकार म्हणून आणि स्वतंत्र नागरिक म्हणूनही हितसंबंध नाहीत कारण ठोकशाहीत त्याचे स्वातंत्र्य आणि साहित्य ठोकशाहीच्या वरवंट्याखाली दडपले जाणार आहे, म्हणून तो ठाकऱ्यांच्या साहित्यिक प्रतिष्ठाभंजनाच्या विरोधात प्रतिक्रिया देत आहे. परंतु आपल्या प्रतिक्रियेची सीमा मराठी ब्राह्मणी साहित्य आणि त्याचे भरणपोषण करणारी ब्राह्मणी जातिव्यवस्था ह्यांच्या विरोधातील टीकेपर्यंत विस्तारण्यास तो नकार देत आहे. साहित्य संस्था आणि साहित्यिक चळवळी ह्यांच्या माध्यमांद्वारे उद्दाम सत्ताधीशांना धडा शिकवण्याची रणनीती आखण्यास तो नकार देत आहे. महाराष्ट्रातील पुलं-ठाकरे द्वंद्वाने पुढे आणलेली ही वस्तुस्थिती आहे.

❖●❖

पान १५ वरून

यासाठी मी बोलतो आहे.

मला राजकारणावर बोलायचं नाही. पण, देशातली परिस्थिती इतकी गंभीर वाटते की, ती सर्वसामान्य जनांपर्यंत पोहोचवण्यासाठी, संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळातील शाहिरांसारखे शाहीर असायला हवेत असे वाटते.आज जर का ते शाहीर जिवंत असते तर मुंबईचं कोणतंच सरकार टिकलं नसतं, पण आजचे आमचे सगळे शाहीर सरकारी मान्यताप्राप्त शाहीर! संमेलनातून मंत्र्यांच्या आणि मुख्यमंत्र्यांच्या हातून फेटे, पारितोषिके आणि बिदाग्या स्वीकारत कवनं अशा तऱ्हेची करतातकी त्यात शाहिरीचा जिवंतपणा रहात नाही.मग ते काव्य 'ब्राह्मणी' होतं. अगदी तुम्ही आता वानगीदाखल जी काव्यं म्हणून दाखवलीत त्याबद्दलही माझं हेच मत आहे. तुमच्या ह्या काव्याला मान्यता मिळाली त्याचं प्रमुख कारण त्याच्यातील प्रतिमा धूसर झाल्या हे आहे, शेतकऱ्यांच्या दु:खाच्या प्रतिमा दाहक राहिल्या नाहीत. मी ज्वारी पिकवतो पण माझ्या ज्वारीच्या कणसाला चांदणं लगडलेलं दिसलं आणि मला फार हर्ष झाला असं कधी घडलं नाही. ही ज्वारी निघाल्यानंतर त्याचं पुढं काय होतं हे साहित्यात कधी येतच नाही.

मला एक सहज प्रश्न पडतो. अर्थशास्त्री मूर्ख असतील, गेली पन्नास वर्षे, शेतकऱ्यांची जाणीवपूर्वक लूट होते हे त्यांना कळलं नाही, हे समजण्यासारखं आहे, कारण ते इंग्रजी पुस्तकं वाचतात आणि त्यावरून लिहितात, त्या पुस्तकात लिहिलं नव्हतं म्हणून त्यांना कळलं नसावं. पण तुम्ही ग्रामीण साहित्यिक म्हणवणारे, मी शेतमजूराच्या घरी जन्मलो आहे म्हणून मला ग्रामीण साहित्यिकांचा वेगळा तंबू टाकण्याचा अधिकार आहेअसं मोठ्या आग्रहानं सांगणारे शेवटी शेतकऱ्याच्या दु:खाचा बाजार मांडून नागरी साहित्यिकांच्या पेठेत आपलंही दुकान असावं म्हणूनच प्रयत्न करता की नाही? जर तुम्हाला शेतकऱ्यांच्या दु:खाची खरी जाण झाली होती तर तुम्ही गावामधील झोपडं आणि गावामधील विटांचं घर यांच्यामधील भांडण का भांडलात? त्याचं खरं कारण,तुमची ग्रामीण प्रतिमा खोटी होती. तुमचं शेती अर्थव्यवस्थेचं ज्ञान हे डाव्यांच्या अर्थशास्त्राच्या पुस्तकातून आलं होतं. तुम्ही असं का नाही म्हटलं की तुम्ही कितीही ज्वारी पिकवा, कितीही पिक येऊ द्या, कणसाला चांदणं लगडण्याचं सोडा, कर्जाचा बोजा थोडा कमी झाल्याच्या आनंदाची रेषासुद्धा तुमच्या चेहऱ्यावर उमटणार नाही? कितीही पीक आलं तरी शेतकऱ्याच्या डोक्यावरचं कर्ज,आजच्या व्यवस्थेत, फिटण्याची कुठलीही शक्यता नाही असं एकाही कवीला का वाटलं नाही? हे सत्य जर तुम्ही ग्रामीण साहित्यिक मांडू शकला नाहीत तर तुमची अनुभूती किती खरी याबद्दल मला शंका आहे. तुमची अनुभूती जर इंग्रजी भाषेचं बोट धरून आलेली अनुभूती असेल तर तुमची मराठी भाषा का जगावी?

तुमची, तुमच्या भागातली आयुष्य अनुभवसंपन्न होण्याकरिता काही अमेरिका तयार करावी लागत नाही. जे काही आयुष्य आहे त्या आयुष्यातले विविधतेने अनुभव तुम्ही किती घेता हे खरं महत्त्वाचं आहे. इथे आम्ही कमी पडतो म्हणून साहित्याला हे 'ब्राह्मणी' स्वरूप येत आहे. ज्ञानेश्वरांनी 'फाटलेल्या कांबळी'च्या जागी आता 'नवी कांबळ' मागावी हे ठीक आहे.पण तीच मागणी जर का १९९५ सालचा कवी करू लागला तर त्याचा अर्थ आपलं नपुंसकत्व, आपला भ्याडपणा, आपला भीरूपणा तो देवाच्या मागे लपवायचा प्रयत्न करतो आहे. जे जे सत्य आहे ते कवीनं सांगायला काय हरकत आहे? का सांगितलं गेलं नाही? कारण आम्ही आमची अनुभूतीची सगळी क्षेत्रं लहान करीत चललो आहोत.

महाराष्ट्रातले साहित्यिक कोण? टीकाकार हे सगळे ब्राह्मण,देशस्थ ब्राह्मण, त्यात तीन चतुर्थांश कुलकर्णी आडनावाचे! लेखन कोण करतं? कविता कोण करतं? जे कॉलेजमध्ये मराठी विषय शिकवतात ते मराठी लिखाण करतात, अपवादानेच, इतर विषय शिकवणारेही मराठी लिखाण करतात. म्हणजे साधारणत: कॉलेजातील माणसं लिखाण करतात. आता कॉलेजचं विश्व ते काय? मग त्यांनी लिहिलेलं, तिनं त्याच्याकडे पाहिलं, त्यानं तिच्याकडं पाहिलं, बापानं थोडा विरोध केला, शेवटी जमलं,' असं तेच तेच लिखाण पुन्हा पुन्हा वाचावं लागलं तर तुमचं साहित्य जिवंत आहे असं म्हणताच कशाला? ते मेलचं आहे.

सॉमरसेट मॉम हा माझा फार आवडता लेखक आहे. आणि मला असं वाटतं की कुणीही लिहू इच्छिणाऱ्यांने मॉमच्या निदान चार लघुकथा वाचल्याखेरीज लिहूच नये.या माणसाने आयुष्यभर फक्त प्रवास केला. पॅसिफिकमधील एकेक बेट तो हिंडला. त्यातून घेतलेल्या विलक्षण अनुभवाला यानं साहित्यात आणलं. त्याचं साहित्य वाचलं की प्रत्येक वेळी मला वाटतं की आता अनुभवाच्या दृष्टीनं आपण सॉमरसेट मॉम इतकचं प्रगल्भ झालो आहो, आता त्या साहित्यात आपल्याला धक्का देण्याची ताकद राहिली नाही. पण ती पुस्तकं पुन्हा वाचायला लागलो की आधीच्या अनुभवापेक्षा वेगळाच अनुभव येऊन अचंबित होतो. मग लक्षात येतं की त्याच्या मानानं अजून आम्ही लहान लहान बालकं आहोत किंवा अपंग आहोत.

मराठी भाषा जिवंत ठेवायची असेल, मोठी व्हायची असेल तर, शिक्षणाची व्यवस्था बदलली पाहिजे, त्याची मांडणी वेगळी झाली पाहिजे, हे खरंच आहे. पण, त्याचबरोबर व्याकरणाकडेही लक्ष दिलं पाहिजे. नवीन व्याकरणात माझा गोंधळ होतो. अर्थामध्ये फरक करणारे अनुस्वार निघून गेल्यामुळे ते नसताना वाक्याचा नेमका अर्थ कसा लावायचा याबद्दल माझा गोंधळ होतो. भाषा सोपी लिहिणं ही काही भाषा जगवण्याची पद्धत नाही. भाषा कशी जगते? पहिली गोष्ट, भाषेतील काही शब्द हरघडी मरत असतात.आजवर किती शब्द मेले! श्री.म. माटेंचं साहित्य वाचताना मला नेहमी जाणवतं की जे शब्द माटे सहज वापरत असत ते आता मराठीचे राहिले नाहीत.

पान ४२ वर

पान १७ वरून

अशा स्वरूपात स्वत:ची खास वैशिष्टये घेऊन हे साहित्य उभे राहिले.त्यांचे प्रवाह निर्माण झाले. प्रस्थापित ब्राह्मणी -भांडवली साहित्य प्रवाहाने त्याना मान्यता देण्यात सुरूवातीला खळखळ केली आणि मग त्यांना सामावून घेण्याचा प्रयत्न आजतागायत चालू ठेवला.

सत्यशोधक प्रवाहाने जोतीबा फुल्यांच्या माध्यमातून घेतलेल्या भूमिकेशी सुसंगत रीतीने ब्राह्मणी-भांडवली साहित्य प्रवाहात सामिलीकरण करून घ्यायला नकार देऊन आणि मानवमुक्तीच्या साहित्याचा एकसंघ प्रवाह निर्माण करण्याची प्रक्रिया बळकट करण्याचा भाग म्हणून दलित-आदिवासी-ग्रामीण संयुक्त साहित्य प्रवाहाची सुरूवात झाली आहे. या सर्व प्रवाहांच्या ऐतिहासिक आणि जीवन प्रेरणांमधून निर्माण होणारी ही अपरिहार्यता होती.

या सर्व साहित्य प्रवाहांचा गाभा जरी त्यांच्या विभागीय अनुभूतींच्या मुशीतून जन्माला आलेला असला तरीं त्याची झेप एकंदर मानवी जीवनाला 'अमानुष' बनवणाऱ्या प्रस्थापित जीवनातील गरजांच्या बंधनांमुळे स्वातंत्र्यावर मर्यादा आणणाऱ्या, सांस्कृतिक - सामाजिक-भौतिक समृद्धीला पारखे करणाऱ्या, माणसांना कप्पेबंद करून उतरंडीत रचणाऱ्या, निसर्गापासून परात्म करणाऱ्या बंधनाना तोडण्याकडे आहे.त्यामुळे हा गाभा पूर्ण साकारण्यासाठी,त्यांच्या जन्माच्या विशिष्ट मुशीला टीकात्मक पद्धतीने पार करून या साहित्य प्रवाहांना त्यांच्या झेपेशी सुसंगत प्रेरणा ज्या ज्या मुशींमधून येतात त्यांच्याशी नाते जोडून समृद्ध होणे अपरिहार्य आहे.मानवमुक्तीचे साहित्य बनणे अपरिहार्य आहे.ब्राह्मणी भांडवली साहित्यप्रवाहात केवळ सामील न होण्याने हे जमणारे नाही.त्यापुढे जाऊन या ब्राह्मणी - भांडवली साहित्य प्रवाहाच्या सर्वांगांना समग्र नकार देऊनच त्यांना समृद्ध होता येईल. दलित-आदिवासी-ग्रामीण संयुक्त साहित्य प्रवाह अशा सर्व दृष्टिकोनांच्या आधारावर विकसित होण्यासाठीच तयार झाला आहे.

'आम्ही दलित आहोत, शोषित आहोत, या दलित शोषितपणाचे आमचे जीवन आम्ही भोगीत आहोत.हे आमचे भोगणे, त्या भोगण्यातले दु:ख,त्या जीवनातही आम्ही निर्मितीक्षम रीतीने जगून मिळवलेला आनंद आणि माणुसकी आम्हीं साहित्य रूपात मांडणार. असंतोष आणि मुक्तीची उर्मी यातून त्याला जिवंतपणा देणार' हा दलित साहित्याचा पाया ठरला.त्या प्रकारे ग्रामीणता, कष्टकरी-शेतकरी आणि मजुरीच्या जीवनातील शूद्र जातीय कुणबी-कुळवाडीपणाचा जीवनानुभव यातून ग्रामीण साहित्य विकसित झाले.आदिवासी जीवनाच्या अशाच विविधांगी अनुभूतीतून आदिवासी साहित्य, स्त्री-दास्याच्या जीवनातून स्त्री साहित्य, आधुनिक भांडवली शोषणाच्या विरूद्ध द्याव्या लागणाऱ्या संघर्षमय अनुभव-सत्यातून जनवादी साहित्य जन्माला आले आहे.या साहित्यप्रवाहांची जन्मरीत संत कवी तुकारामाच्या भाषेत फार चांगल्याप्रकारे व्यक्त झाली आहे.''बरा कुणबी केलो, नाही तरी दंभेचि असतो मेलो'' असे म्हणणाऱ्या तुकारामांच्या एका अभंग काव्याप्रमाणे आज या सयुंक्त प्रवाहातले प्रवाह घडले आहेत-

'' नाही सरो येत जोडिल्या वचनी
कवित्वाची वाणी कुशलता
सत्याचा अनुभव वेधी सत्यपणे
अनुभवाच्या गुणे रूचो येतो
काय आगीपाशी शृंगारिले चाळे
पोटीचे उकळे कसापाशी
तुका म्हणे येथे करावा उकल
लागे चि ना बोल वाढवूनि ''

या साहित्य प्रवाहांची ही अनुभव सत्याच्या बांधिलकीशी जिवंत नाते असणारी जन्म रीतच त्यांना निर्मितीक्षम पद्धतीने आणि अपरिहार्यपणे एकसंघ मानवमुक्तीच्या साहित्याकडे घेऊन जाणारी आहे. ही प्रक्रिया कशी आहे-असू शकते हेही पुन्हा एकदा तुकारामांच्या काव्यातून फारच नेमकेपणाने व्यक्त होते-

'' मी चि मज व्यालो
पोटा आपुलिया आलो
आता पुरले नवस
निरसोनी गेली आस
जालो बरा बळी
गेलो मरोनी ते काळी
दोहीकडे पाहे
तुका आहे तैसा आहे''

आदरांजली

कॉ.गोदूताई परूळेकर,

दया पवार,

कॉ. एस.जी. सरदेसाई,

साथी शिरूभाऊ लिमये

यांच्या स्मृतींना

विनम्र अभिवादन

पान १८ वरून

तेतर पक्षांनी एकमेकांवर टिका शत्रुभावाने न करता भातृभावाने केली, तरच जात्यन्तक मुक्तीचा सर्वमान्य किमान कार्यक्रमाचा मार्ग निघू शकेल.

भारतीय इतिहासात व साहित्यात बहुजन या नावाचा कोणताही विषमताविरोधी व समतावादी पंथ नव्हता हे कारण बहुजन-साहित्य हे नामकरण नाकारायला पुरेसे आहे. वाळव्याच्या स्थानिक मंडळींचे मत महासभेचे नामांतर सत्यशोधक साहित्य असे करायचे असल्याचे कळते. सत्यशोधक समाज व चळवळ यांचे प्रवर्तन फुलेंनी केले. त्यापूर्वी भारतीय इतिहासात व साहित्यात सत्यशोधक नावाचा कोणताही पंथ नव्हता आणि मराठी साहित्यात आजही नाही.म्हणून या नावाचा विचार होऊ शकत नाही. वाळवा संमेलनाचे अध्यक्ष नारायण सुर्वे हे सुप्रसिद्ध कम्युनिस्ट आहेत. पण त्यांनी मार्क्सवादी वा कामगारवर्गीय साहित्य या नामकरणाची अजून सूचनासुद्धा मांडली नाही. प्राचीन ग्रीक व रोमन साहित्यात क्लासिकस(अभिजनवादी) व प्रोलेतरियस (सर्वहारावादी) असे दोन वर्गीय तट होते.ते भांडवलदारी समाजापर्यंत चालत आले. पण ब्रिटिशपूर्व भारतीय समाजात वर्ग ही संस्थाच नसल्याने असे वर्गीय तट भारतीय साहित्यात वैदिककाळापासून आजतागायत नव्हते. यशवंत मनोहरांची आंबेडकरी साहित्य ही सूचना आंबेडकरपूर्व विषमताविरोधी व समतावादी साहित्यास लागू पडत नाही.तेच राजा ढालेंच्या बौद्ध साहित्य या सूचनेचे आहे. बुद्धापूर्वीही विषमताविरोधी व समतावादी साहित्य होते.विश्वकोशकार केतकरांच्या मते रामायण व महाभारत हे मुळात वैश्य सूतांचे साहित्य होते आणि वाल्मिकी व व्यास यांनी त्यांचे व्यवस्थितीकरण केले. महाभारतातील ब्राह्मण व शूद्र हे सर्वथा समान असल्याचे प्रतिपादन नहुषाचा युधिष्ठिराशी झालेला वाद आणि समानतेवरून दासप्रथेचे खंडन करणारा वैश्य तुलाधाराचा ब्राह्मण जाजलीला उपदेश हे बुद्धपूर्व विषमताविरोध व समतावादी साहित्य आहे.

अब्राह्मणी

हा संघर्ष प्राग्वैदिक काळापासून कसा चालू आहे हे मी प्रसिद्ध्याभिमुख 'जातिव्यवस्थाक सामंती सेवकत्व' या खंड २ मध्ये दाखवले आहे.प्राग्वैदिककालीन वर्णसंघर्षाच्या सुरूवातीपासूनच या संघर्षात पुढाकार घेणारे वेने, बली व नहुष यासारखे क्षत्रिय व तुलाधारासारखे वैश्य असले, तरी विषमतेची दोन टोके ब्राह्मण व शूद्र ही होती आणि त्यामुळेच समतेची कसोटी या दोन टोकात समानता प्रस्थापित होणे ही होती. इतिहासाचार्य राजवाडेंनी भारतीय इतिहासाचे हे मर्म ओळखून शूद्रविरोधी सामाजिक संघर्षात ब्राह्मण हा पुढारी असून क्षत्रिय व वैश्य त्याच्या कलाने चालणारे असे म्हटले आहे. त्यांनी स्त्रियांना शूद्रांच्या फळीत टाकलेले आहे. शेवटचा मौर्य सम्राट ब्रुहद्रथ याचा सेनापती पुष्यमित्राने इ.स. १८४ त खून करून राज्य बळकावले याला राजवाडे बौद्धविरोधी ब्राह्मणी प्रतिक्रांती असे म्हणतात. पुष्यमित्राच्याच अमदानीत ब्राह्मणी मनुस्मृतीची रचना झाली.

या संघर्षात विषमतेविरोधी समतेची भूमिका बजावणाऱ्याला 'अब्राह्मण'हे नाव वैदिककाळापासूनच पडलेले आहे. तंत्र म्हणून प्रख्यात झालेल्या पंथाला ऋग्वेदीय १०.७१.९ या ऋचेने 'न ब्राह्मणास:' म्हटलेले आहे.. या ऋचेचा महामहोपाध्याय सिद्धेश्वरशास्त्री यांनी केलेला अनुवाद असा ''वेदार्थ ज्ञानाचा थांग न लागलेले अज्ञ(न ब्राह्मणस:) यज्ञकार्यअसमर्थ (न सुतंकरास:) आणि पापी लोक लौकिक भाषारूपी नांगर हाती धरून शेती (तंत्रम्) करतात''

ऋग्वेदाच्या ऐतरेय या ब्राह्मणग्रंथाचा कर्ता महिदास ऐतरेय.छांदोग्य उपनिषदाने ऐतरेय या नावाची व्युत्पत्ती -'इतराया अपत्यम् ऐतरेय:' अशी दिली आहे. तो इतरा या स्त्रीचा मुलगा, म्हणजे मातृनामक, म्हणजे अनार्य होता. त्याने हे यज्ञदर्शन रचले असे हे उपनिषद म्हणते.म्हणजे यज्ञ ही संस्था अनार्यांकडून आर्यांकडे आली असे यावरूनही सिद्ध होते. ऋग्वेदातील महत्त्वाची सूक्ते रचणाऱ्या कवष ऐलूष या ऋषीची कथा ऐतरेय सांगतो. ब्राह्मण ऋषींनी सरस्वतीतीरी केलेल्या यज्ञसत्रातील सोमपानाच्या पंगतीत कवष ऐलूष बसलेला पाहून ब्राह्मण ऋषींची माथी ठणकली. त्यांनी त्याला शिव्या देऊन पंगतीतून उठवले आणि सरस्वतीच्या वाळवंटात तहानेने मरायला हाकलले- ''ते कवषम् ऐलूषं सोमाद् अनयन्, दास्या: पुत्र: कितवो, अब्राह्मण:। कथं नो मध्ये दीक्षिष्ट'इति। तं बहिर्धन्व उदवहन। ' त्याला दिलेली एक शिवी 'अब्राह्मण' ही आहे. ऐलूष या नावाची व्युत्पत्ती पुन्हा ऐलूषाचा पुत्र अशी आहे. तो मातृसत्ताक म्हणून अनार्य आणि अब्राह्मण म्हणून वर्णव्यवस्थाविरोधी. त्याची ऋग्वेदातील दहाव्या मंडलातील ३० ते ३४ सूक्ते अब्राह्मणी साहित्यच म्हटले पाहिजे.

ऋग्वेद व अथर्ववेद यांतील स्त्रीऋषींनी रचलेली स्त्रीराज्यविषयक सूक्ते आद्यतम अब्राह्मणी साहित्य म्हणावे लागेल. कारण स्त्रीराज्यात दोनच वर्ण होते. एक क्षत्र (स्त्री) व दुसरा ब्रह्मन् (पुरुष). स्त्रीचे साहित्य ते अब्रह्मन साहित्य. अब्रह्मन साहित्य हे विषमताविरोधी व समतावादी आणि ब्रह्मन साहित्य हे विषमतावादी व समताविरोधी. राष्ट्रीदेवी वाक् अम्भृणी वा नैर्ऋती दुर्गा ही अथर्ववेदाच्या ४.३०.२.१५ या मंत्रात गाते की, मी स्त्री राज्याची राणी आहे, गणधनाचे निधान व मी माझ्या जनांचे गणभोजन करते. गणाच्या समतेची हमी देणाऱ्या लोकशाहीच्या सभा व समिती या संस्था 'मी निर्मिल्या' असे विराट अथर्ववेदीय ८.१०.१ च्या ५ व ६ या मंत्रामध्ये सांगते. आद्य स्त्रीराज्याची राणी निर्ऋति इने गणभूमी व गणधन समानपणे वाटण्यासाठी जो चौपट व फासे बनवले त्यांना पुरुषसत्तेने जुगाराचे साधन बनवले. कौरवांच्या गणसभेत युधिष्ठिराने स्वत:सह बाकी पांडव व द्रौपदी यांना पणाला लावल्यानंतर ते कौरवांचे दास व दासी बनले, म्हणून द्रौपदी पुरुषसत्ताक गणसभेचा निषेध करीत म्हणते,

''न सा सभा यत्र न सन्ति वृद्धा

न ते वृद्धा ये न वदन्ति धर्मम् ।'' २.६७.५२ ।

रामायणातला आंतरिक संघर्ष हा अब्राम्हणी सीता विरूद्ध ब्राह्मणी राम आणि महाभारतातला संघर्ष अब्राह्मणी द्रौपदी व ब्राह्मणी पांडव यांच्यातला असल्याचे म्हणूनच मीं सांगत असतो.

'त्रि-पिटक' हा भारतीय अब्राह्मणी साहित्यातला महत्तम विषमताविरोधी व समतावादी ग्रंथराज आहे.बौद्ध भिक्षुभिक्षुणींनी '' सब्बे वण्णा समसमा होन्नि' हे सूत्र सांगून वर्णान्त-समाजक्रांती केली आणि मनुष्येतर प्राणी व वनस्पतीसृष्टीतच जाती(स्पेसीज) असतात, मनुष्यांमध्ये नाही, ही जात्यन्तक क्रांतीची भविष्यगाथा म्हटली.

''जाति-विभंगं पाणानं अग्गमग्गा हि जातियो।

एवं नत्थि मनुस्संसु लिंगं जातिमयं पुथु।। ''

बुद्धकाळापासून वर्णप्रथाक गणसमूहाचा अंत व जाति-प्रथाक सामंतसमाजाचा उदय सुरू झाला. अब्राह्मणीचा अर्थ यापुढे वर्णजातस्त्रीदास्यविरोधी व ब्राह्मणीचा अर्थ वर्णजातस्त्री-दास्यसमर्थक असा होऊ लागला. या सामंतसमाजात केरळ-सारखी स्त्रीप्रधान राज्ये अब्राह्मणी व पुरुषसत्ताक राज्ये ब्राम्हणी म्हटली जाऊ लागली. महाभाष्यकार पतंजली (इसवीपूर्व २ रे शतक) पाणिनीच्या १.४.१ या सूत्रावर भाष्य करताना भारतीय राज्यांचे अब्राह्मणी व ब्राह्मणी असे विभाजन करतो-'' अब्राह्मणको दंश:। अवृषलको देश:।। मनुस्मृती अब्राह्मणी राज्यांना शूद्र राज्ये म्हणते आणि त्यात काय पण ब्राह्मणी राज्यांमधील अब्राह्मणी पंथांचे प्राधान्य असलेल्या गावातही वर्णजातीधर्म पाळणाऱ्याने राहू नये असे सांगते-

न शूद्र -राज्ये निवसेन् न अधार्मिक जन: आवृते।

न पाषाण्डिगण-अक्रांन्ते न उपसृष्टे ए न्त्यगैर नृभि:।।४.६१.

इसवीच्या १ ल्या शतकापासून वेदान्त, न्याय,वैशेषिक व पूर्वमिमासा या ब्राह्मणी तत्त्वज्ञानांचा बौद्ध, तंत्र, लोकायत, जैन व सांख्य(पुढे ब्राह्मणी छावणीत) या अब्राह्मणी तत्त्व-ज्ञानांशी संघर्ष तीव्रतर होत गेला. महाकवी व महादार्शनिक अश्वघोषाने (२ रे शतक) 'वज्रसूची' हे वर्णजातखंडनपर काव्य लिहिले.ब्राह्मणी तत्त्वज्ञानाचे साहित्य ब्राह्मणी म्हटले गेले आणि अब्राह्मणी तत्त्वज्ञानाचे अब्राह्मणी. ७ व्या शतका-नंतर जातिव्यवस्था अप्रवाही व कर्मठ होत गेल्यानंतर हा संघर्ष कमी न होता वाढत गेला. ७ व्या शतकापासून ते तुर्कागमनापर्यंतचा (१२ वे शतक) काल हा ८४ सिद्धांचा मानला जातो. हे सर्व अब्राह्मणी धर्माचे व मुख्यत: खालच्या जातींचे होते.सिद्ध सरहपाद (७ वे शतक) हा आद्य अपभ्रंश कवी मानला जातो.हा मूळचा ब्राह्मण, बौद्ध भिक्षू होऊन नालंदा महाविहारात संस्कृतचा आचार्य झाला, आणि मग भिक्षुत्वाचा त्याग करून अस्पृश्य शरकारकन्येचा हात धरून आजीवन सहजयानाचा प्रसार करीत फिरला.त्याच्या दोहांमध्ये तो ब्राह्मण्याचा निषेध करून समतेचे गान करतो-

— जब्बै मन अस्तमन जादू, तब टुटै बंधन।

तब्बै समरस मध्ये, ना शुद्र ना ब्राह्मण।।

तिबेटात त्याला द्वितीय बुद्ध मानतात.त्याचा भारतात नष्ट झालेला दोहा-कोष राहुल सांकृत्यायनांना तिबेटात सापडला. बोधिसत्व दिग्नागाचा(४ थे शतक) प्रमाणसमुच्चय' हा भारतीय तर्कशास्त्रात महत्तम मानला जाणारा ग्रंथही राहुलजींना तिबेटात सापडला. भारताचा महत्तम दार्शनिक मानला गेलेला दिग्नागशिष्य धर्मकिर्ति (७ वे शतक) हा पाच मूर्ख-पणात जातिवादाचा समावेश करतो.

'वेदप्रामाण्यं कस्यचित् कर्तृवाद:स्नाने धर्मेच्छा,जातिवाद—।

सन्तापनं पापहानाय चेति ध्वस्तप्रज्ञानां पंच लिंगानि जाड्ये।।

'अवधूत' चा अर्थ आपटेंची ' संस्कृत इंग्लीश डिक्शनरी' असा देते- यो विसंघ्य आश्रमान् वर्णान् आत्मन्य एव स्थित: पुसान । अतिवर्णाश्रमी योगी अवधूत: स उच्यते। ज्ञानेश्वर हे सिद्ध सरहपादाच्या परंपरतले. चक्रधर व बसवेश्वर हे तांत्रिक परंपरेतले. चक्रधर हा सर्वाधमत्व ब्राह्मणत्व' म्हणून ब्राह्मण्याचा निषेध करतो.बसवेश्वराने तर ब्राह्मण मुलगी व अस्पृश्य मुलगी यांचे लग्न लावले.चक्रधराच्या जातीबद्दल संदिग्धता असली (तो उच्चजातीय निश्चितच होता), तरी बसवेश्वर हा श्रोत्रिय ब्राह्मण होता.त्याच्या वीरशैव संप्रदायातील अक्कमहादेवी ही संसार त्यागापासून आजीवन नग्न राहिली.(ती आपल्या घनदाट केसांनी आपले शरीर झाकून घेई)आणि तिने आंध्रातल्या श्रीशैलावरील स्त्री राज्यात जाऊन समाधी घेतली.

भक्तिसंप्रदायाचे सर्व स्त्रीपुरुष संत त्यांच्या काव्यांत ब्राह्मण्याचा कमीअधिक प्रमाणात निषेध करतात आणि ईश्वर-उपासनेतील समतेचा पुरस्कार करून आपला जातिव्यवस्था-विरोध व्यक्त करतात.

शिवाजी प्रारंभी जरी भक्तिपंरपरेने प्रभावित झालेला असला, तरी दुसऱ्या तांत्रिक राज्यभिषेकापासून तो शाक्त झाला. प्रभावळच्या ब्राह्मण सुभेदाराला तो पत्रात खडसावतो-'ब्राह्मण म्हणून कोण मुलाहिजा ठेवतो' म्हणून ब्राह्मण सरकारकुनांनी त्याला सोयराबाईकरवी विष देऊन मारले. संभाजी तर बालपणापासून शिवाजीच्या प्रेरणेने शाक्त होता. ब्राह्मण सरकारकुनांने त्याच्यावरही विषप्रयोगाचा प्रयत्न केला आणि शेवटी त्याला मोगलांना पकडून दिले. संभाजी संस्कृत पंडित होता. त्याच्या नावावर खपवले जाणारे 'बुधभुषणम् ' हे ब्राह्मणी चोपडे पाहाता त्याने अब्राह्मणी साहित्यरचना केली असणे सर्वथैव शक्य आहे.

आधुनिक काळात जात्यन्त ब्राह्मण्याशी झगडयाशिवाय होणार नाही हे फुलेंनी प्रथम 'गुलामगिरी'त मांडले.

'परंतु आमची पूर्ण खात्री झाली आहे की,आपल्या उच्च स्वयंसिद्ध पदावरून ब्राह्मण हा खाली उतरून कुणब्यांशी आणि कनिष्ठ वर्गातील लोकांशी बंधुत्वाच्या समान भूमिकेवरून , आम्ही त्याच्याशी झगडा केल्याशिवाय, कधीही आप-

सूक येणार नाही'

अब्राह्मणी या नामांतराला 'निगेटिव्ह' म्हणून विरोध करणाऱ्या भारत पाटणकरांनी ८७ च्या वाळवा संमेलनासाठी जो 'जाहीरनाम्याचा मसुदा' माझ्याकडे पाठवला त्याच्या सुरुवातीला फुलेंनी ब्राह्मणी मराठी ग्रंथकारसभेच्या साहित्य संमेलनाच्या आमंत्रणाला पाठवलेले नकाराचे पत्र उदधृत केले आहे(पहा-सत्यशोधक मार्क्सवादी'नोव्हें.डिसें. ८८) निवडणुकीसाठी बहुजन पार्टीत गेलेल्या नागनाथ नाईकवाडींबरोबर ते मार्क्सवाद गुंडाळून ठेवून राहिले यावरून त्यांच्या तत्त्वनिष्ठेची कल्पना येऊ शकते.

अस्पृश्यांची शूद्रांपासून वेगळी चळवळ उभारून बौद्ध धम्मान्तर केल्यानंतरही जात्यन्तक लोकशाही क्रांतीचे नेतृत्व दलित जातींनी केला पाहिजे ही आपली व्यूहरचना आंबेडकरांनी कायम ठेवली. ज्याप्रमाणे वर्गान्त भांडवलशाहीशी लढल्याशिवाय होणार नाही त्याप्रमाणे जात्यन्त ब्राह्मणशाहीशी लढल्याशिवाय होणार नाही ही त्यांची अखेरपर्यंत भूमिका होती. या भूमिकेतून दलित साहित्याचा जन्म झाला आणि त्याने भारतीय साहित्याला पुनश्च जातिव्यवस्थाभिमुख केले हे त्याचे सर्वात मोठे योगदान आहे.पण त्याचा मोहरा ब्राह्मणवादाविरूद्ध न वळता कम्युनिझमविरूद्ध वळावा अशी खटपट रा.ग.जाधवांच्या 'निळी पहाट' मध्ये केलेली आहे. पुढील उतारे पहा-

'गांधीवाद,मार्क्सवाद, समाजवाद यांच्या पठडीतून दलित आंदोलन हळूहळू बाहेर पडले आणि आंबेडकरवादाचे तत्त्वज्ञान त्याने आत्मसात करण्यास प्रारंभ केला. ...(पान.१)

म्हणजे आंबेडकरवाद समाजवादाच्यासुध्दा विरोधी होता! बौद्ध जीवनमुल्ये दलित चळवळीला वर्गकलहापासून,म्हणजे परत्वे जात्यन्तसंघर्षापासून अलिप्त ठेवतील अशी या ब्राह्मणी विचारवंताची अपेक्षा होती-

'...मुख्य म्हणजे, बौद्ध जीवनमूल्यांची कास धरल्यास केवळ नकारात्मक विचारसरणीपासून संरक्षण होईल. कदाचित वर्गकलहाच्या प्रलोभनिय विचारसरणीलाही तो चार हात दूर ठेवू शकेल...(पान.१९)

दलितपूर्व साहित्य विद्रोही नाही असे जाधव म्हणतात.(पा.३६) तर मे. पु. रेगे असे म्हणण्यापर्यंत जातातकी,'आपल्या समाजात प्रामाणिक बंड असं झालंच नाही' आणि असे प्रामाणिक बंड प्रथम दलितच करीत आहेत.(पा.४) जणू काय जाधव व रेगे हे 'प्रामाणिक बंडखोर' आहेत!एका बाजूला अपूर्व व अनन्य विद्रोही म्हणून दलितसाहित्यिकांचा अहंकार फुलवायचा व दुसऱ्या बाजूला त्यांना उपरोक्त अब्राह्मणी साहित्यपरंपरेपासून तोडायचे असा हा ब्राह्मणी डावपेच आहे. दलित चळवळ ससंदीयवादात अडकल्यानेही तिने आंबेडकरवादांचा जातवर्गस्त्रीदास्यान्तक क्रांतिकारी गाभा दुर्लक्षून कम्युनिस्टविरोधावर भर दिला.पारंपारिक कम्युनिस्टांच्या जात्यान्ताकडे दुर्लक्ष करण्याच्या ब्राह्मणी भूमिकेमुळे दलित चळवळीच्या कम्युनिस्टविरोधाला खतपाणी मिळाले. परिणामी ब्राह्मण्यविरोधच जातियवादी म्हणून बदनाम केला गेला. बाबूराव बागुल म्हणूनच ब्राह्मणी साहित्याला 'सदाशिवपेठी' साहित्य असे उखाण्यात बोलतात आणि त्याच्याविरोधी खंबीर अब्राह्मणी भूमिका घ्यायचे टाळतात. प्रथितयश ब्राह्मणेतर साहित्यिकांचे ब्राह्मणीकरण करणे हे ब्राह्मणी छावणीचे एक महत्त्वाचे वैचारिक हत्यार आहे.

अब्राह्मणी सौंदर्यशास्त्र

ब्राह्मणेतर साहित्यांना सौंदर्यशास्त्राबाबत नि:शस्त्र परत्वे ब्राह्मणी साहित्यशास्त्रावर अवलंबून ठेवणे हा ब्राह्मणी छावणीचा सर्वात महत्त्वाचा साहित्यकलाविषयक डावपेच आहे.

अब्राह्मणी दार्शनिक छावणीचे नेतृत्व करणारे ब्राह्मणही होते. पण, ब्राह्मणी दार्शनिक छावणीचे नेतृत्व करणारे केवळ ब्राह्मणच होते. देवीप्रसाद चट्टोपाध्याय सांगतात की, वेदान्त, न्याय, वैशेषिक व मीमांसा या तत्त्वज्ञानांचे सर्व आचार्य निरपवादपणे ब्राह्मण होते. भरताच्या (१ ले शतक) नाट्यशास्त्रापासून ब्राह्मणी साहित्यशास्त्राची जी परंपरा आजतागायत चालत आली, तिचेही सर्व आचार्य -राजा भोज सोडून-ब्राह्मण होते. भोज हा क्षत्रिय असला तरी ब्राह्मणी समाजव्यवस्थेचा व साहित्यशास्त्राचा पुरस्कर्ता होता. या ब्राह्मणी साहित्यशास्त्राविरूद्ध अब्राह्मणी छावणीने आपला पर्याय उभारून संघर्ष केला काय? ब्राह्मणी छावणी वर्णजातसमर्थक असल्याने ती साहित्यशास्त्रापलिकडे जाऊन सौंदर्यशास्त्र निर्मू शकली नाही. पण, अब्राह्मणी छावणी वर्णजातींच्या भिंती मानीत नसल्यामुळे ती सौंदर्यशास्त्र निर्मू शकत होती.तसे तिने केले काय? पां.वा.काणेंसह बहुतेक सर्व तज्ञांचे यांवर एकमत आहे, की ब्राह्मणी साहित्यशास्त्र हे एकमेव साहित्यशास्त्र होते. त्यामुळे सौंदर्यशास्त्राच्या शक्यतेचा प्रश्नच उदभवत नाही.अपवाद केवळ एस.पी.भट्टाचार्य व अनंतलाल ठाकूर पंडितांचा आहे. मला मोठ्या प्रयासाने भट्टाचार्यांचा पेपर मिळाला. ठाकुरांचा मिळालाच नाही.पण या दोन्हीही पंडितांनी बौद्ध तर्कशास्त्राच्या अंगाने युक्तिवाद केलेले आहेत, दार्शनिक अंगाने नाही. त्यामुळे त्यांचे युक्तिवाद काणेंनी उडवून लावले आहेत. देवीप्रसाद चट्टोपाध्यायांचा मार्क्सवादी पंडित म्हणून भारतीय तत्त्वज्ञानावर अनन्य अधिकार असूनही त्यांनी भारतीय साहित्यशास्त्रावर एक अक्षरही लिहिलेले नाही. याला कारणीभूत त्यांची वर्गवादी अन्वेषणपद्धत असू शकते. दिग्नाग स्कूलने ब्राह्मणी तत्त्वज्ञानांची एवढी दाणादाण उडवून दिली असूनही आणि पतंजलीनंतर संस्कृत भाषा व व्याकरणाची आब बौद्ध वैयाकरणांनीच ठेवलेली असूनही दिग्नाग स्कूलने ब्राह्मणी साहित्यशास्त्राच्या 'एकछत्री' अमलाला धक्काही लावला नाही हे संभवनीय नाही.पण, अश्वघोषासारख्या दार्शनिक महाकवीची व दिग्नाग स्कूलची एकही साहित्यशास्त्रीय कृती उपलब्ध नाही हेही तितकेच खरे आहे.बौद्ध राजा हर्षचे (६वे शतक) नाट्यशास्त्रावर एकवर्तिक आहे, पण, त्याच्या नावावरची नाटकेही त्याने लिहिलेली नसून बाणभट्टासारख्या ब्राह्मण साहि-

त्यिकांनी लिहिलेली आहेत असा जेथे दावा केला जातो, तेथे त्याला साहित्यशास्त्री मानतो कोण? धर्मकिर्तीच्या कविता ब्राह्मणी साहित्यशास्त्र्यांनी उदधृत करण्याइतका तो मान्यवर कधी होता, पण त्याला साहित्यशास्त्री मानायला काहीच पुरावा नाही. म्हणून मला उपरोक्त दुसऱ्या खंडात बौद्ध सौंदर्यशास्त्राची तत्त्वज्ञानाच्या अंगाने पुनर्रचना करावी लागली. अभिनव गुप्तासहित (१० वे शतक) ब्राह्मणी साहित्यशास्त्राचे प्रमाणशास्त्र प्रतिबिंबवादी आहे. पण, दिग्नागीय सौत्रान्तिक विज्ञानवादाचे प्रमाणशास्त्र जाणिवेपलीकडच्या नेणिवेचा ठाव घेऊन सौंदर्य व प्रतिभा यांची सम्यकव्याख्या करू शकत असल्याने त्याने जागतिक सौंदर्यशास्त्रात आगळेवेगळे सौंदर्यशास्त्र निर्मिले असल्याचे मी उपरोक्त २ ऱ्या खंडात दाखवले आहे, आणि त्याआधारे आजच्या अब्राह्मणी साहित्य व कलांचे सौंदर्यशास्त्र कसे उभे राहू शकते हे सूचित केले आहे.

अब्राह्मणी साहित्य व कला आणि त्यांचे सौदर्यशास्त्र यांची एवढी अनन्य संपदा उपलब्ध असता बहुजन की आणखी काही असा घोळ घालणे म्हणजे म्हणजे जात्यन्तक लोकशाही क्रांतीचे प्रबोधन रोखून धरणे आहे.या नकारात्मकतेमुळेच ब्राह्मणी हुकुमशाही केंद्रीय सत्ता काबीज करण्याकडे झपाट्याने वाटचाल करीत आहे. विषमताविरोधी व समतावादी साहित्याचे व संघटनेचे नामकरण अब्राह्मणी असे करून अब्राह्मणी सौंदर्यशास्त्राद्वारे प्रबोधनक्रांतीचे सर्व स्त्रोत मुक्त करणे ही काळाची निकड आहे.

❖❖❖❖❖

पान ३७ वरून

मधे एकाला कुसुमाग्रजांची 'गर्जा जयजयकार ' वाचून दाखवित होतो, तर तो मनुष्य म्हणाला की, 'यातील मराठी शब्द कुठे गेलो हो?' मी म्हटलं,'मेले'. कोणत्याही भाषेतील शब्द असे मरतच असतात. मराठीतील शब्द असेच मरत राहिले पण त्यांच्याजागी नवीन शब्द आलेच नाहीत. मराठी भाषा जर टिकायची असेल तर तिच्यातील जितके शब्द निघून जातात त्याच्यापेक्षा जास्त शब्द दररोज जन्माला आले पाहिजेत, कारण शब्दांचं मरणं हे अपरिहार्य आहे.

पण, कुठून हो यावे तुमच्या माझ्या मराठीत शब्द? आम्ही सगळंच आडगिऱ्हायकी जगतो. आमची यंत्रसामुग्री, तंत्रज्ञान, आमचं विज्ञान, आमचे विषय हे सगळे आडगिऱ्हायकी. असा आडगिऱ्हायकी धंदा करून आम्ही पोट जाळण्याचं काम करतो. मग आमच्या अनुभवामध्ये विविधता यावी कुठून आणि वेगवेगळे नवीन शब्द यावे कुठून? शब्दांची भर नाही, आणि त्यापलिकडे, जी काही साहित्यनिर्मिती होते ती अनुभूतीची नाही.मग, मराठी भाषा कशी काय जगायची?

माझ्या पुस्तकांपैकी बहुतेक पुस्तकं मी मराठीत लिहिलीत हे वर सांगितलेच आहे. माझ्यावर, विशेषत: तत्त्वज्ञानावरच्या माझ्या पुस्तकाच्या संदर्भात आक्षेप घेतला जातो. त्यातल्यात्यात 'स्वातंत्र्याच्या कक्षा' (Degrees of Freedom) ही जी कल्पना मांडली आहे, त्यासंबंधात मोठमोठ्या लोकांनी तक्रार केली आहे. त्यांच म्हणणं, ''स्वातंत्र्याच्या कक्षा ही संकल्पना इतकी क्रांतिकारी आहे की ती तुम्ही लिहिलीत का याबद्दल पुढे इतिहासात वाद होणार आहेत. तेव्हा लवकरात लवकर ती तुम्ही इंग्रजीत लिहून ठेवा, तरच तुम्हाला त्याच्यावरचा बौद्धिक संपदाहक्क (Intellectual Property Right) मिळेल, नाहीतर तो जाईल.'' अजून मी मोह टाळला आहे. परंतु जसजशी आयुष्याची संध्याकाळ जवळ येत आहे तसतसं मला वाटू लागलं आहे की, 'स्वातंत्र्याच्या कक्षा ही संकल्पना इंग्रजीत पुढे मांडावी का मराठीचा अभिमान बाळगावा?' ह्या दोन विचारांमध्ये जर का द्वंद्व सुरू झालं तर मला अशी भिती वाटते की मराठी भाषेची घसरण पाहून मी मोहाने ते पुस्तक इंग्रजीत लिहीन. मग काय करावं? शाहीर सगळे सरकारच्या नादी लागले, आणि संपले. तुळशीदास जाधवानं आदिलशहाच्या दरबारात जाऊन डफावर मारावी असं हे झालं. आज, शेतकऱ्यांच्या पोटी जन्मलेले म्हणवणारे शाहीर, ज्यांच्याहाती शेतकऱ्यांच्याच माना कापायच्या सुऱ्या आहेत त्यांच्या आश्रयाने आपल्या संध्याकाळी मोठ्या आनंदात घालवीत आहेत. आणि मग हे साहित्य क्रांतिकारी होऊ शकत नाही.

मग काय करावं? माझ्यासारखी सामान्य माणसं, जी साहित्यिक नाहीत, ती काय विचार करतात? मागे पुण्याला आम्ही एक चर्चासत्र घेतलं होतं- शेतीवरील सबसिडीला मनमोहनसिंगासह सर्व अर्थशास्त्रज्ञांची मान्यता घेण्यासाठी. त्यामध्ये दिल्लीच्या एक विदुषी आल्या होत्या.त्यांनी भाषणात वेगळीच भाषा वापरली. मी त्या भाषेला झिंदी (Zindi) असा शब्द वापरतो. 'झिंदी' म्हणजे झेड् टिव्हीवरून ऐकवली जाणारी हिंदी. मी मराठी बोलताना एखादद्‌दुसरा अपवाद सोडल्यास किंवा जाणिवपूर्वक वापरायचे ठरवल्याशिवाय एकही इंग्रजी शब्द वापरीत नाही. इतर भाषा वापरतानाही मी हेच करतो. इंग्रजी बोलताना फ्रेंच वापरत नाही आणि फ्रेंच बोलताना इंग्रजी वापरत नाही. कारण एक भाषा वापरत असताना, त्यांत दुसऱ्या भाषेचा शब्द येऊ देणं हा मी माझ्या अभ्यासाचा अपमान आहे असं समजतो.

पण जर असा प्रश्न निर्माण झाला की, मला विचार मांडायचा आहे पण माझ्या भाषेत मांडता येत नाही कारण माझ्या भाषेतले शब्द तोकडे पडतात. तर मग काय करावं? शब्दांशी तडजोड करावी का अर्थाशी? मराठी भाषा जगणं

महत्त्वाचं मानावं का सत्याचा शोध ही गोष्ट महत्त्वाची मानावी? मी काही अशातला नाही की जे परदेशात जातात, तीनचार महिने राहतात आणि मुंबईला उतरताच निम्मे शब्द इंग्रजी बोलतात आणि म्हणतात, 'आमची हॅबीटच गेली हो, मराठी स्पिकींगची!' वर्षानुवर्षे परदेशात राहून, परकीय भाषांमध्ये संपूर्ण काम करून मी शेतकऱ्यांसाठी उभा राहिलोय. कुणी मला साहित्यिक म्हणो न म्हणो, पण महाराष्ट्रातल्या आणि हिंदुस्थानातल्या शेतकऱ्यांना पदव्युत्तर पातळीवरचं अर्थशास्त्र मी 'ग्यानबा' च्या भाषेत नीट समजावून सांगितलं आहे. मराठीचं वैभव तुम्हाला पहायचं असेल तर ते कुठं पाणचट कथांत शोधायला जाऊ नका. मराठी भाषेची ताकद काय आहे, अत्यंत क्लिष्ट विचारसुद्धा किती चांगल्या तऱ्हेने मांडता येतो ते पहायचं असेल तर महिलांच्या प्रश्नांवर मी लिहिलेलं 'चांदवडची शिदोरी' हे पुस्तक वाचा. इंग्रजीमध्ये सुद्धा महिलांच्या प्रश्नांवर लिहिलेलं ह्या तोडीचं इतकं आटोपशीर आणि व्यवस्थित मांडणी करणारं पुस्तक सापडणार नाही!

माझ्यासारख्या माणसाला चिंता पडली आहे की, साहित्यसृष्टीचे ईश्वर, शब्दसृष्टीचे ईश्वर असे तुम्ही साहित्यिक तेच ते शब्द पुन्हा पुन्हा घोळत आहात, नवीन शब्द येत नाही, नवीन अनुभूती नाही. कारण आमचं सगळ्यांच आयुष्य दरिद्री झालं आहे. अमेरिकेत एखादं पुस्तक प्रकाशित करायचं ठरलं तर प्रकाशक पहिली आवृत्ती म्हणून किमान दहा लाखाची काढावी असं म्हणतो. मराठीमध्ये एखादं पुस्तक प्रकाशित करायचं म्हटलं तर प्रकाशक म्हणतो, ' तीन हजारांची आवृत्ती काढायची म्हणजे जरा धाडसाचंच होईल, दीड हजारातच जमलं तर बघा!' म्हणजे, मराठीत पुस्तक लिहिलं तर ते जास्तीतजास्त दीड हजार लोकांपर्यंत जाईल अशी अपेक्षा ठेवायची.छापल्याछापल्या त्यातली सहाशे पुस्तकं खपतील, नऊशे कदाचित कपाटातच पडून राहतील.गेलेल्या सहाशेतील शंभरेक पारितोषिकं देणाऱ्या संस्थांना देणगीदाखल गेलेली असतील. अशाने मी जे लिहिले असेल त्याचं काय व्हायचं? आणि मराठी भाषेचं काय व्हायचं?

मुळात, गरिबीचा प्रश्न सुटला पाहिजे. जर का गरिबीचा प्रश्न सुटला नाही, आयुष्य संपन्न झाली नाहीत, तर काय होणार आहे? गरिबी असताना आम्ही गरिबीचं विदारक दृष्य दाखविण्याच्या कामात अपयशी झालो आहोत. संपन्नतेचा अनुभव नसल्यामुळे आमचे 'डोळे'च थिटे पडले आहेत. असे असताना तुम्ही कितीही प्रयत्न केलेत, कितीही अभ्यासक्रम बदललेत, कितीही पारितोषिके दिलीत आणि कितीही 'ग्रंथाली'सारख्या चळवळी चालवल्या तरी त्यांचा काय उपयोग? तुमची पुस्तकं खपायची असतील तर त्याचा केवळ प्रचार करून भागत नाही. मी एक गरीब माणूस आहे. तरीही प्रयत्नपूर्वक मी साधारणपणे वर्षाला पाचदहा हजार रुपये पुस्तकांकरिता आणि मासिकांकरिता खर्च करतो. तुम्ही ग्रामीण साहित्य लिहीलं,'ग्रंथाली' सारखी चळवळ चालवली, पण ज्या शेतकऱ्याला समोर ठेवून तुम्ही लिहीत आहात त्याचा कापूस खरेदी केंद्रावर विकला जात नाही, विकला गेला तर चेक मिळत नाही, चेक मिळाला तर तो वटून पैसे मिळत नाहीत अशी जर स्थिती असेल तर तुमचे ग्रामीण साहित्य वाचायचे कुणी? यासाठी तुम्ही काहीतरी केलं पाहिजे.

आजकाल मान्यवर साहित्यिक होणं सोपी गोष्ट आहे. राजदरबारी दाखल झालं की पुरतं. त्यांची मग वेगळी जीवनशैली असते. संध्याकाळच्या मैफिली होतात, त्यांमध्ये काही वेगळ्या प्रकारचा 'कैफ' चढू शकतो. आणि तो 'कैफ' हाच मुळी 'प्रतिभेचा कैफ'आहे अशीही समजूत होऊ शकते.

यापलिकडे जाऊन आपल्या साहित्याशी इमान राखणारे साहित्यिक मराठीत आहेत का हे मोठे प्रश्नचिन्ह मी तुमच्यासमोर ठेवतो आहे. तुम्ही म्हणाल, ' आम्ही लेखक,प्राध्यापक, आमचं काम आम्ही सोडणार नाही.आम्ही काही आंदोलनं, समाजकारण करणार नाही.' मी असं म्हणणार नाही की तुम्ही आंदोलनात यावं, प्रत्येक लेखकानं एकदा तरी तुरुंगाचा अनुभव घ्यावा असं मला वाटतं तरीसुद्धा नसलं जायचं तर तुम्ही तुरुंगात जाच असंही मी म्हणणार नाही. पण निदान तुमच्या लेखणीमधून सत्यविचारमंथन बाहेर पडावं का नाही? तसं होत नाही.

मग अशा स्थितीत 'मराठी असे आमुचि मायबोली, जरी आज ती राजभाषा नसे' असं म्हणून तिच्या भवितव्याविषयी तुम्हाला खरंच तळमळ असेल, तर जगवण्याच्या निमित्ताने एक वेगळी संस्था स्थापन करून सरकारकडून वेगळे निधी उपलब्ध करून घ्यावे अशी योजना नसेल तर माझ्या मते तुम्ही दोनच गोष्टी कराव्यात. एक, तुमचं अनुभवाचं विश्व व्यापक होईल ह्याचा प्रयत्न करावा आणि दुसरी, ग्राहकाला तुमचं पुस्तक किमान वाचण्याकरता तरी हातात घेणं परवडेल हे पहावं. या दोन गोष्टी न करता,आपल्या खोलीमध्ये बसून कागद चितारणे म्हणजे साहित्यनिर्मिती असं जर तुम्ही समजलात तर, मला वाटतं, तुम्ही मराठी भाषेचा द्रोह कराल.

शेवटी दोन अनुभव सांगतो.

महाराष्ट्रातल्या एका कवीश्रेष्ठांनी शेतकऱ्यांवर कविता लिहिल्या, चांगल्या तळमळीने लिहिल्या. त्यांनी ते पुस्तक माझ्याकडे प्रस्तावना लिहिण्यासाठी पाठवलं. मी ते वाचलं आणि त्यांना विनंतीपत्र लिहिलं, 'मला फारसं नवकाव्य वगैरे समजत नाही. पण मला असं वाटतं की, माझं 'शेतकरी संघटना- विचार आणि कार्यपद्धती' हे जे अर्थशास्त्रावरचं पुस्तक आहे, त्याचीच जर आपण एका ओळीत दोन शब्द, दुसऱ्या ओळीत पाच शब्द, तिसऱ्या ओळीत तीन शब्द अशी फेरमांडणी केली तर तेही मुक्तकाव्य म्हणून चालून जाईल!मला असं वाटतं की आपण जे लिहिलं ते एकदा, दोनदा, तीनदा,चारदा, पाचदा, पुन्हा पुन्हा लिहावं. टॉलस्टॉयनं 'वॉर ऍन्ड पीस' ऐंशी वेळा लिहिलं. मला जर कोणी म्हटलं की, ' या आठ ओळी लिहायला मला पंधरा दिवस लागले' तर मला फार आनंद वाटतो. कुणीतरी

स्वत:च्या शिल्पावर मेहनत करतोय हे पाहून मला बरं वाटतं. नाहीतर जे पहिलं लिहिलं जातं तेच सरळ छापखान्यात जातं अशी सर्वसाधारण रीत. अजून प्रतिभेचं महत्त्व संपलेलं नाही, पण, प्रतिभेइतकेच महत्त्व परिश्रमालाही आहे. आणि हे परिश्रम साहित्यामध्ये मोलाचे आहेत, असं मला वाटतं. तेव्हा तुम्ही या कवितांचं पुनर्लेखन करा. असं सांगून मी त्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्यास नकार दिला. माझा नकार गेल्यावर त्यांनी दुसऱ्या कुणाकडून तरी प्रस्तावना घेतली आणि तसंच पुस्तक प्रकाशित केलं. आता या पुस्तकाला पारितोषिक मिळालं आहे.

दुसरं उदाहरण माझ्या मित्राचं. शेषराव मोहित्यांच्या 'असं जगणं तोलाचं' मध्ये काय आशय आहे? हा शेषराव आमचा कार्यकर्ता असताना त्याची एक कविता 'आमचा पंदरा आगस्ट कवा हाय?' माझ्या पहाण्यात आली. अगदी जिवंत काव्याचं उदाहरण आहे.त्याचबरोबर त्यानं एक कथा लिहिली 'पाणभांडवल' म्हणून. एक शेतकरी मोठ्या कष्टानं विहीर खणायला घेतो. पाणी येईल, ऊस येईल म्हणून स्वप्न पहातो. अपार कष्ट करतो, पाणी येतं, ऊस होतो याचे चित्र त्यानं तपशिलवारपणे रेखाटलं आहे. आणि गुऱ्हाळ लावून गूळ विकायला गेल्यानंतर काय स्थिती होते त्याचंही वर्णन विदारकतेनं केलं आहे. त्याचं ते लहानसं साहित्य माझ्या दृष्टीनं 'द ओल्ड मॅन ॲन्ड द सी' च्या दर्जाचं होतं, बारकाईनं तपशील लिहिणारं.

एकेक दिवस, बी पेरल्यानंतर हाती पीकं येईपर्यंत किंवा न येईपर्यंत सकाळपासून संध्याकाळपर्यंत शेतकऱ्यांच्या मनाला ज्या सहस्त्र इंगळ्या डसतात त्याचं चित्र साहित्यात मला कुठंही दिसत नाही. साहित्यात नाही आणि सिनेमातही नाही. सिनेमात तर काय? शेतकरी दाखवायचा म्हणजे एकदाच नांगर घालताना दाखवायचा. आणि लगेच सगळी पिकं लहलहरती. मग पुढे, दहा मुली इकडे नाचत जाणार, अन् दहा मुली तिकडे नाचत जाणार!शेतकऱ्याच्या आयुष्याच चित्रण हे असं होऊन गेलंय. तुम्ही शेतकऱ्याच्या आयुष्यामध्ये बारकाईने का पहात नाही?

मी शेतकऱ्याच्या कुटुंबात जन्मलेला नाही, व्यवसायानं मुळात शेतकरी नाही. आणि तरीदेखील गावामध्ये मी गेलो की शेतकरी मोठ्या संख्येने जमतात कारण मी काय बोलतो ते शेतकऱ्यांना समजतं. मी साहित्यात अडाणी असेन. पण ग्रामीण भागातल्या जनतेच्या, विशेषत: मायबहिणींच्या वेदना मला समजतात. कारण मी माझ्या अनुभवाचं विश्व व्यापक करण्याचा सतत प्रयत्न केला, करतो. मी तुम्हाला प्रेमानं आणि कळकळीनं सांगतो. मराठीतलं जे ग्रामीण म्हणून साहित्य आहे ते खेड्यांशी संबंधित आहे असं मला खरंच वाटत नाही. तुम्ही संमेलनं घालाल, ग्रामीण साहित्य,दलित साहित्य आणि आता आणखी काही 'साहित्यं' निघाली त्यांची संमेलनं घालाल, त्यांचे मंच उभे कराल, निधी जमवाल, पण तुम्हाला असं वाटत असेल की यातून मराठी भाषा जगणार आहे तर तो तुमचा भ्रम आहे. याने मराठी भाषा जगणार नाही. मराठी भाषा मोठी करायची असेल तर मराठी माणूस मोठा झाला पाहिजे. लहान माणसाची भाषा- मातृभाषा मोठी असूच शकत नाही, एवढेच मला सांगायचं आहे.

समारोपाच्या या भाषणात मी थोडा कुचेष्टेचा स्वर काढला असला तरी ते वेदनेने बोललो आहे. मला दु:ख पहावत नाही हे मी आधीच सांगितले. मराठी भाषेवर माझे अपरंपार प्रेम आहे. काही मोजके लोक सोडले तर, एकाच अर्थाच्या किंवा एकाच वृत्ताच्या कविता म्हणण्याची स्पर्धा लावली तर मी इथल्या सर्वांना हरवीन. अशा सहअनुभूतीच्या माणसाच्या मनामध्ये ज्या काही शंका आहेत, वेदना आहेत त्याच मी इथे मांडल्या आहेत.

(१२-१३ जानेवारी ९६ रोजी परभणी येथे भरलेल्या 'तिसरे मराठवाडा साहित्य संमेलना'च्या समारोप प्रसंगी श्री. शरद जोशी यांनी केलेल्या भाषणाचा उत्तरार्ध, शेतकरी संघटवच्या सौजन्याने- प्राथमिक शब्दांकन श्री.सु.मा. कुलकर्णी यांच्या सौजन्याने)

पान १९ वरून

मराठी सारस्वतकारांनी मुस्लिमांचे विकृतीकरण का केले याचा वेध घेत असताना आपल्या लक्षात येते की भरताच्या नाट्यशास्त्राप्रमाणे महाकाव्याचे नायक फक्त ब्राह्मण आणि क्षत्रियच होऊ शकतात. शूद्रातिशूद्रांना नायक होता येत नसे.त्यामुळे भारतामध्ये अरब-तुर्क-अफगाण-मोगलांच्या मुस्लिम राजवटी आल्यानंतर ज्या शूद्रातिशूद्रांनी धर्मांतर केले आणि ब्राह्मणांच्या वर्चस्वाला शह दिला त्यांना ब्राह्मणांकडून साहित्याचे नायकत्व बहाल करणे ही अवघड गोष्ट होती. आधीच शूद्रातिशूद्र त्यात पुन्हा मुस्लिम झालेले त्यामुळे ब्राह्मणांच्या जातीय अहंकाराबरोबरच धार्मिक अहंकारही उफाळून आला तर त्यात नवल नाही. ब्राह्मणांच्या जातीय आणि धार्मिक अहंकाराला मुस्लिमांनी शह दिलेला होता आणि त्यातही जे मुस्लिम झालेले होते ते पूर्वाश्रमीचे हिंदू मध्यम जातीय आणि दलित होते म्हणून त्यांच्यावर स्वप्नरंजनात्मक, आभासात्मक सूड घेण्यासाठी ब्राह्मणी साहित्यिकांनी मुस्लिमांचे विकृतीकरण केल्याचे जाणवते.

मुस्लिमांचे योगदान

वास्तविक पहाता महाराष्ट्रातील मराठी साहित्याची जी तीन सांस्कृतिक केंद्रे दिसतात ती म्हणजे गाणगापूर-दत्त, ऋद्धीपूर-महानुभव आणि पंढरपूर-वारकरी आणि विशेष म्हणजे या तिन्ही शहरांवर तथाकथित 'इस्लामी सत्ता' होती. पण तरीही मराठी साहित्याचा केंद्रबिंदू म्हणून हीच तीन शहरे इतिहासात ओळखली जातात, हे डॉ. सदानंद मोरे यांचे मत रास्तच आहे.इ.स. १३ व्या शतकापासून म्हणजे शेख मंहमद, शेख सलीम ते शाहीर अब्दूल, आबालाल करीम, बाबासाहेब मंहमद हनीफ ते अमर शेख इ. मुस्लिमांनी फार मोठ्या प्रमाणांवर मराठी भाषेची सेवा केल्याचे दिसते. इतकेच नव्हे तर इब्राहिम आदिलशहा (१५८० ते १६२०) याने मराठीला राज्यभाषेचा दर्जा दिलेला होता.आज मराठीच्या नावाने ढोल बडवण्याऱ्या संस्कृतीरक्षकांनी या ऐतिहासिक सत्याची दखल घ्यावी. अन्यथा इतिहास त्यांना कधीच क्षमा करणार नाही.

प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंडातही मुस्लिमांनी फार मोठ्या प्रमाणांवर मराठी साहित्यात मोलाची भर घातली. त्यामुळे मराठी भाषा मुस्लिमांना परकीय नाही परंतु तरीही मराठी सारस्वतकार जेव्हा मराठी भाषेला मुस्लिमांच्या विरोधात उभी करतात तेव्हा मात्र मनाला तीव्र वेदना होतात. साहित्याच्या दालनात मुस्लिमांना न्याय नाकारल्यामुळे मुस्लिमांच्या खऱ्या खुऱ्या आणि वास्तव चित्रणाची गरज भासू लागली.

स्वातंत्र्योत्तर राजकारण

स्वातंत्र्योत्तर कालखंडात आणि त्यातही पंडीत नेहरूंच्या मृत्यूनंतर भारतीय समाजजीवन झपाट्याने बदलत गेले.१९७० च्या दशकात निरनिराळे समाजगट कॉंग्रेसपासून वेगाने दूर होऊ लागले याची परिणती आणिबाणी लादण्यामध्ये झाली. जेव्हा १९८० मध्ये श्रीमती गांधी परत सत्तेवर आल्या तेव्हा त्यांच्या लक्षात आले की आपला पारंपारिक जनाधार झपाट्याने सरकत आहे. मुस्लिम, दलित, आदिवासी आदी जनसमूह कॉंग्रेसपासून दूर होत होते. हे पाहून इंदिरा गांधी अधिकाधिक उजवीकडे सरकू लागल्या.श्रीमती गांधीच्या हत्येनंतर राजीव गांधी पंतप्रधान झाले.मुस्लिम मते मिळविण्यासाठी शहाबानो केसच्या निमित्ताने मुस्लिम महिला विधेयक आणले. त्याची तीव्र प्रतिक्रिया बहुसंख्यांक हिंदूमध्ये उमटली.म्हणून उच्चवर्णीय हिंदूंना खुष करण्यासाठी रामजन्मभूमी -बाबरीमशिदीच्या संदर्भात १ फेब्रु. १९८६ ला न्यायालयाने आदेश दिला.पुढे काय झाले हे आपल्याला विदीत आहेच.

व्ही.पी.सिंगानी मंडल आयोग लागू केला आणि लालकृष्ण अडवाणी यांनी रथयात्रा काढून सरकारचा पाठिंबा काढून घेतला.संपुर्ण देशभर मुस्लिमांच्या विरोधात आर.एस.एस. ने रान पेटवले. महाराष्ट्रही त्याला अपवाद राहू शकला नव्हता.मंडल आयोगामुळे हिंदू मध्यमजातींना आत्मभान येऊ लागले आणि हिंदू उच्चजातवर्गीयांनी मुस्लिम विरोध तीव्र केला.परिणामी ६ डिसें. १९९२ अयोध्येत बाबरी मशिद संघ परिवाराने जमिनदोस्त केली. त्याच्या हिंसक प्रतिक्रिया देशविदेशात उमटल्या. मुंबई दंगल आणि बॉम्बस्फोट हा एक अध्याय संपला. आजपर्यंतचा ग्रामीण भाग जो दंगलीपासून अलिप्त होता, त्या ग्रामीण भागात राहणाऱ्या मुस्लिमांच्या दाराशी संघ परिवाराने दंगल आणली आणि मुस्लिमांसमोर त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न उभा राहीला.

कनिष्ठ जातीय मुस्लिमांची जागृती

६ डिसें. च्या घटनेनंतर सर्वसामान्य मुस्लिमांचे डोळे उघडले. या देशातील कॉंग्रेस किंवा उच्चजातवर्गीय मुस्लिम नेतृत्व आपले संरक्षण करू शकत नाही, याची त्यांना जाणीव झाली.जुबानी तलाक, उर्दू, सॅटनिक व्हर्सेस,समान नागरी कायदा इ.प्रश्न हे खरे आपले प्रश्न नाहीत. बेकारी, गरीबी, अज्ञान इत्यादी आपल्या जीवनमरणाचे प्रश्न मुस्लिम उच्चजात वर्गाने कधीच घेतले नाहीत हे सर्वसामान्य मुस्लिमांच्या लक्षात आले.

ह्या सगळ्या गोष्टी मराठी भाषिक मुस्लिम पहात होता.अनुभवत होता.हे पहात असताना तो आपले अनुभव मराठी साहित्यात अविष्कृत करू लागला आणि मुस्लिम मराठी साहित्य चळवळ आकार घेऊ लागली. मुस्लिम समाजजीवनाचे चित्रण ज्या मराठी भाषिक लेखकाने मुस्लिम मानसिकतेसह केलेले आहे,त्या साहित्याला मुस्लिम मराठी साहित्य म्हणावयास काहीच प्रत्यवाय नसावा. वास्तविक इस्लाममध्ये जातीव्यवस्था नाही पण भारतीय मुसलमान मात्र जातीत विभागला गेला आहे उच्चजातवर्गीय मुस्लिम अभिजनांची भाषा उर्दू आहे तर कनिष्ट जातीय मुस्लिम अजलफ वर्गाची भाषा ही प्रादेशिक भाषा आहे. त्यामुळे मुस्लिम मराठी साहित्य हे कनिष्ठ जातीय मुस्लिम अजलफ वर्गाचे साहित्य आहे. फ.म. शहाजिंदे, मुबारक शेख, शफीक सुरज किंवा इलाही जमादारसारखे मराठीतून लेखन करणारे सर्व मुस्लिम कवी, लेखक,कलावंत आणि साहित्यिक हे मुस्लिमांतील बहुजन समाजाचे आहेत.पर्यायाने

मुस्लिम मराठी साहित्याची चळवळ ही मुस्लिम बहुजनांची चळवळ आहे.

वास्तवाला सामोरे जावे लागेल.

मुस्लिम मराठी साहित्याची चळवळ आज गतीमान होत आहे.मुस्लिमांचे खरेखुरे वास्तव ती आपल्या साहित्यात चितारू पहाते. पण आजही ही चळवळ शहरी भागातच घुटमळताना दिसते.धुळे, जळगाव जिल्ह्यातील आदिवासी तडवी मुसलमान किंवा मदारीसारख्या भटक्या जमातींचे चित्रण साहित्यात यावे.मुस्लिम भटक्या जमाती या शरियतच्या परंपरेबाहेर आहेत.त्यांच्यामध्ये जुबानी तलाकऐवजी जात पंचायत भरवून तलाक दिला जातो, यांचे चित्रण तसेच मुस्लिम धोबी स्त्री,शेतमजुरी करणारी मुस्लिम स्त्री, दारोदार भटकणारी खेळणी विकणारी मुस्लिम मदारी स्त्री,दारोदार आटा मागून जगणारे फकीर, टी.बी.होऊन मरणारे मुस्लिम बिडी कामगार, भंगी मुसलमानांची दुरावस्था, कापूस पिंजणारे पिंजारी, सौदागर भटके आणि या सर्वांच्या जीवनात वेगवेगळ्या प्रसंगात कमी जास्त श्रद्धेने येणारी इस्लामची उपासना याचे वास्तव आणि दाहक दर्शन कलात्मकतेच्या पातळीवर साकार होऊन जेव्हा मुस्लिम मराठी साहित्यात अविष्कृत होईल तेव्हा मुस्लिम साहित्य खऱ्या अर्थाने बहरू लागेल.

मुस्लिम मराठी साहित्य प्रवाहाने फुले-आंबेडकरवादी जीवनदृष्टी स्वीकारली नाही तर अपरिहार्यपणे सर्वदूर प्रभावक्षेत्र गाजविणाऱ्या ब्राह्मणी साहित्याच्या तथाकथित मुख्य प्रवाहात तो गडप केला जाईल.कारण ब्राह्मणी जातिव्यवस्थाक समाजवास्तव आणि वर्गीय समाजवास्तव या दोन्हीतून निर्माण होणारे जाणीवांचे विश्व चितारले नाही तर मुस्लिम साहित्य प्रवाह त्याचा वास्तविक, सामाजिक,सांस्कृतिक पायाच हरवून बसेल.अपरिहार्यपणे मुस्लिम लेखकांना स्वप्नरंजनात्मक आणि चंगळवादी साहित्यलेखनाकडे वळावे लागेल. अशा प्रकारचे साहित्यलेखन करणारे काही मुस्लिम लेखक आपणास दिवाळी अंकांतून आढळून येतात.म्हणून मुस्लिम मराठी साहित्य चळवळीने वर्गजातस्त्रीदास्य अंताचे तत्त्वज्ञान स्वीकारण्यास हवे.अशा प्रकारचे तत्त्वज्ञान मुस्लिम मराठी साहित्यिक प्रस्थापित वर्गाशी होणाऱ्या संघर्षातुन विकसित करतील असा विश्वास वाटतो आहे. औरंगजेब आणि जोशी या कथासंग्रहाच्या निमित्ताने जावेद कुरेशी यांनी हे सामर्थ्य असल्याची शक्यता सूचित केली आहे.त्यांच्या व इतर सर्व मुस्लिम मराठी साहित्यिकांच्या वाटचालीस शुभेच्छा

❖❖❖❖❖

पान ३१ वरून

साहित्यिकांची भ्रष्टता

महाराष्ट्र शासनाच्या साहित्य संस्कृती मंडळावर साहित्यातील विविध प्रवाहांच्या प्रतिनिधींची वर्णी सरकार लावते.युतीचे सरकार सत्ताधीष होण्यापूर्वी दलित साहित्यिकांचा (बहुसंख्यांक) भरणा या मंडळावर होता. साहित्य आणि संस्कृतीच्या क्षेत्रातील उपक्रमापेक्षा विविध कारणांनी हे मंडळ गाजले आहे. नवोदित लेखकांना त्यांच्या पुस्तकांना हे मंडळ अनुदान देते. लेखक पश्चिम महाराष्ट्रातला असला तर प्रकाशक मात्र विदर्भातला असतो. त्यामुळे लेखकाची व प्रकाशकाची गाठ पडत नाही. पाचपन्नास पुस्तकाच्या प्रति लेखकाला प्रकाशक देतो व बाकी किती प्रती छापल्या हा आकडा गोपनीयच असतो. ज्या वरिष्ठ लेखकाकडे पुस्तकाच्या प्रती तपासणीसाठी जातात, त्यातही तोडपाणी होते. मंडळाच्या विविध विभागांतल्या बैठका ह्या केवळ भत्ते मिळवण्यासाठी असतात. अशाप्रकारे साहित्य संस्कृती मंडळ हे भत्तेमंडळ आहे.

गेल्या वीस वर्षांत उच्च शिक्षणाचा झालेला विस्तार महाराष्ट्रात महाविद्यालये आणि नव्या विद्यापीठांची झालेली स्थापना आणि पांढरपेशा बुद्धिजीवी वर्गाची झालेली वाढ या सर्वांचे साहित्याच्या संदर्भात परिणाम झाले. माळी, धनगर, वंजारी, मराठा अशा परंपरेने शेतकरी असलेल्या जातींतून नवा बुद्धिजीवी वर्ग तयार झाला. जिल्हा वृत्तपत्रे आणि साप्ताहिके यांची संख्या तिपटीने वाढली. पत्रकारांचा नवा वर्ग ग्रामीण भागातही प्रतिष्ठित झाला. साहित्य संस्कृतीच्या क्षेत्रातील ब्राह्मणेतरांतून उदयास आलेल्या या नव्या वर्गाशी संपर्क साधून, त्यांना आपल्या सत्तेत तिसऱ्या, चवथ्या श्रेणीत सामावून घेण्याचे राजकारण सुरू झाले. समाजातील पारंपारिक सत्तासमतोल ढासळल्यामुळे सहकार, राजकारण, अर्थकारण, समाजकारण या सर्व क्षेत्रातील संघर्षाला महत्त्व प्राप्त झाले. या संघर्षाची दखल घेण्याची नवी सत्ता पत्रकार वर्गास प्राप्त झाली. या वर्गावर मोहिनी पाडण्यासाठी शास्त्या वर्गजातीत स्पर्धा सुरू झाली.

म्हणूनच दलित-ओबीसी वर्गजातींच्या जनआंदोलनावर आधारित क्रांतिकारी राजकारणाचे जोपर्यंत तेजस्वी पर्व सुरू होत नाही तोपर्यंत शास्त्या वर्गजातींच्या हातीं असलेल्या सांस्कृतीक-साहित्यिक मानपदांच्या आणि प्रतिष्ठापदांच्या प्रत्यक्ष लाभासाठी किंवा भवितव्यातील अपेक्षांसाठी तत्त्वभ्रष्ट सांस्कृतिक-साहित्यिक राजकारण करणारा वर्ग समाजात उजळ माथ्यानेच वावरणार आहे.

❖❖❖❖❖

प्रिय कॉम्रेड,

प्रिय कॉम्रेड,
सोळाव्या पावसाळ्यात
शाळेच्या दगडी चर्चच्या क्रॉसमधून
माझी नजर थेट
तुझ्या आकाशडोळ्यापर्यंत
थक्क होऊन जाणारी
तुझे डोळे थेट भगतसिंगासारखे
आज शहीददिनी
पुन्हा एकदा तुझी आठवण होते तीव्रतेने
इन्किलाब जिंदाबाद
मेरा रंग दे बसंती चोला
हम होगे कामियाब एक दिन

* * *

प्रिय कॉम्रेड
मी तूला जवळून पाहिलयं
पंच्याहत्तरच्या दुष्काळात अस्वस्थ झालेला तू
गिरणी कामगारांसाठी क्रांती गीतं गाणारा तू
शेतमजूरांना सलामी देणारा तू

* * *

प्रिय कॉम्रेड
सारं उधळून जगण्याची तुझ्यातील शक्ती
शृंखला तोडून कधी बाहेर येते
हे मला पाहायचं आहे
वाऱ्याची दिशा बदलण्याचे
सामर्थ्य तुझ्यात आहे दोस्ता
- - - लाल निशाण फडकतेयं - - -
तय्यार हो..

नीलिमा बंडेलू

पान २ वरून

आधुनिकतेची (Modernism) ची संकल्पना आयात केल्याने ते साहित्य आधुनिक होऊ शकत नाही. स्वत:च्या जातजाणिवांपलिकडे जाऊन जातवर्गस्त्रीदास्यअंतक साहित्य निर्मिती झाली तर मराठी साहित्य आधुनिक ठरेल.

दलित-आदिवासी-ग्रामीण साहित्याची भूमिका

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणापासून वंचित राहिलेल्या व सामाजिक सांस्कृतीक क्षेत्रात दडपल्या गेलेल्या बहुजनांतल्या जातीजमातीत नव्याने शिक्षण लाभल्यामुळे व दडपणुकीच्या असंतोषामुळे अपरिहार्यपणे नवजागृती आली. दलित-आदिवासी-ग्रामीण -स्त्री -जनवादी, कामगार,ख्रिस्ती -मुस्लिम हे नवे प्रवाह प्रस्थापितांची कोंडी फोडून प्रवाहित झाले,बोलू लागले, लिहू लागले.महात्मा फुले, आंबेडकर, राजश्री शाहू-महाराज, कार्ल मार्क्स ह्यांचा वैचारिक वारसा घेऊनच नव्या साहित्य चळवळी सुट्या सुट्या कार्यरत असल्या तरी त्यात सुसूत्रता आणावी या हेतूने १९८७ च्या आसपास दलित-आदिवासी-ग्रामीण संयुक्त महासभेची स्थापना करण्यात आली.या साहित्य चळवळीचा बहुजनांच्या थेट जगण्याशी सांधा जोडण्याचा प्रयत्न व त्यातून शोषितांच्या सृजनांचे साहित्यरूप प्रकट करण्याचा हेतू आहेच. या द.आ.ग्रा. संयुक्त साहित्य महासभेने आधिक व्यापक व्हावे. नव्या प्रवाहांना सामावून घेत पुढे जावे अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि लीटल् मॅगझीन्स, दलित साहित्य,ग्रामीण साहित्य यानंतर आता संयुक्त साहित्य चळवळीच्या निमित्ताने पुढे येणाऱ्या तरूण साहित्यिकांच्या धक्क्यासाठी तथाकथित 'मुख्य' प्रवाहाने तयार रहावे असा इशारा देत आहोत, त्याची चुणूक ह्या अनियतकिलाकाने मिळाली असा समज झाल्यास आनंदच वाटेल!

पान ७ वरून

ते राष्ट्रविरोधी, अशी विभागणी इनामदारांनी केली आहे. विधवा विवाह, बालविवाह वगैरे घटक स्त्रियांची गुलामगिरी, शेतकऱ्यांवरील अत्याचार, अस्पृश्यता इत्यादी गोष्टींची चर्चा, राष्ट्राचं भवितव्य ठरविण्याच्या दृष्टीनें गौण असल्याचा निवाडा ब्राह्मण इनामदारांनी दिला आहे. इंग्रज त्यांचे दैवबलवत्तर म्हणून जिंकले.आपण आपल्या नशिबाने हरलो. नव्वद टक्के जनतेला गुलाम ठेवून राज्य करता येणं शक्य आहे. शेतकऱ्यांनी कर न दिल्यास त्यांच्या बेंबीत दारू ठासून त्यांना मारणे कठीण नाही. अस्पृश्यांच्या मागे केरसूणी लावून त्यांचे धिंडवडे काढणे म्हणजे विशेष नाही. स्त्रियांना तुमच्या भितीने घराबाहेर पडता आले नाही तरीही फार काही नाही. पेशवाईत हे सर्व होतेच. त्यामुळे पेशवाई बुडाली नाही,दैवाने बुडाली. तेव्हा लोकहो .. दैव सांभाळा, नशिबावर हवाला ठेवा, ब्राह्मणांना दोष देवून त्यांचा तेजोभंग करू नका. हे संदेश आहेत सतराव्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष माननिय ना.स. इनामदार यांचे!

कोट्यावधी रूपये खर्च होऊन होणाऱ्या ह्या उत्सवाची ही उत्सवमूर्ती मराठी साहित्य व संस्कृतीच्या परंपरेला एकदम फिट्ट बसणारीच आहे की नाही? शेतकरी बहुजनानो, दलिता-आदिवासीनो उचला त्यांची पालखी. आपल्या पूर्वजांच्या हाल-अपेष्टांचे विकृत चित्रण करणाऱ्यांची, सुधारणावाद्यांना शिव्या देणाऱ्यांची,आपल्या शोषणकर्त्या ब्राह्मणी छावणीच्या म्होरक्याची!

पान ५ वरून

करताना त्याचा इतिहासही वेगळा रंगवणे हे अपघाताने घडत नाही. त्यामागे एक निश्चित धोरण व राजकारण आहे. साहित्य व कलेची चर्चा करताना त्यामध्ये आपल्या ब्राह्मणी संस्कृतीची वर्चस्ववादी दृष्टिकोन प्रभावी आहे, हे नाकारणे मूर्खपणाचे आहे, कारण ते निर्विवाद सत्य आहे. संस्कृत सोडून बाकीचे संप्रदाय, त्यांचे योगदान, त्यांच्या ठायी असलेली सौंदर्यशास्त्र-निर्मितीची संभाव्यता याकडे आजही दुर्लक्ष केले जाते.

दक्षिणेतील 'भूताराधना' या प्रकारात 'यक्षगान' 'कथ्यकली' यांची मूळे आढळतात.या सर्वातील वेशभूषा, रंगभूषा आणि तत्त्वज्ञान यांचे संदर्भ खोलात तपासले तर आपण 'नाट्यशास्त्रापासून' खूप दूर जातो. प्रत्येक सादरीकरणामागे सामाजिक हेतू स्पष्ट असेल तर त्याचे सौंदर्यशास्त्रही बदलावे लागेल.

)()()(

(१९८८ मध्ये वाळवा, जिल्हा सांगली येथे झालेल्या द्वितीय दलित,आदिवासी, ग्रामीण संयुक्त साहित्य संमेलनांत मा.गिरीश कर्नाड यांनी केलेल्या उद्घाटनाच्या भाषणातील काही अंश. भाषण उपलब्ध करून दिल्याबद्दल डॉ. भारत पाटकरांचे व संकलनाबद्दल प्रा. झिनत खान यांचे आभार)

न.चि. केळकर बाजीरावांसंबंधी म्हणतात,

बाजीरावाइतकी स्वस्थता पूर्वी दुसऱ्या कोणत्याही पेशव्यास मिळाली नाही. पण ह्या स्वस्थतेचा उपयोग राज्याची सुव्यवस्था करण्याकडे त्याच्या हातून मुळीच झाला नाही, असे म्हणण्यास हरकत नाही. रिकामपणचे सर्व चाळे त्याला सुचू लागले. स्वत: राज्यकारभाराकडे पहावयाचे नाही व जे पहात असतील त्यांना स्वस्थ बसू द्यावयाचे नाही. मकत्याने मामलती द्याव्या, येईल त्या वसूलापैकी पुष्कळसा खाजगीकडे ठेवावा, आणि दरबारी व खाजगी पैशाचा उपयोग जितका नैतिक अनाचाराकडे तितकाच धार्मिक अत्याचाराकडे करावा असा त्याचा क्रम असे. पदरच्या सरदारांच्या छळात त्याची बुद्धी बरीच खर्च पडत असे व उरलेली बुद्धी त्याच्या बदसल्लागारांनी आपल्या ताब्यात घेतलेली असून दरबाराच्या कामकाजात ते खेळखंडोबा करीत. अखेर ह्या खेळखंडाब्यातूनच त्याचे राज्य गमावण्यास निमित्त निघाले!

(मराठे व इंग्रज पान १०२)

'सत्यशोधक दिशा' च्या विशेषांकास

हार्दिक शुभेच्छा

⌘

आमची जात भारतीय

आमचा धर्म माणुसकी

आमचा झेंडा तिरंगा

भारतमातेच्या पायातील

पारतंत्र्याची शृंखला तोडण्यासाठी

प्राणार्पण करणाऱ्या सर्व महान

हुतात्म्यांच्या स्मरणाला अभिवादन

करून एकसंघ, बलशाली व

सुजलाम-सुफलाम भारताचे

स्वप्न साकार करण्यासाठी एकत्रित उभे राहूया.

⌘

बालाजी मित्रमंडळ,

यशवंत सोशल क्लब,

फर्ग्युसन गेट, तात्या टोपे मार्ग,

अहमदनगर

संघटक : आसाराम हरिभाऊ कावरे

सदस्य नगरपालिका, अहमदनगर,

संचालक, अहमदनगर शहर सहकारी बँक, अहमदनगर

मराठी ग्रंथकारसभेस पत्र

वि. वि. आपले ता. १३ माहे मजकूरचें कृपापत्रासोबतचे विनंतीपत्र पावले. त्यावरून मोठा परमानंद झाला. परंतु माझ्या घालमोड्या दादा, ज्या गृहस्थाकडून एकंदर सर्व मनुष्याच्या मानवी हक्काविषयी वास्तविक विचार केला जाऊन ज्याचे त्यांस ते हक्क त्यांच्यानें खुषीने व उघडपणे देववत नाहीत, व चालू वर्तनावरून अनुमान केले असता पुढेही देववणार नाहीत, तसल्या लोकांनी उपस्थित केलेल्या सभांनी व त्यांनी केलेल्या पुस्तकांतील भावार्थाशी आमच्या सभांचा व पुस्तकांचा मेळ मिळत नाही. कारण त्यांच्या पूर्वजांनी आम्हांवर सूड उगविण्याच्या इराद्यानें; आम्हांस दास केल्याचें प्रकर्ण त्यांनी; आपल्या बनावट धर्मपुस्तकांत कृत्रिमाने दडपले. याविषयी त्यांच्यांतील जुनाट खल्लड ग्रंथ साक्ष देत आहेत. यावरून आम्हां शूद्रादि अतिशूद्रांस काय काय विपत्ती व त्रास सोसावे लागतात, हे त्यांच्यातील उंटावरून शेळ्या वळणाऱ्या ग्रंथकारांस व मोठमोठ्या सभास्थानी आगांतूक भाषण करणारांस कोठून कळणार? हे सर्व त्यांच्या सार्वजनिक सभेच्या उत्पादकांस जरी पक्के माहीत होते, तरी त्यांनी फक्त त्यांच्या व आपल्या मुलाबाळांच्या क्षणिक हिताकरिता डोळ्यावर कातडे ओढून त्याला इंग्रज सरकारांतून पेनशन मिळतांच तो पुनः अट्टल जात्याभिमानी, अट्टल मूर्तिपूजक, अट्टल सोवळा बनून आपल्या शूद्रादिअतिशूद्रांस नीच मानू लागला व आपल्या पेनशनदात्या सरकारनें बनविलेल्या कागदाच्या नोटीससुद्धा सोवळ्याने बोट लावण्याचा विटाळ मानूं लागला! अशीच का शेवटी ते सर्व आर्य ब्राह्मण या हतभाग्य देशाची उन्नती करणार! असो, आता यापुढे आम्ही शूद्र लोक, आम्हास फसवून खाणाऱ्या लोकांच्या थापावर भुलणार नाहीत. सारांश यांच्यात मिसळल्याने आम्हा शूद्रादि अतिशूद्रांचा काही एक फायदा होणे नाही, याबद्दल आमचा आम्हीच विचार केला पाहिजे. अहो, त्या दादांना जर सर्वांची एकी करणे असेल, तर त्यांनी एकंदर सर्व मानवी प्राण्यांत परस्पर अक्षय बंधुप्रीति काय केल्याने वाढेल, त्याचें बीज शोधून काढावे व ते पुस्तकद्वारें प्रसिद्ध करावे. अशा वेळी डोळे झांकणे उपयोगाचे नाही. या उपर त्या सर्वांची मर्जी. हे माझे अभिप्रायादाखल छोटेखानी पत्र त्या मंडळीच्या विचाराकरिता तिजकडे पाठविण्याची मेहेरबानी करावी. साधे होके बुड्ढेका येह पहिला सलाम लेव.

आपला दोस्त
जोतीराव गो. फुले

(ज्ञानोदय, दि. ११ जून १८८५)